पं. दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था,

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

पुष्पांबर

२०१८-१९

महात्मा गांधी

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

पुष्पांबर

वार्षिक अंक
२०१८-२०१९

- संपादक
  प्रा. विजय पांडे
- मार्गदर्शक
  प्राचार्य डॉ. एस.आर. टकले
- प्रकाशक
  श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

पुष्पांबर

- **वार्षिक अंक**
  २०१८-१९

- **संपादक**
  प्रा. विजय पांडे

- **संपादकीय सहाय्य**
  प्रा.डॉ. राजश्री पवार, प्रा.डॉ. संजीवकुमार पांचाळ,
  प्रा.डॉ. ज्ञानेश्वर गवळीकर

- **मुखपृष्ठ व अक्षरजुळवणी**
  श्री.संतोष लाखे

- **प्रकाशक**
  प्राचार्य, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

- **मुद्रक**
  विशाल एन्टरप्रायजेस, ५६, सर्व्हिस इंडस्ट्रियल
  एरिया, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद
  दूरध्वनी : (०२४०) २४८०४२८, मो.९४२०३१६२४८

- **सूचना**
  या वार्षिक अंकात व्यक्त झालेले विचार लेखनकर्त्यांचे स्वतःचे आहेत. संपादक आणि प्रकाशक त्या विचारांशी सहमत असतीलच, असे नाही.

संपादकीय...

महात्मा गांधी हे देखील तुमच्या माझ्यासारखे सर्वसामान्य तरुण होते. आजची तरुण पिढी मात्र एखाद्या आघाताने चटकन निराश होते. झालेल्या आघाताने निराश न होता महात्मा गांधींनी त्यावर उपाय शोधले. महात्मा गांधीजींची १५० वी जयंती साजरी होत असताना तरुणांनी त्यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवायला हवा. मोहनदास करमचंद गांधी या तरुणाचा महात्मा होत असेल तर आपल्यासारख्या तरुणांचा तो का होणार नाही? गांधीजी देखील तुमच्या आमच्या सारखेच सामान्य माणूस होते. सतत आत्मपरीक्षण, सत्य, अहिंसा यांच आचरण, प्रयोगशील जीवन हे आजच्या तरुणालाही मार्गदर्शक ठरावे, यासाठी महाविद्यालयातील सामाजिकशास्त्रे अभ्यासमंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लेख पाठवले. या लेखांचे डॉ. ज्ञानेश्वर गवळीकर, डॉ. संजीवकुमार पांचाळ व डॉ. राजश्री पवार यांनी परिक्षण केले.

महात्मा गांधींनी एक नवा विचार लोकांसमोर आणला हा विचार होता. स्वतः जगा आणि इतरांना जगण्यासाठी मदत करा. हा एक सकारात्मक विचार असून त्यात संपूर्ण मानवता सामावलेली दिसून येते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जराही न डगमगणाऱ्या गांधीजींचा पुरुषार्थ आणि शौर्य हे मानवी निष्ठा, अहिंसा, शास्त्रीयता आणि वास्तव यांचे अधिष्ठान होते.आताच्या लढाया कोणत्याही शस्त्राने जिंकता येणार नाहीत, अशा परिस्थितीत निर्भय बना हा गांधीजींचा संदेशच उपयोगी ठरेल. गांधी विचार आचरणात आणायचा असेल तर त्याचा एक भाग म्हणून पर्यावरण रक्षणातही तरुणांना महत्त्वाची भूमिका बजावता येईल. भौतिक विकास करत असतांना निसर्ग संतुलन राखले जावे असाही त्यांचा आग्रह असायचा.सुविधा असाव्यात पण त्यांचे हाव नको, असं गांधीजींनी सांगितलं होतं. गरजेपेक्षा जास्त संपत्ती किंवा भौतिक गोष्टी म्हणजे विनाशकाल प्रगती असे गांधीजी म्हणत असत. गांधीजींनी टिळकांच्या स्वदेशीची रूपांतर खादीमध्ये केले तर राष्ट्रीय शिक्षणाचे रूपांतर नयी तालीम या संकल्पनेत केले. गांधीजींना आपल्या नयी तालीम या शिक्षण विचारांमध्ये स्वावलंबन आत्मसन्मान आणि श्रम प्रतिष्ठा ही तीन मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक विद्यार्थ्यास स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करावयाचे गांधीजींना वाटत होते. गांधीजींचा शिक्षणविचार मन,मस्तिष्क आणि मनगट यांना जोडणारा होता. ज्ञान, कर्म आणि उपासना या तीन प्रक्रियेतून शिक्षणाला उंची देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. महात्मा गांधींनी ज्या भारताचे स्वप्न पाहीले त्यात केवळ राजकीय स्वातंत्र्य अपेक्षित नव्हते, तर स्वच्छ भारत आणि विकसित भारत अशी त्यांची भारताची कल्पना होती. महात्मा गांधींच्या एकूणच विचारांचा कार्यात्मक प्रभाव आपल्यावर व्हावा, हीच महात्मा गांधींच्या १५० व्या जयंतीनिमित्य त्यांना खरी आदरांजली ठरेल !

- प्रा. विजय पांडे

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे नाव, लेखक	पृष्ठ
०१	गांधी विचार आणि भारतीय शिक्षणप्रणाली - **हर्षल अंबादास व्यवहारे**	
०२	मानवतावादी व अंहिसा - **माधव प्रभाकर हिरारकर**	
०३	महात्मा गांधी आणि मिठाचा सत्याग्रह - **सोमीनाथ सहाने**	
०४	महात्मा गांधी आणि पुणे करार - **जयश्री वाघ**	
०५	जग बदलयाचे असेल तर आधी स्वत:ला बदलवा – महात्मा गांधी - **स्वप्नील एकनाथ ढोके**	
०६	महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार व योगदान - **सय्यद करिश्मा जहाँगीर सय्यद**	
०७	महात्मा गांधी आणि सुधारणावादी कार्य - **अक्षय चौधरी**	
०८	महात्मा गांधी- **तेजस प्रकाश श्रीवास्तव**	
०९	महात्मा गांधी- **संगीता दशरथ हाडे**	
१०	महात्मा गांधी : जीवन चरित्र- **दीपाली सिद्धार्थ कांबळे**	
११	महात्मा गांधीजी- **कोमल सुभाष नरवडे**	
१२	महात्मा गांधी जीवन आणि कार्य - **मिरा तेजराव गाडेकर**	
१३	महात्मा गांधी जीवन आणि कार्य - **शितल राधाकिसन कोलते**	
१४	गांधी व त्यांचे विचार - **मानसी गुलाबराव पवार**	
१५	महात्मा गांधी - **प्रतिक्षा भाऊसाहेब पवार**	
१६	महात्मा गांधीजींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान - **पूजा बाळासाहेब डगळे**	
१७	महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता - **शितल भिकन गायके**	
१८	महात्मा गांधीजींनी अनुभवलेले विविध प्रसंग - **अश्विनी रमेश पवार**	
१९	महात्मा गांधी **-राणी पवार**	
२०	महात्मा गांधी - **सीमा जयाजी जाधव**	
२१	महात्मा गांधी - **पूजा संजय प्रधान**	
२२	राष्ट्रवाद पुनरुज्जीवन - **मोनाली भाऊसाहेब उबाळे**	
२३	महात्मा गांधींचे जीवनकार्य - **माधुरी गजानन महाले**	
२४	महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास - **दीपाली सुधाकर बोलकर**	
२५	बॅरिस्टर तर झालो; पण पुढे काय?- **अमोल डकले**	

२६ महात्मा गांधीचे स्वातंत्र्यसंग्रामातील महत्त्वाचे योगदान - **पूजा बबन राऊत**
२७ गांधीजींचा शैक्षणिक विचार - **निवृत्ती गाडेकर**
२८ महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार - **रुपाली सुधाकर पवार**
२९ महात्मा गांधी -ग्रामजीवन - **शुभांगी रमेश पवार**
३० महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसेविषयी विचार - **कोमल अनिल गायके**

महात्मा गांधींजींचा जीवनक्रम

१८६९ : २ ऑक्टोबर पोरबंदर येथे जन्म

१८७६ : राजकोटमध्ये शिक्षा आरंभ

१८८३ : कस्तुरबा यांच्याशी विवाह

१८८५ : पिताजींचा मृत्यू

१८८७ : मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण

१८८४ : सप्टेंबरला शिक्षणासाठी विदेशात रवाना

१८८९ : इंग्लडच्या निरामिषभोजीयांच्या सभेत पहिले सार्वजनिक भाषण

१८९१ : १० जूनला बॅरिस्टर झाले,७ जुलै मुंबईला पोहोचले,माताजींच्या मृत्यूची बातमी

१८९२ : राजकोट तथा मुंबईमध्ये वकील

१८९३ : एप्रिलमध्ये खटल्यासाठी दक्षिण आफ्रिकेला रवाना

१८९४ : ज्या खटल्यासाठी दक्षिणआफ्रिकाला गेले,त्याचा पंच फैसला झाला

१८९५ : नाताळ सुप्रीमकोर्टमध्ये वकील झाले,नाताळ भारतीय काँग्रेसचे संघटन

१८९६ : सहा महिन्यासाठी भारतात आगमन, टिळक, गोखले आदी नेत्यांच्या भेटी

१८९७ : डर्बन वापसीवर विरोधी प्रदर्शन,जीवनामध्ये महानपरिवर्तन

१८९९ : बोअर युद्धामध्ये इंग्रजांचे सहाय्य

१९०२ : बर्मायात्रा,मुंबईमध्ये ऑफिस,तीन महिनेनंतर दक्षिण आफ्रिकेला पुन्हा प्रस्थान

१९०३ : ट्रान्सवाल ब्रिटिश इंडिया असोसिएशन व इंडियन ओपिनियन यांची स्थापना

१९०४ : गीता अध्ययन,रस्किन यांच्या अन टू दिस लास्ट हे वाचून जीवनात क्रांतिकारी परिवर्तन फिनिक्स आश्रमाची स्थापना

१९०६ : झुलू विद्रोह,जखमींची सेवा, ब्रम्हचर्य राहण्याची प्रतिज्ञा,सत्याग्रह शब्दाचा अविष्कार,शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून इंग्लंडला रवाना

१९०७ : खुनी कायद्याविरुद्ध सत्याग्रह

१९०८ : अंतिम करार,पठाणद्वारा आक्रमण,पुन्हा सत्याग्रह प्रारंभ,अटक

१९०९ : परत दुसऱ्यावेळेस इंग्लंडला रवाना,परत येताना जहाजावर हिंदस्वराज्य लिहिले

१९१० : जोहान्सबर्गमध्ये टॉलस्टॉय फार्मची स्थापना

१९१२ : गोखल्यांची दक्षिण आफ्रिकायात्रा नीतिधर्म प्रकाशित

१९१३ : सत्याग्रह पुन्हा आरंभ,अटक आणि सुटका,सात दिवसाचा उपवास व साडे चार महिन्यापर्यंत एक वेळ भोजन

१९१४ : १४ दिवसाचा उपवास,करार व सत्याग्रहाची सफलता, १८ जुलैला इंग्लंड रवाना, ४ ऑगस्टपासून प्रथम महायुद्ध,सरोजिनी नायडू यांच्याशी परिचय

१९१५ : भारतात आगमन आणि कैसर-ए-हिंद पदकाची प्राप्ती,भारत-भ्रमण,काका कालेलकर व आचार्य कृपलानी यांच्याशी परिचय, २५ मे ला आश्रमाची स्थापना

१९१६ : काशी विश्वविद्यालयाची स्थापनेच्या दरम्यान प्रसिद्ध भाषण, लखनऊ काँग्रेसमध्ये जवाहरलाल नेहरू यांच्याशी पहिली वेळ भेट

१९१७ : राजेंद्रप्रसाद यांच्याशी पहिलीभेट, १० एप्रिल ला चंपारण्य सत्याग्रह, ३१ मे ला गिरमिटीया कायदा रद्द, ३० जूनला दादाभाई नवरोजीयांचे निधण,महादेवभाई देसाई यांच्याशी संपर्क

१९१८ : अहमदाबादमध्ये गिरणी कामगारांचा हडताळ आणि तीन दिवसांचा उपवास, खेडा सत्याग्रह, चरख्याचा पुनरुद्धार

१९१९ : रोलेट कायदा, ६ एप्रिलला प्रार्थना आणि उपवास दिवस, इंडिया व नवजीवन यांचे संपादन सुरु, खिलाफतद्वारा असहयोग,आंदोलन अमृतसर येथे काँग्रेस अधिवेशन

१९२० : २ ऑक्टोंबरला टिळक स्वराज्य पक्षाची स्थापना,गांधीजीद्वारा लिखित काँग्रेसचे संविधान स्वीकृत, असहयोग आंदोलन आरंभ,गुजरात विद्यापीठाची स्थापना

१९२१ : अन्य राष्ट्रीय विद्यापीठांची स्थापना,प्रिन्स ऑफ वेल्सयांच्या आगमनावर बहिष्कार त्यामुळे दंगा, अशांती, ५ दिवसाचा उपवास,अहमदाबाद येथे काँग्रेसचे अधिवेशन

१९२२ : ५ फेब्रुवारीला चौरीचौरा हत्याकांड,सत्याग्रह आंदोलन स्थगित, ५ दिवसाचा उपवास, १० मार्चला अटक, ६ वर्षाची शिक्षा

१९२४ : अपेंडिसायटीसचे ऑपरेशन, ५ फेब्रुवारीला सुटका, २४ सप्टेंबर हिंदू मुस्लिम एकतायासाठी २१ दिवसाचे उपवास,बेळगावयेथील काँग्रेसचे अध्यक्ष

१९२५ : एक सप्ताहाचा उपवास,कानपूर येथे काँग्रेस अधिवेशन,चरखा संघाची स्थापना

१९२८ : सायमन कमिशन, बारडोली सत्याग्रह,मगनलाल गांधी यांचा २२ एप्रिलला पटना येथे मृत्यू, १७ नोव्हेंबरला लाला लजपतराय यांचा मृत्यू,नेहरू रिपोर्ट

१९२९ : लाहोर काँग्रेसमध्ये पूर्णस्वातंत्र्याचा ठराव

१९३० : २६ जानेवारीला पूर्ण स्वातंत्र्याची प्रतिज्ञा, १२ मार्चला मीठ कायदा तोडण्यासाठी दांडीयात्रा, ५ मे ला अटक

१९३१ : २५ जानेवारीला सुटका, ४ मार्चला गांधी-आयर्विन करार,कराची काँग्रेस दुसरी गोलमेज परिषद भारताचे एकमेव प्रतिनिधी म्हणून सामील

१९३२ : काँग्रेस गैरकानूनी घोषित,सत्याग्रह पुन्हा आरंभ, ४ जानेवारीला अटक,नवजीवन इंडिया, यंग इंडिया पत्रबंद, २० सप्टेंबरपासून संप्रदायीक निर्णयाविरुद्ध आमरण उपोषण, २४ सप्टेंबरला येरवडा करार

१९३३ : ८मे पासून २१ दिवसांचे उपोषण,हरिजन पत्राचा प्रारंभ,सुटका, पुन्हा अटक,एक वर्षाची सजा, १६ ऑगस्टपासून आमरण उपवास,एक सप्ताह चालला, २३ ऑगस्टला सुटका, साबरमती आश्रमाचे विसर्जन, वर्धामध्ये राहण्याचा निश्चय

१९३४ : बिहार भूकंप, ७ मे ला सत्याग्रह स्थगित, ७ दिवसाचा उपवास, २६ऑक्टोबर ग्रामोद्योग संघ याची स्थापना,मुंबई काँग्रेस

१९३६ : १६ मेला डॉ. अन्सारी त्यांचा मृत्यू सेवाग्राम आश्रमाची स्थापना

१९३७ : जुलैमध्ये काँग्रेस पदग्रहण, नई तालीम सुरू

१९३९ : राजकोटमध्ये आमरण उपोषण,व्हाईसरायच्या हस्तक्षेपामुळे चार दिवसानंतर समाप्त,त्रिपुरी काँग्रेस

१९४० : ११ ऑक्टोंबरपासून वैयक्तिक सत्याग्रह,विनोबा भावे प्रथम सत्याग्रही,हरिजनपत्रावर बंदी

१९४१ : काँग्रेस नेतृत्वपासून मुक्ती, ३० सप्टेंबरला गो सेवासंघाची स्थापना

१९४२ : कांग्रेसचे पुन्हा नेतृत्व,हिंदुस्थानी प्रचार सभा स्थापना, ८ ऑगस्टला भारत छोडो प्रस्ताव, ९ ऑगस्टला भारतभरामध्ये नेत्यांची सामूहिक अटक

१९४३ : आगाखान महलमध्ये २१ दिवसाचा उपवास

१९४४ : २२ फेब्रुवारीला कस्तुरबा गांधी यांचे निधन, ६ मे ला तुरुंगातून सुटका, गांधीजींना कळाले

१९४५ : नेत्यांची जेलमधून मुक्तता,पहिली सिमला कॉन्फरन्स

१९४६ : सांप्रदायिक दंगे,नोआखाली पदयात्रा

१९४७ : १५ ऑगस्ट स्वातंत्र्य प्राप्ती,कलकत्तामध्ये ७३ तासांचा उपवास

१९४८ : दिल्लीमध्ये शांतीस्थापना तथा आमरण उपोषण,जे ५ दिवस चालले, ३० जानेवारीला मृत्यू

सहा देशांमध्ये गांधी कुटुंबातील १५४ जण

गांधीजींच्या वडील– करमचंद. आई पुतळाबाई.भाऊ लक्ष्मीदास,कृष्णदास, बहीण - रलियन.

मोहनदास यांना ४ मुले १३ नातवंडे आहेत. त्यांची नातवंडे आणि इतर वंशज जगात ६ देशांमध्ये असतात. यात १२ डॉक्टर, १२ प्रोफेसर, ५ अभियंते, ४ वकील, ३ पत्रकार, २ आयएएस,१ शास्त्रज्ञ,१ लेखाधिकारी,५ खासगी कंपन्यांमध्ये चांगल्या पदांवर आहेत. गांधीजींचे वंशज आज भारत, दक्षिण-आफ्रिका, इंग्लंड, कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिय या देशांमध्ये राहतात. गांधीजींना मुलगी नव्हती, याचे दुःख त्यांना नेहमीच राहिले.

गांधीजी आणि कस्तुरबा यांची मुले

हरिलाल (कुटुंबात ६८ सदस्य)

मणिलाल (कुटुंबात ३९ सदस्य)

रामदास (कुटुंबात १९ सदस्य)

देवदास (कुटुंबात २८ सदस्य)

संयुक्त राष्ट्राने २००७ मध्ये गांधी जयंतीला अहिंसा दिवस घोषित केले.

...जगमान्यता

टाइम मॅगझिनने आइनस्टाइनना निवडले. ते म्हणाले गांधीजी माझ्यापेक्षाही श्रेष्ठ !

टाइम मॅगझिनने आईनस्टाईननंतर गांधीजी शतकातील दुसऱ्या क्रमांकाचे महान क्रमांकाचे महान व्यक्ती असल्याचे म्हटले. पण आईन्स्टाईन गांधीजींना मानत असत.गांधीजींच्या ७५ व्या वाढदिवशी त्यांनी लिहिले,'हाडामांसाची अशी एक व्यक्ती होती यावर भावी पिढ्या विश्वासही ठेवणार नाहीत'.

गांधीजींना कधीही नोबेल मिळाला नाही, त्यांच्या ५ अनुयायांचा पुरस्काराने सन्मान

नाराजी टाळण्यासाठी संस्थेने नामांकित होऊनही गांधीजींना पुरस्कार दिला नाही. त्यांच्या विचारांवर चालणारे मार्टिन ल्युथर किंग, नेल्सन मंडेला, दलाई लामा, आंग सान सूफी, एडोल्फो यांना पुरस्कार दिला.

गांधीजींची दांडी यात्रा आजही जगातील पहिल्या १० आंदोलनात समाविष्ट आहे. यात गांधीजींसह ८०हजार लोकांना अटक झाली होती.

गांधीजींचे पाच प्रण

१. एप्रिल १९१७ कधीही चप्पल घालणार नाही:

१९१७ मध्ये गांधीजी काठियावाडी पोषाखात चंपारण्यात केले होते तेथील महिलांनी सांगितले की, इंग्रज निळीची शेती करण्यासाठी दबाव आणतात. त्यांना गुलाम म्हणून वागणूक देतात. इंग्रज कनिठ जातीच्या लोकांना चप्पल घालू देत नसत, हे ऐकून गांधीजींनी आयुष्यभर अनवाणी चालण्याची शपथ घेतली.

२. नोव्हेंबर १९१७: महिलेला पंचा देऊन वस्त्रत्याग:

८ नोव्हेंबर १९१७ रोजी गांधीजींच्या म्हणण्यानुसार कस्तुरबांना चंपारण्यातील महिलांना नीटनेटके राहण्याचा सला दिला. यावर एक महिला म्हणाली बाबा माझ्याकडे मी नेसते ती एकच साडी आहे, मग ती कशी धुवू? हे ऐकून गांधीजींनी तिला पंचा पाठवून दिला आणि नंतर त्यांनी कधीही अंगभर कपडे न घालण्याचे ठरवले.

३. मार्च१९१८: काठियावाडी पगडीचा त्याग : तिने चार शरीरे झाकता येतील.

१९१८ मध्ये गांधीजी अहमदाबादेतील कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांच्या संघर्षात उतरले. तेथे त्यांनी पाहिले की त्यांच्या पगडीच्या कपड्यात चार मजुरांचे शरीर झाकता येईल. त्याच वेळी त्यांनी पगडीचा त्याग केला. देशातील लाखो लोक वस्त्रहीन आहेत तेथे अशी पगडी अर्ध सत्याचे दर्शन घडवते, हे त्यांचे वक्तव्य होते.

४. ऑगस्ट १९२०: खादी कपड्यांचा स्वीकार:

खेडा येथील शेतकरी सत्याग्रहात खादी परिधान करण्याची शपथ घेतली.त्याकाळी विदेशात नेण्यासाठी शेतकऱ्यांवर कापूस पिकवण्याचा दबाव आणला जात होता. तेव्हा त्यांनी शपथ घेतली की यापुढे आयुष्यभर मी नेहमी हाताने विणलेले खादीचे कपडे वापरेन.

५. २२ सप्टेंबर १९२१: मदुराई धोती घालण्याची शपथ:

सप्टेंबर १९२१ मध्ये रेल्वेने मदुराईला जाताना गांधीजींनी लोकांना खादी कपडे घालण्याचा सल्ला दिला. लोक म्हणाले, आम्ही खूप गरीब असल्याने खादी घालू शकत नाही तेव्हा गांधीजी बनियन टोपी आणि धोती मध्ये होते.दुसऱ्यादिवशी त्यांनी मुंडन करून सामान्यांप्रमाणे छोटी धोती परिधान केली.

महात्मा गांधींनी वर्णिलेली सप्तपातके

तत्त्वाविना राजकारण | **श्रमाविना संपत्ती** | **नितिविना व्यापार** | **चारित्र्याविना शिक्षण**

सद्सदविवेक बुद्धीविना विलास | **मानवतेविना विज्ञान** | **त्यागाविना पूजा**

कर्तुत्वानुसार उपाधी

मोहन, मिस्टर गांधी, बापू, महात्मा व राष्ट्रपिता कधी कसे?

० वयाच्या १९ वर्षापर्यंत ते केवळ मोहन म्हणून ओळखले जात असत.

ऑक्टोबर १८६९ मध्ये जन्मल्यापासून १८८८ पर्यंत ते गुजरातमध्ये राहिले. तोपर्यंत ते सर्वांसाठी मोहनदास होते. सोळावर्षाचे होते तेव्हा वडील करमचंद गांधी यांचे निधन झाले. मुलाने शिक्षणासाठी परदेशात जावे अशी आईची इच्छा नव्हती, पण मुलाने हट्ट केला.

० २४ व्या वर्षी दक्षिण आफ्रिकेत त्यांना मिस्टर गांधी ही ओळख मिळाली.

१९८८ मध्ये बॅरिस्टर होण्यासाठी ते इंग्लंडला गेले. तीन वर्षानंतर १८९१ मध्ये परतले. दोन वर्ष बॉम्बे राजकोटमध्ये काम केले. तेथे मन रमले नाही. १८९३ मध्ये ते आफ्रिकेत गेले तेथे परिचित आणि मित्रमंडळींमध्ये ते मिस्टर गांधी म्हणून ओळखले जात.



० ४८ व्या वर्षी चंपारण्यात प्रथम बापू असे संबोधले गेले.

गांधीजी१५ एप्रिल १९१७ रोजी बिहारमधील चंपारण्य पोहोचले इंग्रजांविरोधात त्यांनी आंदोलन छेडले सत्याग्रहाच्या प्रयोगाची सुरुवातही याच चंपारण्यातून यातून झाली गांधीजींना हाक मारण्यासाठी राजकुमार शुक्ल यांनी येथेच सर्वप्रथम बापू हा शब्द वापरला.

० पन्नास वर्षे रवींद्रनाथ टागोरांनी पत्रात महात्मा उल्लेख केला

रवींद्रनाथ टागोर यांनी १२ एप्रिल १९१९ रोजी लिहिलेल्या पत्रात गांधीजींना महात्मा संबोधित केले. काही विद्वानांच्या मते १९१५ मध्ये राजवैद्यजी व राम शास्त्री यांनी पहिल्यांदा महात्मा म्हटले होते. त्याच वेळी त्यांना नवे संबोधन मिळाले.



० ७४ वर्षांचे होते तेव्हा नेताजींनी रेडिओ संदेशात राष्ट्रपिता म्हटले.

नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी ४ जून १९४४ रोजी सिंगापूर येथून रेडिओवर एक संदेश प्रसारित केला. त्यात त्यांनी गांधीजींना 'राष्ट्रपिता' असे संबोधले, गांधीजींच्या निधनानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी रेडियोवरून देशाला संबोधित करताना म्हटले 'राष्ट्रपिता आपल्यातून निघून गेले आम्ही सर्वजण निशब्द आहोत.

बापूंची ७९ वर्ष

महात्मा गांधींना ७९ वर्षांचे आयुष्य लाभले. या काळात त्यांनी १७ मोठी उपोषणे केली. ज्यात १४४ दिवस अन्नत्याग केला. २ वेळा २१-२१ दिवसांची उपोषणे त्यांनी केली. १९२१ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत दर सोमवारी उपोषण करण्याचा निर्धार केला. एकूण १३४१ दिवस ते उपोषणावर राहिले. १३ वेळा त्यांना अटक झाली. ६वर्ष ५ महिने कारावास तर २४ वर्ष विदेशात होते.

बापू रोज प्रवास करत त्यामुळे पत्रावर लिहिले जायचे... महात्मा गांधी असतील तेथे

नोट

पहिल्यांदा १९६९ मध्ये गांधीजी नोटेवर नोटेवर गांधीजी नोटेवर दिसले.

१९६९ मध्ये चलनी नोटेवर महात्मा गांधी पहिल्यांदा दिसले, हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. त्यांच्या प्रतिमेच्या मागे सेवाग्राम आश्रम देखील होता. ऑक्टोबर १९८७ मध्ये पहिल्यांदा ५०० रुपयाची नोट चलनात आली, त्यावरही गांधीजी होते. १९९३मध्ये बँकेने महात्मा गांधींची प्रतिमा सर्व नोटांवर मुद्रित करण्याची शिफारस केली. त्यानंतर १९९६मध्ये नोटांची गांधी मालिका सुरू झाली. तेव्हापासून १ आणि २ रुपये वगळता सर्व नोटांवर महात्मा गांधींची छबी मुद्रित केली जात आहे. १९६९ मध्ये १ आणि २ रुपयांच्या नोटेवर महात्मा गांधीजींची प्रतिमा छापण्यात आली.

पुतळे

पाकिस्तान, ब्रिटन, इराणसह १०० पेक्षा अधिक देशांमध्ये पाहायला मिळतात.

जगातील १०० पेक्षाही अधिक देशांमध्ये महात्मा गांधींचे पुतळे आहेत विशेषतः पाकिस्तान आणि ज्या ब्रिटिशांना या देशांमधून घालवले त्यांच्याच संसदेबाहेरही गांधीजींचा पुतळा आहे. ब्रिटिश संसदेच्या चौकात तर माजी पंतप्रधान चर्चिल यांचा पुतळा त्यांच्या शेजारी उभारला आहे. चर्चिल यांचा भारताला स्वातंत्र्य बहाल करण्यास विरोध होता आणि ते महात्मा गांधींना नंगा फकीर म्हणायचे. त्यांच्याच आदेशावरून उपोषणावेळी महात्मा गांधींची ग्लुकोज तपासणी करण्यात आली होती

रस्ते/शाळाः

देशातील ७१९ जिल्ह्यात एमजीरोड आणि शाळा

देशातील सर्व ७१९ जिल्ह्यांत महात्मा गांधींच्या नावे शाळा, रस्ते, इमारती, उद्याने आहेत. ७० शहरांमध्ये तेथील मुख्य रस्त्यांची नावे एमजीरोड अशी आहेत. ७० देशातील २५० पेक्षाही अधिक शहरातील रस्त्यांना महात्मा गांधींचे नाव आहे.महात्मा गांधींचे रस्त्यांना सर्वाधिक नाव भारतानंतर नेदरलँडमध्ये देण्यात आलेले आहे.

टपाल तिकीट

१५० देशातील ८०० तिकिटांवर बापू

१९४९ मध्ये महात्मा गांधींच्या ८० व्या जयंतीदिनी पहिल्यांदा त्यांचे टपाल तिकीट प्रकाशित झाले. याचे मुद्रण स्वित्झर्लंडमध्ये झाले १०० व्या जयंती वेळी ४० देशांनी ७० प्रकारचे टपाल तिकीट प्रकाशित केले. आतापर्यंत दीडशे देशांनी ८०० प्रकारची तिकिटे काढली आहेत. १९६९ मध्ये ब्रिटनने देखील महात्मा गांधींवर टपाल तिकीट काढले. त्यापूर्वी केवळ राजकारणातील व्यक्तींचीच टपाल तिकिटे काढली जात असत.

चित्रपट

गांधीजींवर ४५ चित्रपट आणि ५०० डॉक्युमेंटरी तयार करण्यात आल्या. त्यांच्या चरित्रावर आधारित चित्रपटाला ऑस्करदेखील मिळाला आहे. त्यांच्यावर ९० हजार पुस्तके लिहिली गेली. एमकेगांधीडॉटओआरजी साईट रोज २०० देशातील ८००० लोक पाहतात.

■■■

''गांधी विचार आणि भारतीय शिक्षणप्रणाली''

व्यवहारे हर्षल अंबादास
आर.जी.बगडीया कला, एस.बी. लखोटिया
वाणिज्य व आर.बेझनजी विज्ञान महाविद्यालय,
जालना.

आजच्या एकविसाव्या शतकात जे अनेक प्रश्न राष्ट्रासमोर उभे आहेत, त्या प्रश्नाचे समर्पक उत्तर मिळत नसल्याचे जाणवत आहे. ग्रामपातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत अनेक क्षेत्रात आमुलाग्र बदल होत आहेत. कागदोपत्री नियम, कायदे बनत आहेत. एका बाजूला प्रगतीचा आभास निर्माण होत असतांना दुसरी बाजू ज्यात बेकारी, असुरक्षितता, जातीयवाद, दहशतवाद, वाढती महागाई व परकीय गुंतवणुकीसाठी किरकोळ उद्योग क्षेत्रात होऊ घातलेले निर्णय इ. मुळे फारच निराशाजनक वाटत आहे. या अनेक समस्यांना गांधीवाद समर्पक उत्तर देवू शकतो, असे अनेकांना वाटायला नव्हे तर पटायला लागले आहे. त्यामुळे गांधीवादातील सत्य, अहिंसा, ग्रामस्वराज्य, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि शैक्षणिक विचार आजच्या अधांतरी राष्ट्राला एक निश्चित दिशा देऊ शकतात असे वाटते.

महात्मा गांधी म्हणजे एक अनोखे अष्टपैलू व्यक्तिमत्व होय. कोणतीही संकल्पना मांडतांना गांधीजी तिच्या मुळाशी जाऊन भूत, भविष्य आणि वर्तमानाचा अचूक वेध घेऊन संकल्पनेला मूर्तरूप देत. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. त्या स्पर्धेत आपला टिकाव लागण्यासाठी विविध क्षेत्रातील ज्ञान असणे गरजेचे आहे. स्वत:चा, समाजाचा नव्हे तर देशाचा विकास घडवून आणण्यासाठी आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय तसेच शैक्षणिक ज्ञान असणे आवश्यक आहे. विद्यार्थी दशेतच विद्यार्थ्यांनी आवश्यक ते ज्ञान प्राप्त करणे अत्यावश्यक आहे. कारण त्याचा परिणाम त्याच्या भावी जीवनावर पडतो. म्हणजेच खऱ्या अर्थाने राष्ट्रविकासावर पडतो. विद्यार्थी दशेत ज्ञान मिळवून आपला विकास न साधल्यास आपल्यावर बेरोजगारी, उपासमारीची वेळ येईल हे निश्चितच. देशातील वाढती बेरोजगारी व निरक्षरांची वाढती संख्या इत्यादी समस्या लक्षात घेऊनच महात्मा गांधीजींनी आपले शैक्षणिक विचार मांडले.

जीवन विकासाचे शिक्षण ।
गावीच असावे सर्व संपन्न ।
आपुल्याची ग्रामरचनेचे आयोजन ।
शोभावया शिकवावे।

वरील ओवींचा राष्ट्रसंत तुकडोची महाराज यांचा संदर्भ लक्षात घेता असे दिसून येते की, महात्मा गांधीजींचीही विचारधारा अशीच होती. कारण ग्रामोन्नती हा राष्ट्रोन्नतीचा महत्त्वपूर्ण घटक होय, असा त्यांचा विचार होता. म्हणून ग्रामोन्नतीचा पायाच शिक्षण आहे असे ते म्हणतात.

गावासी कैसे आदर्श करावे ।
याचेची शिक्षण प्रामुख्याने द्या ।

जीवन सुंदर करण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यात यावे व शिक्षणाद्वारे गाव आदर्श करून आपले जीवन सुंदर बनले पाहिजे असे मत महात्मा गांधीजींचे होते.

शिक्षणाचे प्रयोजन म्हणजे शिक्षणाद्वारे सुसंस्कृत पिढी निर्माण करणे हे होय. राष्ट्रनिर्मितीची जबाबदारी शिक्षणाची आहे कारण पारतंत्र्याच्या काळात भारतातील ग्रामीण शिक्षणाचा विकास झाला नाही. महात्मा गांधींनी

ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडून ग्रामीण शिक्षणावर भर दिला होता. स्वातंत्र्यानंतर सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. खेडोपाडी शाळा स्थापन झाल्या, ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा शिक्षणाचा कारभार पाहू लागल्या. ग्रामशिक्षणाला सुसूत्ररूप देण्यात आले. बालवाड्यांची व्यवस्था ग्रामपंचायतीकडे देण्यात आली. शिक्षणातील या पुनर्रचनेमागे महात्मा गांधीजींचे विचार अनमोल आहेत. 'मूल्योद्योगी शिक्षण योजना' म्हणजे गांधीजींनी शिक्षण क्षेत्राला दिलेली एक अनमोल देणगी आहे.

महिला शिक्षणावर अधिक भर :

महात्मा गांधीजींनी मूल्य शिक्षणाला अधिक महत्त्व दिले आहे. घरातील प्रत्येक व्यक्ती साक्षर असायला पाहिजे असे महात्मा गांधीजींचे मत होते. म्हणून प्रत्येक व्यक्तीला मूल्य शिक्षणाचे धडे दिले गेले पाहिजे असे गांधीजी म्हणतात. 'स्त्रीयांना शिक्षित करण्यावर त्यांनी अधिक भर दिलेला आहे'. घरातील एक माणूस शिक्षित झाला तर तो एकटाच शिक्षित होतो, परंतु घरातील एक स्त्री अर्थात माता शिक्षित झाली तर ती घरातील सर्व सदस्यांना शिक्षित करेल म्हणून स्त्रीयांना प्रथम शिक्षित केले पाहिजे हे महात्मा गांधीजींचे मत होते.

प्राचीन काळी स्त्रीयांना असलेली सामाजिक प्रतिष्ठा पुढे कमी-कमी होत गेली. बुद्धी, कर्तव्य आणि चातुर्याच्या बाबतीत स्त्री-पुरूषांनी एकत्र विचार विनिमय करून ठरवावे या विचारांचे महात्मा गांधीजी होते. कारण ते स्त्री-पुरूषांचा दर्जा समान मानत होते.

त्यामुळे महात्मा गांधीनी महिलांमध्ये स्वाभिमान, स्वालंबन, शैक्षणिक प्रसाराचे महत्त्व, राष्ट्रीय भावना व विश्वास आणि नेतृत्व जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. महिलाच जगाचा उध्दार करणारी महाशक्ती आहे. महात्मा गांधीजी संपूर्ण जगाला अहिंसेचा संदेश देणारे महान विभुती आहेत. त्यांनी स्वातंत्र्याबरोबरच राजनैतिक, सामाजिक समस्यांकडे लक्ष दिले. अस्पृश्यता ही मानवी समाजाला आतुन पोखरून खाणारी कीड आहे व तिचे निराकरण व्हावे यासाठी महात्मा गांधीजींनी अथक प्रयत्न केले. श्रीमंत व गरीब यांच्यातील भेदभावाची दरी कमी करण्यासाठी सत्य, अहिंसा व नैतिकतेला त्यांनी सर्वाधिक महत्त्व दिले.

श्रमाची अपरिहार्यता :

गांधीजींचा सर्वात महत्त्वाचा व क्रांतिकारी विचार म्हणजे 'कृतीद्वारे शिक्षण' आणि त्यासाठी शिक्षण पद्धतीमध्ये 'श्रमाची अपरिहार्यता' ही संकल्पना रूजवण्यासाठी केलेली धडपड हा होय. खरे म्हणजे कार्य व ज्ञान काही केल्या एकमेकांपासून वेगळे करणे शक्य नाही. आजपर्यंत मानव समाज जीवनातील विविध कृतीद्वारेच शिकत आला आहे. गांधीजींच्या मते श्रम व श्रम करतांना शिकावे म्हणजेच श्रम अथवा कृती शिक्षण पद्धतीचा कणा बनली पाहिजे. म्हणून शाळेला एखादी कार्यशाळा जोडण्यापेक्षा सर्व शाळा कार्यशाळाच बनल्या पाहिजेत. कृतिद्वारे मिळणाऱ्या शिक्षणामुळे आपण जे शिकतो त्याचा उपयोग करू शकतो, जे जाणतो ते वापरून बघू शकतो, असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतो. या आत्मविश्वासामुळे त्याचे ज्ञान व जीवन समृध्द व तेजस्वी होऊ शकते. असे शिक्षण कमी काळात व कमी खर्चात होऊ शकेल असा गांधीजींचा विश्वास होता. शिकतांना कमविणे व कमवितांना शिकण्याची ही प्रक्रिया विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवेल.

शिक्षणाचे तंत्र : कृती व ज्ञान

श्रमाचा तिरस्कार वाटणे ही राष्ट्राला अध:पतनाकडे नेणारी भयानक भावना आहे. ती कृतीद्वारे शिक्षण या पद्धतीने बदलू शकेल व बुद्धीजीवी आणि श्रमजीवी असा वर्गभेद संपवून वर्गविहीन व शोषणविहिन समाजरचना

निर्माण होऊ शकेल. हे बहुतेकांना मान्य आहे की, शिक्षणात श्रमाला स्थान असले पाहिजे. काहीजण कृतीला कमी महत्त्व देतात परंतु गांधीजी म्हणतात, ''खऱ्या शिक्षणाचे तंत्र हे कृती व ज्ञान यांच्या समन्वयाचेच तंत्र असले पाहिजे''. उत्पादक व विधायक कृती करतांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळत असते व त्या पद्धतीतून विद्यार्थ्यांची ज्ञानलालसा वाढत जाते. त्यांच्या जिज्ञासेचा व भावनांचा पूर्ण उपयोग केला जाऊन कामाचा आनंद त्यांना मिळू शकतो. परंतु, आज स्वकेंद्रित पिढी निर्माण होत आहे. प्रत्येकाला आज-आत्ता-ताबडतोब सर्वकाही पाहिजे आहे. मग त्यासाठी तो सर्व मूल्ये अगदी सहजपणे पायदळी तुडवतो आणि त्यातुनच नविन समस्या जन्माला येतांना आपल्याला दिसतात.

आजच्या विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावे याकरिता मूल्यशिक्षण देणे गरजेचे ठरते. त्या दृष्टिकोनातून महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार महत्त्वपूर्ण ठरू शकतात. महत्मा गांधी प्रणीत शिक्षण व्यवस्था म्हणजे चरखा आणणार का? असा प्रश्न विचारला जाऊ शकतो पण त्या चरख्याऐवजी संगणकाचा वापर करू शकतो. परंतु प्रश्न आहे त्या भूमिकेशी समरस होण्याचा. गांधीजी स्वत:ला तत्त्ववेत्ते न मानता वास्तववादातील आदर्शवादी मानतात.

महात्मा गांधीजींनी अनेक स्तरावर शैक्षणिक कार्य केले. त्यांनी बालकांपासून ते कुटुंबातील स्त्री तसेच प्रौढ व्यक्तींनासुद्धा शिक्षणाने शहाणे करून सोडले असले तरी मात्र आजच्या ई-युगामध्ये दूरदर्शन, दूरश्रवण यांच्या सहाय्याने खेड्यांचे झपाट्याने शहरीकरण होत आहे व श्रमप्रतिष्ठा कमी होऊन शहरी संस्कृतीच्या चंगळवादाकडे अविवेकाने ग्रामीण तरूण आकृष्ट होत आहे. आज सर्वत्र उदासीनता, भ्रष्ट्राचार, जातीयवाद, प्रांतवाद, गरीबी व योग्य शिक्षणाच्या अभावामुळे अनैतिकतेचे प्रश्न, अनेक रोगांबद्दल अपसमज, राजकीय भ्रष्टवृत्ती, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अप्रामाणिकपणा, आर्थिक विषमता, सामाजिक विषमता, संधी साधुपणाची वृत्ती, अविवेकी कृत्य, भोंदूगिरी, सरकारी दवाखान्यात आढळून येणारा बेजबाबदारपणा, कर्मचाऱ्यांची कामचोरवृत्ती, न्यायालयीन प्रक्रियेतील निकाल उशीरा लागणे, महिलांवरील वाढते अन्याय व अत्याचार उदा. निर्भया प्रकरण व कठुआ येथील सामुहिक बलात्कार प्रकरण तसेच वाढत्या वेगवान धकाधकीच्या जीवनात 'पैसाच काय ते सर्व' इत्यादीमुळे संस्कार व चारित्र्य विषयक समस्या निर्माण झालेल्या आहेत. आजच्या प्रगत विज्ञानाच्या मानव शेतीसोबत यंत्र व यंत्रासोबत इलेक्ट्रोमिडियाच्या जगात आहे. तर्कसंगत व सुरचित विज्ञानाच्या आधारावर मानवाने भौगोलिक क्षेत्र, वैज्ञानिक क्षेत्र, दळणवळण, दूरसंचार, अन्न, वस्त्र, निवारा, कृषी व ऊर्जा यामध्ये वेगवेगळे शोध लावून भौतिक प्रगती साधलेली आहे. ॲन्टीबायोटिकल, रेल्वे, विमान, रेडिओ, संगणक, सायकलपासून ते अवकाशयानापर्यंत मानव प्रगत झालेला आहे. यामुळे यंत्रे विकसीत होऊन कमी वेळात जास्त काम करणे शक्य झाले व व्यवहारात अचुकता व पारदर्शकता आली. अंधश्रद्धा निर्मुलनास मदत तर झाली, परंतु नरेंद्र दाभोळकर व कॉम्रेड पानसरे यांच्या सारख्यांना मात्र आपले जीवन गमवावे लागले. वेगाने जागतिकरण झाले पण त्याचबरोबर मानवाची भोगवृत्ती वाढीस लागली.

या पार्श्वभुमीवर गांधी विचारांना आजच्या भारतीय शिक्षण प्रणालीत महत्त्वाचे स्थान आहे. मानवाच्या जीवनात उद्भवणाऱ्या समस्या म्हणजे लाभोन्मदी अर्थशास्त्र, कामोन्मदी मानसशास्त्र व भोगन्मदी समाजशास्त्रांची अपत्य आहेत असे म्हणता येईल. कारण मानवाच्या गरजा अमर्याद आहेत मात्र त्यांची पुर्तता करण्यासाठी लागणारा पैसा हा मर्यादितच आहे. त्यामुळे मानवाला वाटेल ती स्पर्धा करावी लागते. तसेच मानवाच्या सर्व क्रियाकल्पांच्या मुळाशी फडत उपभोगतच आहे. तसेच बलशाली असेल तोच जगेल हा न्याय.

या सर्व समस्यांची उत्तरे म. गांधींनी स्वत:च्या जीवन आचरणातून व 'नयी तालीम' शिक्षण पद्धतीद्वारे मांडून दिलेली आहे. म्हणून गांधीजी म्हणतात, 'माझे जीवनच माझा संदेश आहे'. गांधीजी हे खऱ्या अर्थाने शिक्षणशास्त्रज्ञ होते. त्यांनी वाचनालयात बसून शिक्षण पद्धती विकसित केलेली नसून सतत रोजच्या अनुभवातून व प्रयोगाद्वारे 'नयी तालीम' विकसित करून इ. स. १९३७ मध्ये देशासमोर ठेवली. गांधीजींनी देशाला दिलेली सर्वोच्च भेट म्हणजे 'नयी तालीम' होय. व्यक्ती विकासाच्या संदर्भात शरीर, बुद्धी व आत्मा यांचा एकत्रित विकास करणारे 'नयी तालीम' हे माध्यम आहे. तसेच सामाजिक संदर्भात रामराज्य किंवा ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून विकसित राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी 'नयी तालीम' हे अहिंसक क्रांतीचे वाहक आहे. नयी तालीमचा उद्देश व्यक्तीचा संपूर्ण विकास! व्यक्तीच्या आंतरिक गुणांचा संपूर्ण व संतुलित विकास करून त्याला श्रेष्ठ नागरिक बनवणे असा होय. त्याच्यामध्ये नि:स्वार्थ भावना, समाजसेवा, कर्तव्य, परायणता, सत्य-अहिंसा, समाज निर्मितीची प्रक्रिया आहे. 'नयी तालीम' म्हणजे नवीन मूल्यांची स्थापना होय. ती सर्वांना उद्योगशील व विचारशील बनविते. नयी तालीम ही समाजामध्ये कर्मप्रतिष्ठा निर्माण करून कर्माचा बुद्धीसोबत मेळ घालून देते. यामुळे लोक साक्षर बनत नसून शिक्षित व वैज्ञानिक बनत चालले आहे.

महात्मा गांधीजींच्या 'नयी तालीम' व 'वर्धा शिक्षण योजना' नावाजलेल्या होय. वय वर्ष ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यात यावे व प्राथमिक शिक्षण स्वयंपूर्ण व पायाभूत स्वरूपाचे असावे. शिक्षणाचा मुळ उद्देश मनुष्याचा सर्वांगीण विकास करणे हा होय. केवळ पुस्तकी कीडा न होता व्यवहार ज्ञानही मनुष्याला या शिक्षणाद्वारे प्राप्त व्हावे असे गांधीजींना वाटायचे.

मातृभाषेतून शिक्षण देण्यात यावे यावर त्यांचा अधिक जोर होता. 'कारकुनी शिक्षण' पद्धती बदलून त्या जागी 'मुलोद्योगी शिक्षण' पद्धतीचा पुरस्कार, 'नयी तालीम' हे शिक्षण सुरू करावे व या शिक्षा पद्धतीद्वारे व्यवसाय शिक्षण देवून उद्योगातून मुलांमधील संपूर्ण माणूस घडवावा. त्याचप्रमाणे मनुष्याने स्वावलंबी होऊन शारीरिक कार्य करून आपला उदरनिर्वाह चालवायचा असे गांधीजींचे विचार होते.

महात्मा गांधीजी म्हणतात की , 'My Nai Talim is not dependent on money. The running expenses of this education should come from the educational processes itself whatever the criticism may be I know that the only education is that which is self-supporting.' त्याचप्रमाणे महात्मा गांधीजींनी उम म्हणजे Hand-Head-Heart यांच्या विकासावर भर दिला. थोडक्यात गांधीजींचे शैक्षणिक तत्त्वज्ञान म्हणजेच उद्योगशीलता, आत्मोन्नती व बुद्धीमत्ता यांचा समन्वय होता.

आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये व पुर्वीच्या शिक्षण पद्धतीमध्ये फार मोठी तफावत दिसून येते. आजचा तरूण संगणक व इंटरनेटच्या इतका आधीन झाला अहे की, तो पुर्णत: परावलंबी जीवन जगत आहे असे वाटते, कारण शाळा व महाविद्यालयांमध्ये दिले जाणारे प्रात्यक्षिक कार्य हे संगणकाचा वापर करून पूर्ण करीत आहे. म्हणून महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील भारत व आजचा भारत यामध्ये मोठी तफावत आहे. कारण आजचा तरूण शिक्षणाने शहाणा तर झाला, परंतु त्याची वागणुक मात्र अज्ञानी व्यक्तीप्रमाणेच आहे.

गांधीजींना निर्व्यसनी समाज अपेक्षित होता. मद्यपान करणे अतिशय वाईट आहे. त्यामुळे व्यक्तीचे शारीरिकच

नव्हे तर नैतिक अध:पतन होते आणि ग्रामविकासातील तो एक मोठा अडथळा ठरू शकतो. आजच्या तरूणांच्या अशा वागण्यामुळे कुठेतरी तो आपले संस्कार आणि चांगले ज्ञान विसरत चाललेला आहे. म्हणून महात्मा गांधीजींनी प्रकट केलेले शैक्षणिक विचार कुठेतरी नाश पावत आहेत, असे मला वाटते.

जगाने आज महात्मा गांधी व त्यांच्या विचारधारेला स्वीकारले आहे. अल्बर्ट आईन्स्टाईन पासून ते रिचर्डस ॲटनबरोपर्यंत, रविंद्रनाथ टागोरांपासून ते विनोबांपर्यंत आणि मार्टिन ल्युथर किंगपासून नेल्सन मंडेला इत्यादी विचारवंताचे आदर्श महात्मा गाधीजी होते तर मग आपल्या भारतात त्यांचे शिक्षण विषयक विचार प्रत्यक्षात आणायला नको का?

आज समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होऊनही अनैतिकता, भष्ट्राचार, हिंसाचार, देशद्रोहवादी, जातीयवाद, प्रांतवाद, व्यक्तीवाद, नक्षलवाद, आतंकवाद, वैचारिक दारिद्र्य, शिक्षणाचे अध:पतन, सांस्कृतिक मूल्यांचे अध:पतन, पाश्चिमात्यांचे अंधानुकरण, व्यसनाधिनता इत्यादी अनेक भीषण समस्या निर्माण झाल्या आहेत. यावर उपाय म्हणून गांधी विचारांचे लेखन, मनन व चिंतन होणे गरजेचे आहे. कारण आजच्या आधुनिक युगामध्ये दळणवळणाच्या व माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेली प्रचंड मोठी प्रगती व या सोबतच तरूण वर्गाची भरकटलेली दिशा आणि भारतातील इतर अनेक प्रश्नांची उत्तरे गांधीजींच्या शिक्षणविषयक विचारांमध्येच मिळतात. हे गांधीजींचे विचार जगाला केवळ सांगून चालणार नाही तर प्रत्यक्ष कृतीतून हे जाणीवपूर्वक पटवून द्यावे लागतील. कारण त्यांच्या विचारांची महिती कदाचित आजच्या पिढीला अजूनही फारशी कळालेली नाही.

आज शिक्षणाचा जीवनाशी असलेला संबंध तुटलेला असतांना पारंपारिक हुन्नर शिक्षणामुळे नष्ट होत असतांना, कष्ट करण्याची कृती शिक्षणामुळे लोप पावत असतांना, मिळणारी पदवी तरूणांना जीवन जगण्यास समर्थ करहत नाही. महात्मा गांधी शिक्षण, उत्पादन, आर्थिक विकास, श्रमप्रतिष्ठा इत्यादी मूलभूत बाबींना प्राधान्य देवून आजच्या शिक्षण पद्धतीने विद्यार्थ्यांना जीवन जगण्यास सक्षम बनवावे असे ते आग्रहाने सांगतात. शिक्षणाद्वारे केवळ माहिती साठवून चालणार नाही तर त्या ज्ञानाचा उपयोग जीवनामध्ये करणे आवश्यक आहे. त्यामुळे महात्मा गांधींनी शिक्षण क्षेत्रात वेगवेगळ्या युगानुकुल संकल्पना मांडल्या. 'वर्धा शिक्षण पद्धती', 'नयी तालीम' तसेच 'मुलोद्योगी शिक्षण' या सारख्या वास्तवाचे भान ठेवणाऱ्या व रोजगाराभिमुख शिक्षणप्रणालींचा अवलंब जर आज भारतीय शिक्षण प्रणालीत झाला असता तर आज दिसणारी बेकारांची सेना कुठल्यातरी उत्पादक क्षेत्रात किंवा उद्योगक्षेत्रात निश्चितच गुंतलेली आपल्याला पहावयास मिळाली असती.

म्हणून अल्बर्ट आईन्स्टाईन शाशंकपणे म्हणतो - ''अशा तऱ्हेचा (महात्मा गांधी) नावाचा चालता बोलता जीवंत हाडामासाचा एक माणूस भूतलावर होऊन गेला यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणार नाही.'' असे होऊ नये याकरीता आजच्या शिक्षण प्रणालीत परिवर्तन करून ती महात्मा गांधीजींना अभिप्रेत असलेल्या विचारधारेवर आधारित असणे अत्यावश्यक झाले आहे.

■ ■ ■

जग बदलायचे असेल तर आधी स्वत:ला बदलवा. **- म. गांधी**

''मानवतावादी गांधी व अहिंसा''

माधव प्रभाकर हिरारकर

जे.ई.एस.कॉलेज, जालना.

गांधीजींचे नाव मोहनदास. त्यांच्या वडीलांचे नाव करमचंद आणि आईचे नाव पुतळीबाई. गांधीजींचा जन्म गुजरातमधील पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. गांधीजी नेहमी खरे बोलत. आईवर आणि गुरूजी वर त्यांची फार श्रद्धा होती. ते विलायतेत जाऊन बॅरिस्टर होऊन भारतात परत आले आणि येथील स्वातंत्र्य चळवळीची जबाबदारी सांभाळून भारत देशाचे ते 'बापू' झाले. त्यांनी सत्य, अहिंसा, शांती, असहकार चळवळ, सत्याग्रह इत्यादी मार्गानी बलाढ्य इग्रंज साम्राज्याशी मोठ्या नेटाने झुंट दिली. स्वराज्य मिळवण्यासाठी त्यांना अनेक वेळा तुरूंगवास भोगावा लागला; उपोषण आणि सत्याग्रह करावे लागले.

गांधीजींची राहणी अगदी साधी होती. ते पंचा नेसत. झोपडीत राहत लोकांचे जीवन सुखी करण्यासाठी गांधीजी रात्र-दिवस झटत असत. गरिबांना काम मिळावे म्हणून त्यांनी चरख्याचा प्रचार सुरू केला. गरीब-श्रीमंत असा भेदभाव ते मानत नसत. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी गांधीजींनी खुप प्रयत्न केले. दलित जनतेस 'माणूस' म्हणून जगण्याची शिकवण दिली. ते खरोखरच 'राष्ट्रपिता' होते. गांधीजींना 'बापूजी', 'महात्मा', आणि 'राष्ट्रपिता' या नावांनी ओळखले जाते. महात्मा गांधी यांची एका शब्दांत ओळख करून द्यायची झाली तर त्यासाठी समर्पक शब्द आहे 'महामानव'. गांधीजी स्वत:ला नेहमी 'एक सामान्य माणूस' मानत असत. त्यांनी आपल्या हातून घडलेल्या चुका प्रामाणिकपणे कबुल केल्या आणि कोणताही कमीपणा न बाळगता त्या सुधारण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला. कोणत्याही महान गोष्टीचे मोजमाप करण्यासाठी मानदंड वापरला जातो. मानवतेचे मापन करण्यासाठी वापरला जाणारा मानदंड म्हणजे 'गांधीजी होय'.

महात्माजींनी कोणतेही काम करताना मानवजातीचा विचार केला. ते वकिलाचा व्यवसाय करण्यासाठी आफ्रिकेत गेले होते. पण तेथील भारतीयांची दैन्यावस्था पाहून ते त्यांच्यामागे उभे राहिले. तेथील भारतीय जनतेवर ते अमानुष कायदे लादले गेले होते, त्यांच्याविरूद्ध ते खंबीरपणे झगडले. भारतात परत आल्यावर त्यांनी प्रथम संपूर्ण भारताचा प्रवास केला. सामान्य भारतीय हा अर्धनग्न अवस्थेत वावरतो, अर्धपोटी जगतो, हे पाहून ते अस्वस्थ झाले. त्यांनी आपल्या पोषाखात, आपल्या आहारात आमुलाग्र बदल केला. भव्य प्रासादतुल्य बंगल्यात राहण्यापेक्षा भंगी कॉलनीत राहणे त्यांनी पसंत केले. सर्व लोकांना समाजात समान वागणूक हवी असे आग्रहपूर्वक सांगणारे महात्माजी कचराकुंडी साफ करण्याचे काम करायला स्वत: सदैव पुढे येत असत. मीठ म्हणजे सामान्य माणसाच्या दैनंदिन गरजेचे प्रतिकच! त्या मिठावर बसवलेला कर त्यांना अन्यायकारक वाटला. म्हणून त्या अन्यायाविरूद्ध झगडण्यासाठी महात्माजींनी 'दांडी यात्रा' काढली. महात्माजींनी कधीही कोणत्याही मानसन्मानाची अपेक्षा केली नाही. म्हणून तर भारतात स्वातंत्र्याचा सोहळा साजरा होत असतांना ते नौखालीला दु:खितांचे अश्रु पुसायला गेले होते. सर्व धर्मातील व सर्व जाती-जमातीतील जनतेने एकदिलाने

राहावे, यासाठी ते जीवनभर झटले. एका प्रार्थनासभेत त्यांची भीषण हत्या झाली.

तुमच्या जवळ जास्त असलेली भूमी 'भूमिहिनांना द्या' असा संदेश देणारे 'विनोबा भावे' आपल्या लहानपणाच्या आठवणी सांगतात. बालवय हे संस्कारक्षम वय असते. त्या मुलावर जसे संस्कार होतील त्यातून मूल घडते. ज्या घरात एकमेकांशी आदर आहे, बोलण्यात मार्दव आहे, कामात शिस्त आहे त्या घरातील मुलेही नम्र, आदबशीर वर्तनाचे, दुसऱ्यांना योग्य मान देणारे आणि वक्तशीर बनते. याउलट ज्या घरात बेशिस्तपणा आहे. उद्धटपणा आहे व दुर्वर्तनाचाच संचार आहे, त्या घरात लहान वयातच मुलावर वाईट संस्कार होतात. संस्कारातून जडलेल्या सवयी माणसाच्या पुढील संबंध आयुष्यात चिकटून राहतात.

महात्माजींनी बालवयात हरिश्चंद्रावरील नाटक पाहिले होते. ते त्यांना विलक्षण आवडले आणि त्यातुनच गांधींवर सत्यप्रियतेचा संस्कार झाला. शालेय जीवनात शिक्षकाचे चारित्र्य विद्यार्थी मनावर थोर संस्कार घडवते. वेळेचे महत्त्व पाळणे, आपल्या कर्तव्याविषयी जागरूक असणे, दुसऱ्यांच्या मदतीसाठी नेहमी तयार असणे हे संस्कार बालपणी अगदी नकळत होत असतात. अनेक वर्षे गुलामगिरीत राहिलेल्या आपल्या मनावर राष्ट्रप्रेमाचे संस्कार व्हावयास हवेत, त्यातच आपले व राष्ट्राचे हित आहे.

■ ■ ■

कुणालाही जिंकायचं असेल तर प्रेमाने जिंका.
- म. गांधी

महाविद्यालयातर्फे दिले जाणारे
पुरस्कार
शैक्षणिक वर्ष
२०१८-१९

सावता भूषण पुरस्कार २०१९
लक्ष्मीकांत कारभारी ढेपले,
बी.कॉम तृतीय वर्ष

कै. धूपाजी खोतकर पुरस्कार २०१९
प्रियंका शेषराव गायकवाड,
बी. ए. तृतीय वर्ष

उत्कृष्ठ ग्रंथवाचक पुरस्कार २०१९
ज्योती रमेश उदे,
बी. ए. तृतीय वर्ष

लक्ष्मीकांत कारभारी ढेपले,
बी.कॉम. तृतीय वर्ष

दिव्या संतोष ढंगारे,
बी. एस्सी. द्वितीय वर्ष

''महात्मा गांधी आणि मिठाचा सत्याग्रह''

सोमिनाथ सहाने

श्री संत सावता माळी कॉलेज, फुलंब्री.

''जेव्हा मी निराश होतो, तेव्हा मी स्मरण करतो की, इतिहासात प्रत्येक वेळी सत्य आणि प्रेमाचाच विजय होत आला आहे. अनेक क्रुरकर्मे होऊन गेले आणि काही काळासाठी ते अजिंक्य पण वाटले. पण नेहमी शेवटी त्यांचा पराभवच झाला आहे.''

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यलढ्या दरम्यान झालेला मिठाचा सत्याग्रह हा भारतातील तत्कालीन ब्रिटीश शासनाने मिठासारख्या जीवनावश्यक गोष्टीवर लावलेल्या कराच्या विरोधात इ. स. १९३० साली घडलेला सत्याग्रह होता. यालाच दांडी सत्याग्रह असेही म्हणतात. १४ फेब्रुवारी १९३० रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने जनतेला गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग करण्याचा ओदश दिला. मिठाचा सत्याग्रह याच चळवळीचा भाग होता.

दांडी या (सध्याच्या गुजरात राज्यातील) समुद्रकिनारी असलेल्या गावातील स्थानिक लोकांचा समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करण्याचा पारंपारिक व्यवसाय होता. ब्रिटीश सरकारने मिठावर कर बसवला आणि समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करण्याचे काम बेकायदेशीर म्हणून जाहीर केले. हे काम बंद पाडण्यासाठी बळाचा वापर सुद्धा केला. या दडपशाही विरोधात कर भरण्यास नकार आणि अहिंसक लढा या मार्गाने आंदोलन करण्याचे गांधीजींनी ठरवले.

दांडी यात्रा आणि सत्याग्रह

मिठाच्या सत्याग्रहाची सुरुवात दांडी यात्रेने झाली. ही दांडी यात्रा साबरमती आश्रमापासून १२ मार्च १९३० रोजी सुरु झाली. गांधीजींच्या बरोबर त्यांचे ७८ निवडक अनुयायी होते. त्यात सरोजिनी नायडू, इलाभट यांचा समावेश होता. यात्रा पुढे निघाली, तसतशी सहभागी लोकांची गर्दी वाढतच गेली. ही यात्रा २४ दिवस चालली आणि तिच्यातील लोक ३८५ किलोमिटर पर्यंत पायी चालले. यात्रा दांडी येथे समुद्रकिनारी ६ एप्रिल १९३० ला पोहोचली. त्या दिवशी जेव्हा सकाळी साडे सहा वाजता गांधीजींनी चिमुटभर मीठ उचलुन कायदेभंग केला, तेव्हा कायदेभंगाच्या मोठ्या प्रमाणावरील चळवळीची ही सुरुवातच ठरली. दांडीनंतर गांधीजी मीठ बनवत आणि सभांमध्ये भाषणे करीत. ते समुद्र किनाऱ्याने दक्षिणेकडे जात राहिले. दांडीच्या दक्षिणेला २५ मैलांवर सलेल्या धारासना या ठिकाणी मिठाचा सत्याग्रह करण्याचे काँग्रेस पक्षाने ठरवले. पण त्यापुर्वीच ४ मे १९३० च्या रात्री गांधीजींना अटक करण्यात आली. दांडी यात्रा आणि धारासना येथील सत्याग्रह यामुळे सर्व जगाचे लक्ष भारतीय स्वातंत्र्य लढ्याकडे वेधले गेले. मिठाचा सत्याग्रह म्हणजे असहकार चळवळीचा एक भाग होता. प्रत्यक्षात मिठावरचा कर हे केवळ निमित्त होते. गांधीजींना त्यानिमित्ताने लोकसंघटन आणि लोकजागृती साधायची होती. मिठावरील कराच्या विरोधातील हे आंदोलन पुढे वर्षभर सुरु राहीले. गांधीजींची तुरुंगातून सुटका आणि लॉर्ड आयर्विन यांच्याशी दुसऱ्या गोलमेज परिषदेतील चर्चा झाल्यावर हे आंदोलन थांबले. मिठाच्या सत्याग्रहाच्या आंदोलना दरम्यान ६०,००० हून अधिक भारतीय तुरूंगात गेले.

ओरिसातील मिठाचा सत्याग्रह : दांडी येथील सत्याग्रहापूर्वीच ओरिसात उत्पादित होणाऱ्या मिठावर ब्रिटीशांनी

बसवलेल्या करामुळे तिथे १९२९ सालापासून आंदोलन सुरुच होते. तिथे मीठ तयार करण्यावर बंदी घालण्यात आल्यामुळे वातावरण तापलेले होते. गांधीजी दांडीला पोचण्यापूर्वीच ओरिसामधील लोकांनी मिठाचे उत्पादन सुरु ठेवण्याचा निर्धार केला. कटक येथे ओरिसाच्या वेगवेगळ्या भागातून स्वयंसेवक जमा झाले. मिठाच्या सत्याग्रहाबद्दल जाहीर सभा घेण्यात आल्या. या सभेत भाषणे करणाऱ्यांना ब्रिटीश सरकारने अटक करुन तुरुंगात टाकले. ६ एप्रिलला गोपबंधू चौधरी आणि आचार्य हरिहर दास यांच्या नेतृत्वाखाली २१ सत्याग्रहींच्या तुकडीने स्वराज आश्रम, कटक येथून इंचुरी येथे मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी पायी जाण्यास सुरुवात केली. ९ एप्रिलला चांडोल येथे गोपबंधू चौधरी यांना अटक झाली. तरी यात्रा सुरुच राहिली. १३ एप्रिलला इंचुरी येथे पोचलेल्या हजारो सत्याग्रहींनी मुठभर मीठ हातात घेऊन कायदा मोडत पोलिस त्यांना अटक करत. मग सत्यागृहींची पुढची तुकडी पुढे येत असे. सर्व तुरुंग भरुन गेले. तरी आंदोलनात नवीन लोक सहभागी होतच होते. इंचुरीमधील सत्याग्रहात महिलांची संख्या लक्षणीय होती. काही निदर्शने महिलांनी आयोजित केली होती. शेवटी सर्व सत्याग्रहींची तुरुंगातून सुटका झाली. तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी हजारो लोक जमले होते.

मिठाचा सत्याग्रह म्हणजे असहकार चळवळीचा एक भाग होता. मिठाच्या सत्याग्रहाने स्वातंत्र्य लढ्याला मोठे बळ मिळाले. जग बदणाऱ्या १० महत्त्वपूर्ण आंदोलनात या सत्याग्रहाचा समावेश टाईम नियतकालिकाने केला आहे.

■ ■ ■

भित्तीपत्रके २०१८-१९

विषय	प्रकाशन दिनांक	भित्तीपत्रकाचा विषय
मराठी	०१/१०/२०१८	माध्यमांतर
	२७/०२/२०१९	मराठीतील प्रथम
हिंदी	१८/०९/२०१८	भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी
	२२/०२/२०१९	राष्ट्रभाषा हिंदी
इंग्रजी	04/10/2018	Parts of Speech
	03/01/2019	Business Communication
इतिहास	११/०९/२०१८	सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती
	२०/०२/२०१९	पानिपतच्या लढाया
राज्यशास्त्र	१५/०८/२०१८	महाराष्ट्र राज्याचे विधीमंडळ
	२८/०२/२०१९	भारतीय लोकशाही समोरील आव्हाने
अर्थशास्त्र	१०/१०/२०१८	किमान आधारभूत किंमती
	१२/०२/२०१९	केंद्रीय अंतरिम अर्थसंकल्प
समाजशास्त्र	१७/०९/२०१८	बालगुन्हेगारी
	२६/०१/२०१९	शाश्वत विकास
वाणिज्य	11/09/2018	Historical India Rupees Rate (Ind / USD)
	09/01/2019	Grahak Sanrakshanasathi Kayade

महात्मा गांधी आणि पुणे करार

जयश्री वाघ

श्री संत सावता माळी कॉलेज, फुलंब्री.

पुणे करार हा २४ सप्टेंबर १९३२ रोजी महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन प्रमुख भारतीय नेत्यांमध्ये झाला. दलितांना स्वतंत्र मतदार संघाऐवजी सर्व प्रांतांमध्ये सर्वसाधारण मतदार संघात लोकसंख्येच्या प्रमाणात जागा हव्यात. हा त्यांचा मुख्य मुद्दा होता. त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित मदनमोहन मालवीय, सी. राजगोपालचारी आदींच्या सह्या आहेत. हा करार 'पुणे करार' या नावाने ओळखला जातो.

पुणे करारातील अटी खालीलप्रमाणे आहेत.

१) प्रांतिक विधानसभेत साधारण निवडणूक क्षेत्रातील जागांपैकी दलित वर्गासाठी १४८ जागा जाखीव ठेवण्यात येतील. राखीव जागांची प्रांतानुसार विभागणी खालीलप्रमाणे होती.

प्रांत	**जागा**	**प्रांत**	**जागा**
मद्रास	३०	मध्यप्रांत	२०
बॉम्बे आणि सिंध	१५	आसाम	७
पंजाब	८	बंगाल	३०
बिहार आणि ओरिसा	१८	संयुक्तप्रांत	२०
		एकूण	**१४८**

२) या जागांची निवडणूक संयुक्त पद्धतीद्वारे केली जाईल. जसे दलित वर्गाचे सर्व सदस्य ज्यांची नावे त्या निवडूक क्षेत्राच्या यादीमध्ये नोंदवलेली असतील. त्यांचे एक मंडळ नेमणूक करुन बनवले जाईल. जे प्रत्येक राखीव जागेसाठी दलित वर्गातील चार उमेदवारांचे पॅनेल निवडेल. ही निवड पद्धती एकमतीय आधारावर होईल. अशा प्राथमिक निवडीमध्ये ज्या चार सदस्यांना सर्वाधिक मते मिळतील ते साधारण निवडणूक क्षेत्राचे उमेदवार समजले जातील.

३) केंद्रीय कार्यकारिणीमध्ये दलित वर्गाचे प्रतिनिधीत्व वरील दोन प्रकारे होईल.

४) केंद्रीय कार्यकारिणीमध्ये दलित वर्गाच्या राखीव जागांची संख्या १३ टक्के असेल.

५) उमेदवारांच्या पॅनलच्या प्राथमिक निवडीची व्यवस्था पाहिल्या दहा वर्षांनंतर समाप्त होईल. दोन्हीही पक्षाच्या आपापसातील संमतीने कमल सहानुसार त्याकालावधीपूर्वी देखील समाप्त केला जाऊ शकेल.

६) प्रांतीय व केंद्रीय कार्यकारिणीत दलितांच्या जागांचे प्रतिनिधीत्व जसे एक व चार मध्ये दिले आहे, तोपर्यंत आंमलात येईल जोपर्यंत दोन्हीही संबंधित पक्षाद्वारे आपापसात समझोता होऊन त्यास हटविण्यासाठी निर्णय घेतला जाईल.

७) केंद्रीय व प्रांतिक कार्यकारिणीच्या निवडणूकीसाठी दलितांच्या मतदानाचा अधिकार लेथियन कमिटीच्या अहवालाप्रमाणे असेल.

८) दलित वर्गाच्या प्रतिनिधींना स्थानिक निवडणूका व सरकारी नोकरीत अस्पृश्य असल्याने ठरविले जाता कामा नये. दलितांच्या प्रतिनिधित्वास (संख्येने) पुरे करण्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न केले जातील व सरकारी नोकऱ्यांमध्ये ठरवून दिलेली शैक्षणिक योग्यता त्यांच्याकडे असल्यास त्यांची नेमणूक केली जाईल.

९) सर्व प्रांतात शैक्षणिक अनुदान घेऊन दलितांच्या मुला-बाळांसाठी शैक्षणिक सोयी पुरविल्या जातील. त्यासाठी योग्य त्या रकमेची तरतुद केली जाईल. इत्यादी समझोत्यांच्या अटी 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट' मध्ये सामील करण्यात आल्या.

१०) वरील निवडणूकीबाबत व सरकारी नोकरी बाबत अस्पृश्यांना योग्य जागा मिळाव्या म्हणून शक्य तितका प्रयत्न केला जाईल.

या सर्व अटींना संमती मिळाल्यानंतर महात्मा गांधींनी सुरु केलो आपला प्राणांतिक उपवास संत्र्याचा रस पिऊन सोडला.

■ ■ ■

अतिथी व्याख्याने (Guest Lecture) २०१८-१९

विषय	दिनांक	अतिथी अध्यापक	विषय
मराठी	०१/१०/२०१८	श्रीमती उषा दांडगे	काव्यात्मक साहित्य
	११/१२/२०१९	श्रीमती ललिता वाणी	निर्झरास कविता
हिंदी	१९/०९/२०१८	डॉ. संतोष तांदळे	राष्ट्रभाषा हिंदी का परिप्रेक्ष्य
	२२/०१/२०१९	श्री. सुभाष महाराज भांडे	साहित्य में गोमाता
इंग्रजी	04/10/2018	Dr. Ravikant jadhavar	Parts of speech
	03/01/2019	Dr. Mahananda Dalvi	Business Communication
इतिहास	११/०९/२०१८	आशुतोष पाटील	शिवकालीन नाणी
	०९/०१/२०१९	डॉ. कृष्णा मालकर	महात्मा गांधी
राज्यशास्त्र	२५/०९/२०१८	प्रा. सुनिल जाधव	संयुक्त महाराष्ट्र चळवळ
	२८/०२/२०१९	डॉ. अर्जुन उबाळे	लोकशाही समोरील आव्हाने
अर्थशास्त्र	१०/१०/२०१८	प्रा. नारायण गेडाम	कृषी उद्योग व सेवा क्षेत्र विकासासाठी भूमिका
	०७/०१/२०१९	श्री. समर्थ पाटील	अर्थशास्त्र विषयात विदेशी शिक्षणाच्या संधी
समाजशास्त्र	१३/०८/२०१८	श्री. मनोज गाडेकर	समाजशास्त्र आणि समाजकार्य यातील संबंध
	१०/०१/२०१९	डॉ. अफरोज बेगम	संशोधनात एस.पी.एस.एसचा उपयोग
वाणिज्य	11/09/2018	Dr. Vikas Chaudhari	Recent Trends in Auditing
	28/12/2018	Prof. M. M. More	Accounting standard
शारीरिक शिक्षणशास्त्र		Prof. Yogesh Jadhav	Sports

जग बदलयाचे असेल तर आधी स्वतः बदलवा – महात्मा गांधी

स्वप्नील एकनाथ ढोके
बी.कॉम. तृतीय वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

राष्ट्रपिता महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोंबर इ. स. १८६९ या दिवशी गुजरात मधील पोरबंदर (सुदामपुरी) या कठियावाड संस्थानातील गावी मोढ समुदायातील वैश्य किंवा बनिया कुटुंबात झाला. त्यांचे आजोबा उत्तमचंद हे उत्ता गांधी तर वडील करमचंद काबा गांधी म्हणून ओळखले जात. आईचे नाव पुतळाबाई हे होते. पुतळाबाई काबा गांधीजींची तिसरी पत्नी होती. त्यांचे वडील व पुर्वज काठियावाड संस्थानचे दिवाण होते. णहात्मा गांधीजींचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण राजकोट येथे झाले. भावनगरच्या समलदास या कॉलेजमधून १८८७ मध्ये मॅट्रिक झाले. ते वयाच्या एकोणिसाव्या वर्षी पुढील शिक्षणासाठी गांधी लंडनला गेले. युनिव्हर्सिटी लॉ कॉलेज ऑफ लंडन येथे प्रवेश घेतला.

जून १८९१ मध्ये बॅरिस्टरचे शिक्षण पूर्ण करून गांधी भारतात परत येण्यासाठी निघाले. लंडनमध्ये शिक्षण घेत असतांना आईला जैन मुनींच्या उपस्थितीत दिलेले मांसाहार, मद्य आणि स्त्री यांचा स्पर्धही न करण्याचे वचन त्यांनी तंतोतंत पाळले.

स्त्रीचे खरे अलंकार तिचे चारित्र्य, तिची पवित्रता आहे.

गांधीजींचा विवाह वयाच्या १३ व्या वर्षी कस्तुरबा या मुलीशी झाला. मखनजीला १४ मुली होत्या. त्यातील कस्तुरबा एक होती. पण त्या काळातील रिवाजानूसार कस्तुरबा बहुतांश काळ त्यांच्या वडिलांच्या घरीच होत्या. या प्रक्रियेत मोहनदासला शालेय शिक्षणाचे एक वर्ष गमवावे लागले. इ. स. १८८५ मध्ये जेव्हा गांधीजी १५ वर्षाचे होते तेव्हा त्यांना पहिले अपत्य झाले. पण ते कमी काळ जगले. त्याच वर्षा आधी वडील करमचंद गांधी यांचा स्वर्गवास झाला होता.

देह आपला नाही ती आपल्याकडे असलेली ठेव आहे.

अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधीनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांना संपूर्ण जगाला प्रेरित केले. रविंद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम त्यांना 'महात्मा' ही उपाधी दिली. भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत. सुभाषचंद्र बोस यांनी इ. स. १९४४ मध्ये पहिल्यांदा त्यांना 'राष्ट्रपिता' असे संबोधले, असे म्हणतात. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. त्याचा जन्मदिवस २ ऑक्टोबर हा भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भारतात सार्वजनिक सुट्टी असते.

तुम्ही मला कैद करू शकता; माझा छळ करू शकता, माझं शरीर नष्ट करू शकता. पण माझ्या मनाला कैद करू शकणार नाहीत.

इ. स. १९१५ मध्ये गांधीजी कायमसाठी भारतात परत आले. एक प्रमुख भारतीय राष्ट्रवादी, थिओरिस्ट आणि संघटक अशी त्यांची आंतरराष्ट्रीय ख्याती होते. ते भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अनेक संमेलनातून बोलले. खऱ्या अर्थी भारताचे राजकारण व समस्या यांचा परिचय त्यांना गोपाळ कृष्ण गोखले त्यांनी करून दिला. गोपाळ कृष्ण हे तेव्हा भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये प्रमुख नेते होते. गोखले त्यांच्या संयम, संतुलन आणि व्यवस्थेच्या आतमध्ये राहून काम करण्याच्या आग्रहाबद्दल ओळखले जातात.

गांधीनी गोखल्यांचा ब्रिटीशांच्या व्होगीश परंपरावर आधारित उदार दृष्टीकोन अनुसरला आणि तो पूर्णपणे भारतीय दिसण्यासाठी बदलला. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाल्यावर ते राष्ट्रीय सभेचे प्रमुख नेते बनले.

एका राष्ट्राची महानता त्याच्या प्राण्यांना ज्या पद्धतीने हाताळली जाते त्यावरून त्यावर न्याय केला जाऊ शकतो.

गांधीजींची रामराज्य संकल्पना :-

गांधीजीचा सत्याग्रहाचा मार्ग रामराज्य प्रस्थापना करण्यासाठी होता. हिंद स्वराज्य म्हणजे काय असे कोणी विचारले तर मी सांगेल, धर्माचे राज्य किंवा रामराज्य असं गांधी एका ठिकाणी म्हणतात. आधुनिक राज्य केंद्रिकरण आणि हिंसा यावर उभारलेले आहे. वस्तुत: राज्याने किमान कार्य करावी. सत्येचे विकेंद्रीकरण व्हावे, ग्रामीण स्वायत्ता प्रस्थापित व्हावी. सत्य, अहिंसा राज्याचे घटक असावे अशा आदर्श राज्याच्या मांडणीत गांधीजींनी रामराज्याचे विचार व्यक्त केले आहेत. मध्ययुगातील संतांचा प्रभाव गांधींवर होता. गांधी हे भागवतधर्म अनुसरणारे होते. रामायणातील राज्यात राम राजा होता, म्हणजे राजेशाही होती. गांधीजी मात्र राजसत्तेचा स्वीकार करीत नाही. ते लोकशाहीवादी होते. शिवाय गांधींच्या दृष्टीने राज्याचे बाह्य स्वरूप राजेशाही वा लोकशाही हे महत्वाचे नसून राज्य न्यायावर आधारित आहे किंवा नाही याला महत्त्व आहे.

रामराज्य हे धर्माचे व न्यायाचे राज्य होते. रामाच्या कथेकडे ते माणसातील दोन प्रवृत्तींच्या दृष्टीने पाहतात. प्रत्येक माणसात या दोन्ही प्रवृत्ती असतात. चांगल्या व वाईट म्हणजे रामाची व रावणाची वृत्ती होय. रामाची वृत्ती म्हणजे धर्माची, न्यायाची आणि रावणाची वृत्ती म्हणजे स्वार्थाची वृत्ती होय.

राज्याला न्यायबुद्धीचा आधार असतो. अशा राज्यात निमस्तरातील माणसालाही लवकर व योग्य न्याय मिळेल. किचकट पद्धतीतून जावे लागणार नाही. राज्यातील कायदे हे न्यायबुद्धीला अनुसरून असतात. रामराज्यात आपले व्यवहार न्यायबुद्धीला प्रेरित होऊन करणाऱ्याला कायद्याच्या कोणत्याही अडथळ्यांना तोंड द्यावे लागत नाही. समाजातील व्यवहार अंत:करणातील न्यायबुद्धीला अनुसरून असतात. अन्यायाने सत्ता उपभोगणे, पैसा मिळवणे अशा समाजात अशक्य होते. प्रजेतील संघटित आत्मबलापुढे राजसत्ता झुकते. आजचे रामराज्य हे लोकशाही असणार आहे. रामराज्यात समता आणि स्वातंत्र्याचा लाभ सर्व नागरिकांना होईल. राजपुत्र आणि सामान्य माणुस सारखेच हक्क उपभोगतील. गांधींजीचे रामराज्य पाश्चात्य लोकशाही राज्यांसारखे भांडवलशाहीने प्रभावित होणार नाही. गांधीजींच्या दृष्टीने पाश्चात भांडवलशाही प्रणीत लोकशाही ही खरी लोकशाही नसुन धनिकशाही आहे.

रामराज्यात काही श्रीमंतीत लोळणार तर काही अर्धपोटी अशी विषमता समाप्त केली जाईल. जनतेची सार्वभौमसत्ता नैतिकतेवर आधारित होती. गांधीजी पाश्चात्य संस्कृतीचे टीकाकार होते. ही संस्कृती रसातळाला गेली

आह, हे ध्यानात घेऊन भारतीय संस्कृतीने धर्माचा आधार सोडू नये, यासाठी रामराज्य आणणे गांधींजींना गरजेचे वाटते.

गांधीजींचे सामाजिक विचार :-

सत्य आणि प्रेम ही धार्मिकतेची तत्त्वे गांधीजी समाज हा जाती, वर्ग यापासून मुक्त होण्यासाठी वापरू इच्छित होते. अनेक सामाजिक घटकांचे अगदी बालपणापासुनच अवलोकन करीत होते. त्यावर विचार करीत होते. अगदी बालपणी त्यांना कोडे पडायचे की माणसामाणसातील भेद का निर्माण होतात? वयाच्या बाराव्या वर्षी गांधीजींना कळून चुकले की. अस्पृश्यता समाजात खोलवर रूजली आहे, तिही धार्मिकतेच्या नावाखाली. वस्तुत: अस्पृश्यता ही हिंदू धर्माच्या आशयाच्या तत्त्वज्ञानाच्या विसंगत आहे. धर्मात तिला स्थान नाही. हे जाणुन घेण्यासाठी गांधीनी हिंदू धर्मग्रंथाचा अभ्यास केला. धर्म ग्रंथात अस्पृश्यता नाही, हे त्यांनी स्पष्ट केले. अस्पृश्यता ही दया, करूणा, प्रेम यांच्या विरूद्ध होती. गाय पवित्र मानणारा धर्म, दडपला जाणाऱ्या वर्गावर, एका समाजघटकावर, बहिष्कार कसा टाकू शकेल? असा प्रश्न त्यांना पडला. हिंदू धर्माने बंधुत्वावर, माणसामाणसातील समाजात जोपर्यंत प्रस्थापित होणार नाही तोपर्यंत पृथ्वीवर शांतता नांदणार नाही. अस्पृश्यता मुळासकट उखडून टाकावी, अन्यथा हिंदुत्व विकृत होईल. त्याचे परिणाम सर्व जगावर होतील असे त्यांना वाटत होते. ते म्हणत की, माझी अस्पृश्यते विरोधातील लढाई ही अशुद्ध मानवतेविरोधातील लढाई आहे. कोणी हिंदू धर्मात अस्पृश्यता आहे, असे पटवून दिले तर मी हिंदू धर्म सोडेल पण अस्पृश्यतेचा स्वीकार करणार नाही. खरी सामाजिक सुधारणा ही समाजातील फार मोठ्या संख्येच्या लोकांना वेगळे ठेवून होणार नाही, हे त्यांनी स्पष्ट केले.अस्पृश्यता निवारण्यासाठी गांधी मानवतावादी उपाय सूचवतात. धार्मिकतेचा आधार घेतात. जात, वंश असा कोणताही भेद नसणाऱ्या सामाजिक समतेचा आदर्श गांधीजी मांडतात.

गांधीजींचे धार्मिक विचार:-

गांधी मूलत: धार्मिक व्यक्ती होते. हिंदू धर्म त्यांना अत्यंत प्रिय होता. हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था, धार्मिक सण समारंभ, विवाह संस्कार, आहारविहार संस्कार, व्रतवैकल्ये, उपवास, पाप-पुण्य, आत्मा, शरीर, रामायण, महाभारत, भगवतगीता, गीतेतील कर्मसिद्धांत अशा अनेक विषयांची चर्चा गांधीनी केली आहे. प्रेम, सत्य, सद्‌गुण, सहिष्णुता, बंधुभाव, भूतदया अशा अनेक मूल्यांवर गांधीनी वेळोवेळी भाषणे केली आहेत. त्यातून गांधींचा धर्म विषयक दृष्टीकोन व्यक्त होतो. मात्र त्यांचे वर्तन व्यवहार काहीसे गुढ होते. त्यामुळे गांधी हिंदुत्ववादी होते काय? गांधी धर्मनिरपेक्ष दृष्टीकोनाचे हाते काय? त्यांचा धर्मनिरपेक्षतेचा आशय काय होता? गांधीजी सांप्रदायिक होते काय? असाही प्रश्न पडतो.

गांधीजींचे सत्य व अहिंसाविषयक तत्वज्ञान:-

गांधीजी रूढ अर्थाने राजकीय विचारवंत नाही. प्लेटो, अरिस्टॉटल यांनी जसे आदर्श राज्यक्रांतीचा सिद्धांत असे विचार मांडले तसे गांधींजीनी शास्त्रीय सिद्धांताची मांडणी केली नाही. मात्र आपल्या जीवन व कार्यातून नवनव्या संकल्पना त्यांनी जगासमोर ठेवल्या, त्यांचे उपयोजन आपल्या राजकारणात केले. त्यामधून गाधींचे राजकीय तत्वज्ञान तयार झाले. सत्य, अहिंसा या संकल्पना या जातकुळीच्या होत्या. सत्याग्रहविषयक गांधीचे विचार इतके मूलभूत, असाधारण होते की, जावडेकरांनी सत्याग्रही क्रांतीशास्त्र असे त्याचे नामाभिधान केले. जगभर गांधींच्या

या संकल्पनांचा उदोउदो झाला. आजही त्यांची युगानुकूलता आहे.

सत्य, अहिंसा हे शब्द एकमेकांना जोडून वापरले जातात. इतके ते अन्योन्य संबंधित आहेत. सत्य आणि अहिंसा हा आंतर्मनातील आवाज आहे हे त्यांना टॉलस्टायकडून कळले. गांधीजींच्या अहिंसाविषयक विचारांवर टॉलस्टायचा प्रभाव होता. १८९४ मध्ये टॉलस्टॉयचे 'किंगडम ऑफ गॉड इज वुइथ इन यू' वाचले त्यांत हिंसाविषयक प्रश्नांवर चर्चा त्यांना आढळली. सत्याचे परिपक्व फळ म्हणजे अहिंसा असेही गांधी म्हणतात.

अहिंसा शब्दप्रयोग भारतासाठी अपरिचीत नाही. वेद उपनिषद, गीता या ग्रंथामध्ये अहिसांचा पुरस्कार असला तरी अहिंसा तत्त्वाला पुढे आणले, गौतम बुद्ध, महावीर जैन, सम्राट अशोक यांनी. गांधीजींनी अहिंसा संकल्पना विस्ताराने मांडली. तिचे महत्त्व विशद केले. तिला आधुनिक संदर्भ प्राप्त करून दिला. मुख्य म्हणजे स्वातंत्र्य चळवळीला अहिंसेचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. गांधीजींचा राजकीय दृष्टीकोन यात साधनसुचिता केंद्रस्थानी होती. अहिंसा हे साध्यही होते तसेच साधनही. अहिंसा हा सत्याचा आमचा आत्मा असून अहिंसा हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे.

गांधीजींचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान :-

गांधीजी सत्य हे मुल्य मानणारे होते. सत्य हे अंतिम वास्तव असल्यामुळे सत्याचे निकष व मूलभूत सिद्धांत यांची प्रतिष्ठापनाकरणे क्रमप्राप्त ठरते. सत्याग्रह हे एक तत्त्वज्ञान आहे. तसेच तो एक मार्ग आहे, हे एक हत्यार, साधन आहे. त्याचा प्रामुख्याने वापर पारतंत्र्य घालवण्यासाठी करण्यात आला. गांधीजीपूर्वी लोकमान्य टिळकांनी सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब केला. काँग्रेसमध्ये तसेच मुस्लीम लीगच्या बैठकांमध्येही सत्याग्रहाचा विचार झाला होता. आरंभी गांधीनी सविनय प्रतिकार असा शब्द प्रयोग वापरला; परंतु त्यातुन आशय ध्वनित होत नाही म्हणून दक्षिण आफ्रिकेत त्यांनी पर्यायी शब्दाचा शोध घेतला. मगनलाल याने हा शब्द सूचवला. दक्षिण ऑफ्रिकेतून भारतात आल्यावर दोन वर्षांनी गांधीजींनी चंपारण्य भागात जाण्याचा जिल्हाधिकाऱ्याच्या बंदीहुकुम मोडून पहिला सत्याग्रह केला. गांधीजींनी फिजी बेटात सक्तीने पाठविण्यात येणाऱ्या भारतीय मजुरांच्या, गुलाम पुरवण्याच्या प्रकाराविरूद्ध सत्याग्रह केला.

गांधीजीची चळवळ लक्षात घेवून ही पद्धत बंद करण्यात आली. त्याच वर्षी निळीचा सत्याग्रह देखील चंपारण्य येथील बंदीहुकुम मोडुन त्यांनी केला. सरकारचे सुवर्णपदक परत केले. त्यापाठोपाठ खेडा येथे साराबंदीचा सत्याग्रह केला. सत्याग्रह आत्मद्वाराचे साधन आहे. यावर लोकांचा विश्वास बसला. व्हाईसरायला लिहिलेल्या पत्रात सत्याग्रह थांबवता येणार नाही हे त्यांनी स्पष्ट केले. युद्धासाठी सरकारला लोकांचे सहकार्य पाहिजे होते. त्याचवेळी त्यांनी सत्याग्रह तीव्र केले. रौलट ॲक्टच्या विरोधात गांधीजींनी केलेला सत्याग्रह पहिला राष्ट्रीय पातळीवरील सत्याग्रह होता.

शिक्षणविषयक विचारः-

भारतीय स्वतंत्रसमरात ज्या अनेक रणधुरिणांनी आपल्या आयुष्याचं रणकंदन केलं त्या महापुरुषांमध्ये महात्मा गांधी यांचे नाव अग्रणी ठरत. गांधी यांच्या आंदोलनाचे देशाचे अन्त:करणात नव तेजोत्पती केले. आपल्या सत्याग्रहत्मक तत्त्वज्ञानास विधायक कार्याची जोडतर त्यांनी दिलीच; शिवाय आरोग्य, शिक्षण, बेरोजगारी, भुकमारी आदी राष्ट्रीय प्रश्नांवरही आपले विचार मांडले. शिक्षण हे राष्ट्र विकासाचा आत्मा त्यांनी मानला. भावी पिढ्यांच्या

सशक्त समृद्ध जीवनासाठी आणि राष्ट्र उभारणीस कारक ठरणाऱ्या जबाबदार नागरिकांची निर्मिती ज्या शिक्षण व्यवस्थेत आणखी गरजेचे ठरेल अशा व्यवस्थेची आणखी गरजेचे ठरल्याने गांधीनी आपल्या चिंतनाची दिशा जीवन शिक्षण पद्धतीच्या अनुशांगिकतेने केल्याचे दिसुन येते. केवळ कारकुन निर्माण करणाऱ्या लॉर्ड मेकोले प्रणित शिक्षण पद्धतीची मीमांसा भारतीय संदर्भामध्ये करूनच ते थांबले नाहीत तर संभावनांना सक्षम विचाराचे अधिष्ठान ही त्यांनी दिले. गांधीचा हा प्रयत्न म्हणजे नव्या शिक्षण व्यवस्थेच्या योजनेचा प्रयत्नच होय.

'अपुर्णत्वाकडून पुर्णत्वाकडे जाण्याचा प्रवास म्हणजे शिक्षण' ही विवेकानंदाची व्याख्या या प्रयोगासाठी त्यांनी प्रमाण मानत. 'नई तालीम शिक्षण पद्धतीचे' हेच सुत्र म्हणून स्वीकारले. मन, शरीर, आत्मा या सर्वांचा विकास साधने म्हणजे शिक्षण अशी शिक्षणाची व्याख्या करून त्यांनी केवळ परमपरागत शिक्षण आजच्या आधुनिक भारताच्या निर्मितीस सहाय्यभुत होणार नाही हे जाणुन नई तालीमची रचना म्हणजे त्यांच्या शिक्षणविषयक विचारधारणेचे आत्मीयतेचे उदाहरणच होय.

सर्वोदय संकल्पना :-

सर्वोदयात सगळे सारखे आहेत. कोणीही उच्च व नीच नाही. सगळ्यांची सारखीच काळजी घेतली जाईल. सर्वांना विकासाची सारखी संधी दिली जाईल. सर्वांना सारखे शिक्षण मिळेल. सर्वोदयाला आधारलेली लोकशाही व्यवस्था मान्य नाही. तत्त्वच आधुनिक प्रचलित शासन विषयक विचार आणि पाश्चात्य राजकीय संस्था संघटन पद्धती यांना सर्वोदय विचारात स्थान नाही. सर्वोदय राज्य खऱ्या अर्थाने शासनमुक्त, स्वयंनियंत्रित, विकेंद्रित व लोकनितीचे राज्य असेल. जसजसे विकेंद्रिकरण हाईल. त्याचेच पुर्ण विकसित रूप म्हणजे गांधीजींना अभिप्रेत असणारी रामराज्याची कल्पना होय. सर्वोदयी राज्य संकल्पनेची ती आदर्श आहे. परंतु शांतिमय क्रांती अर्धोदय ठरली.

महात्मा गांधींच्या हत्येनंतर विनोबा भावे, जयप्रकाश नारायण प्रभृतींनी सर्वोदयाचा विचार भूदान, गोदान यांसारख्या चळवळीद्वारे समग्र क्रांतीतून प्रस्तुत केला. भूदानाने शांतिमय क्रांती सुरू केली. त्यामार्गाने सर्वोदय होणार असे विनोबांना वाटले. सेवाग्राम येथे गांधीभक्तांची सभा भरली. सर्वोदय समाज स्थापनेचा ठराव संमत झाला. त्यानंतर पोचमपल्ली येथे सर्वोदय संमेलन झाले. त्यात भूदान यज्ञाची प्रेरणा विनोबांना मिळाली. भूमीप्रमाणे संपत्तीवरील स्वामित्व सोडण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यामुळे स्वार्थ, द्वेशआणि हिंसा संपुष्टात येऊन सुर्वोदय घडेल. अशी विनोबांची मनोमन धारणा होती. जयप्रकाश नारायण यांनी १९६० च्या सर्वोदय संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना राजकारण संन्यास घेऊन सर्वोदयवादी चळवळीत स्वत:ला झोकून दिले. ग्रामराज्य, ग्रामोद्योग, नई तालीम इ. कार्याची जोड देऊन सर्वोदय कार्यकर्त्यांनी या कार्याला व्यापक स्वरूप देण्याचे प्रयत्न केले. परंतु ही कल्पना म्हणावे तशी मुळ घरु शकली नाही.

शेतकरी आंदोलने :-

गांधीजींना पहिले मोठे यश १९१८ मध्ये चंपारण्य आणि खेड्यामधील सत्याग्रहात मिळाले. चंपारण बिहारमधील जमीनदार, जे प्रामुख्याने ब्रिटीश होते. स्थानिक शेतकऱ्यांना सक्तीने नीळ उत्पादन करावयास लावत असत. त्यांना योग्य मोबदला पण मिळत नसे. यामुळे ते सतत गरिबीत असत. शेतकऱ्यांची गावे अत्यंत घाणेरडी आणि आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक ठेवली जात. तसेच दारू, अस्पृश्यता, पडदा पद्धत अशा अनेक समस्या या गावांमध्ये होत्या.

यावर भर म्हणजे येथील दुष्काळ. पण इंग्रजांनी तरीही अनेक जाचक कर लादले होते आणि ते वाढतच होते. गुजरातमधील खेड्यामध्ये सुद्धा स्थिती काही वेगळी नव्हती. गांधीजींनी तिथे एक आश्रम उभारला. तिथे त्यांनी त्यांच्या लहान-मोठ्या सर्व अनुयायांना एकत्र केले. त्यांनी त्या भागातील परिस्थितीची माहिती गोळा केली व तिचा सखोल अभ्यास केला. गावकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांनी गावाच्या स्वच्छतेचे तसेच शाळा, रूग्णालयाच्या बांधकामाचे हाती घेतले. याचसोबत गावातील प्रमुखांना वर उल्लेखलेल्या प्रथा नष्ट करण्यास प्रवृत्त केले.

जेव्हा पोलीसांनी त्यांना प्रदेशात अशांतता निर्माण करण्याच्या गुन्ह्याखाली अटक केली व तो भाग सोडून जाण्यास सांगितले, तेव्हा गांधीजींचा प्रभाव जाणवून आला. हजारो लोकांनी या अटकेचा न्यायालयासमोर मोर्चे काढले. न्यायालयाने शेवटी नाइलाजाने त्यांची मागणी मान्य केली. गांधीजींनी जमीनदाराविरूद्ध सुसंघटित आंदोलने चालु केली. याचा परिणाम म्हणजे तेथील जमीनदारांनी ब्रिटीश सरकारच्या मार्गदर्शनाखाली एक ठराव मंजूर केला. त्यानुसार शेतकऱ्यांना जास्त मोबदला आणि स्वत:च्या मतानुसार पीक घेण्याची मोकळीक मिळाली.

गांधीजींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान :-

महात्मा गांधी ९ जानेवारी १९१५ ला अफ्रिकेहुन भारतात आले. ९ जानेवारी हा दिवस भारतीय प्रवासी दिन म्हणून साजरा केला जातो. महात्मा गांधी भारतीय स्वातंत्र्य संग्रमातील एक महत्त्वाचे व्यक्ती असून त्यांनी भारतीय राजनितीला संपुर्ण बदलुन टाकले. सत्याग्रह व अहिंसा हे त्यांचे प्रमुख साधने होत. ज्याद्वारे त्यांनी अनेक चळवळी यशस्वी केल्या. कोणतीही हिंसा न करता आपल्या मागण्या पूर्ण करून घेणे हे त्यांच्या सत्याग्रहाचे प्रतिक होते. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात त्यांचे योगदान मोलाचे मानले जाते.

गांधीजींनी आपल्या कार्याची सुरूवात आफ्रिकेमध्येच केली होती. त्यांनी आफ्रिकेमध्ये गोऱ्या लोकांच्या वर्णद्वेषाच्या धोरणाच्या विरोधात सत्याग्रह केला होता. राजकारणाला पुर्णत: वेगळे वळण लावणारे व्यक्ती म्हणून गांधीजी इतिहासात प्रसिद्ध आहेत. शांततेच्या मार्गाने चळवळ करावयाची त्यासाठी तुरूंगवास, क्लेश सोसण्यास तयार असत. परिस्थिती प्राण घेण्यावर आली तरीही सत्याग्रहाचा मार्ग सोडवयाचा नाही हे त्यांचे धोरण असे.

बिहारमध्ये नीळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यावर तेथील इंग्रज मळेवाले व्यक्ती नीळ लावण्याची सक्ती करत असत. तेथील सर्वमळे ब्रिटीशांच्या मालकीची असत. नीळ हे अगदी पीक असून ती नीळ विकून तेथील मळे वाले भरपूर धन कमवित. पण त्यांच्या विपरित खुप कष्ट काम करणारे तेथील शेतकरी त्यांची आर्थिक परिस्थिती खुप बिकट होती. अशा परिस्थितीत गांधीजींनी शेतकऱ्यांचे नेतृत्व करून त्यांचा लढ यशस्वी केला. गांधीजींनी चंपारण्यात प्रवेश करण्यात ब्रिटीश पोलिसांनी मनाई केली होती. त्यांनी तसे न करता चंपारण्यात प्रवेश केला. त्यामुळे इंग्रजी पोलिसांनी त्यांचा विरोधात खटला भरला होता. गांधीजींनी गुन्हा कबुल करून आपल्याला शिक्षा करावी असे सांगितले.

■ ■ ■

महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार व योगदान

सय्यद करिश्मा जहाँगीर सय्यद
बी.ए. प्रथम वर्ष
कला महाविद्यालय, बिडकीन.

स्त्री शिक्षण :-

स्त्रीला पुरूषा इतकेच हक्क द्यावेत. त्यांच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे. स्त्री शिक्षण ही एक गरजेची बाब आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.

सर्वांसाठी शिक्षण :-

शिक्षणाच्या बाबतीत जात, धर्म, वर्ण, उच्चनीचता हे भेद नाहीसे करून शिक्षण सर्वांना द्यावे. खेड्याकडे चला हा मंत्रही त्यांनी दिला. यातून सर्वांसाठी शिक्षण ही कल्पना साकारली.

धार्मिक शिक्षण:-

धर्माचा ग्रंथ धर्माचा अर्थ सत्य आहे असे गांधीजींनी सांगितले. गांधीजींनी कोणत्याही धर्माबद्दल द्वेष नव्हता. कोणत्याही विशिष्ट धर्माबद्दल आग्रहही नव्हता. धार्मिक शिक्षण म्हणजे कोणत्याही विशिष्ट्ये धर्माचे शिक्षण नसून सत्याचे दर्शन घडविणाऱ्या सत्य धर्माचे शिक्षण होय.

शारीरिक शिक्षण:-

सुदृढ शरीरातच सुदृढ मन वास्तव्य करते हे गांधीजींनी ओळखले व शारीरिक शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले. त्यांच्या आश्रमात व वर्धा शिक्षण योजनेत शारीरिक शिक्षण सक्तीचे करावे हे स्पष्ट केले. ठिकठिकाणी व्यायाम मंदिरे स्थापन करावीत असे विचार मांडले.

मूलोद्योग शिक्षणपद्धती -हस्तव्यवसायाचे महत्त्व :-

शिक्षणात मूलोद्योगाला किंवा हस्तव्यवसायाला प्रमुख स्थान द्यावे. शिक्षण व जीवन यात समन्वय साधावा. स्वाश्रयी शिक्षण द्यावे. सामाजिक व नैतिक विकास घडविला जावा, मानसशास्त्रीय बैठक असावी. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे हे या योजनेत स्पष्टपणे मांडले व सेवाग्राम येथे अंमलात आणले.

महात्मा गांधीजींची ग्रंथ संपदा :-

गांधीजींनी स्वत:च्या 'हरिजन' नियतकालिकेमधून भरपूर लेखन करून जनजागृती केली. काही महत्त्वाचे ग्रंथ लिहिले. त्यात माझे सत्याचे प्रयोग, मूलोद्योगी शिक्षण, हिन्द स्वराज, टास्क बिफोर स्टुडंट्स.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत व सार्वत्रिक असावे :-

वयोगट ७ ते १४ वर्षाच्या सर्वांना सक्तीचे मोफत व सार्वजनिक शिक्षण मिळावे ही संकल्पना गांधीजींनी मांडली. आज ती अस्तित्वात आलेली आहे. हे महत्त्वाचे योगदान आहे.

शिक्षण हस्तकला उद्योगकेंद्रित असावे :-

मूलोद्योगी शिक्षण योजनेत हस्तव्यवसायांना हस्तकलांना महत्त्व दिले गेले. आजही विविध शिक्षण

आयोगांनी 'कार्यानुभवा'चे महत्त्व मान्य केले आहे. ही प्रेरणा गांधीजीच्या विचारातूनच आलेली आहे.

शिक्षण स्वाश्रयी असावे :-

शाळेतच वस्तू तयार करव्यात, विक्री करावी. जो पैसा मिळेल त्यातून शाळेचा खर्च भागवावा अशी ही कल्पना प्रत्यक्षात आहे. 'कमवा व शिका' या योजनेचा स्वाश्रयी शिक्षण या आधारच म्हणायला हवा.

शिक्षण मातृभाषेतून द्यावे :-

गांधीजींनी शिक्षण मातृभाषेतून द्यावे यावर भर दिला. आजच्या काळातही विविध शिक्षण तज्ज्ञांचे हेच मत आहे. गांधीजींचा हा विचार म्हणजे शिक्षणशास्त्रासाठी योगदानच होय.

अध्ययन-अध्यापन पद्धती :-

गांधीजींनी कृतीद्वारे शिक्षण, स्वानुभवातून शिक्षण, समन्वयातून शिक्षण या अध्ययन-अध्यापन पद्धती प्रत्यक्षात आणल्या. त्यांचा अवलंब शिक्षकांनी केल्यास शिक्षण प्रभावी होऊ शकते.

समाज शिक्षणाचा प्रयोग म्हणजे आश्रम :-

गांधीजींनी समाजशिक्षणासाठी आश्रमांची निर्मिती केली. सेवेसाठी सत्य, अहिंसा, पावित्र्य, इंद्रियांवर ताबा यांचा उपयोग व्हावा.

शिक्षणाची व्याख्या :-

''माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण''. "By Education, I mean, all round drawing art of the best in man body, mind and spirit'' गांधी सर्वांगीण विकासात त्यांनी ३H ची कल्पना मांडली. Head, Heart and Hand बुद्धी, हृदय व शरीर यांचा विकास समतोल झाला पाहिजे.

शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे :-

मुलांना त्यांच्या मातृभाषेतूनच शिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे विषय समजण्यास सुलभ जाते. विकासाची दिशा निश्चित ठरते. इंग्रजी भाषेतील ज्ञान-विज्ञानाची प्रगती गांधीजींना मान्य होती, पण तेथपर्यंत भारतीय भाषांच्या माध्यमातून पोहचले हे स्पष्ट मत होते.

शिक्षणाचे हेतू :-

गांधीजींच्या दृष्टीने शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये नागरिकत्व यावे, लोकशाही दृष्टिकोन निर्माण व्हावा, चारित्र्यसंवर्धन व्हावे, सहिष्णुता, उद्योगप्रियता, स्वावलंबन हे गुण यावेत, ईश्वर प्राप्तीसाठी आत्मसंयमन, आत्मशुद्धी, मनोनिग्रह साध्य व्हावे, आदर्श मनुष्य निर्माण व्हावा हे हेतू साध्य व्हावेत.

कृतियुक्त शिक्षण :-

मुलांना हस्तव्यवसाय शिकवून त्याद्वारे उत्पादन करण्याचे महात्मा गांधीनी सुचविले. 'सुतकताई'ला महत्त्व दिले. विविध विषयांचे अध्यापन करतांना जीवनाशी समन्वय साधण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

जीवनोपयोगी शिक्षण :-

शिक्षणाचा खरा अर्थ स्वावलंबन व स्वयंपूर्णता शिकविणे असा विचार गांधीजींनी मांडला. जॉन ड्युई, फ्रोबेल, हर्बार्ट अशा पाश्चिमात्य शिक्षणतज्ज्ञांसारखाच हा विचार होय.

■ ■ ■

महात्मा गांधी आणि सुधारणावादी कार्य

अक्षय चौधरी
बी.ए. द्वितीय वर्ष
कला महाविद्यालय, बिडकीन.

महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ ला पोरबंदर (कांठेवाड) गुजरात येथे झाला. हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून सुद्धा साजरा केला जातो.

महात्मा गांधी आणि सुधारणावदी कार्य

महिला सशक्तीकरण, स्वच्छता अभियान, दारूबंदी, स्त्री-पुरूष समानता, धार्मिक व सामाजिक सुधारणा, सर्वोदय, शांतिदुत, ग्रामराज्य संकल्पना, अस्पृश्यता निर्मुलन, सामाजिक समता, शिक्षण प्रसार, निसर्गोपचार अशा अनेक अगांनी गांधीजींच्या सुधारणावादी कार्यांची ओळख होते.

गांधीजीचे माझे सत्याचे प्रयोग, दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह, हिंद स्वराज्य, गुजराती भाषांतर All men are Brothers Diet and Diet Reform. १९४२ मध्ये गांधीजींनी ''भारत छोडो'' अभियान सुरु केले. याच दरम्यान त्यांनी ''करा या मरो'' चा नारा दिला. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. इंग्रज भारत सोडून निघून गेले. महात्मा गांधीच्या पत्नी कस्तुरबा गांधीनीही त्यांना विविध चळवळीमध्ये साथ दिली. गांधीजी जेलमध्ये असतांना त्यांनी चळवळींचे अध्यक्षपद सुद्धा सांभाळले. त्यांनी महात्मा गांधीजींना शेवटपर्यंत साथ दिली. पुढे जाऊन पुण्याच्या आगखान पॅलेसमध्ये त्यांचा मृत्यू झाला.

३० जानेवारी १९४८ ला नथुराम गोडसे नावाच्या युवकांने त्यांची दिल्लीतील बिर्ला मंदिर येथे हत्या केली. महात्मा गांधी हे एक महान व्यक्तिमत्व होते. त्यांनी आपले पुर्ण आयुष्य मातृभूमीसाठी अर्पण केले. देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.

महात्मा गांधी

तेजस प्रकाश श्रीवास्तव
बी.ए. द्वितीय वर्ष
कला महाविद्यालय, बिडकीन

महात्मा गांधी एक महान स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य भारताच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी खर्च केले. महात्मा गांधीजींचे पुर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी होते. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातच्या पोरबंदरमधील हिंदु कुंटुबात झाला. त्यांचे वडील करमचंद गांधी हे पोरबंदर राज्यात दिवाण म्हणून काम करत असत. त्यांच्या आईचे नाव पुतळीबाई होते. त्यांना वाचनाची आवड होती. त्यांना गोष्टी ऐकायला आवडत असे आणि त्या गोष्टी त्यांना मनावर खोलवर परिणाम करत असत. त्यांचे प्राथमिक शिक्षण राजकोटमध्ये पुर्ण झाले. वयाच्या चौदाव्या वर्षी महात्मा गांधींचे लग्न तेरा वर्षीय कस्तुरबा कपाडीया यांच्याशी झाले, नंतर त्यांना कस्तुरबा गांधी म्हणून ओळखू जाऊ लागले. महात्मा गांधीच्या पत्नी कस्तुरबा गांधींनीही त्यांना विविध चळवळीमध्ये साथ दिली. गांधीजी जेलमध्ये असतांना त्यांनी चळवळीचे अध्यक्षपद सुद्धा सांभाळले. त्यांनी महात्मा गांधीजींना शेवटपर्यंत साथ दिली. पुढे जाऊन पुण्याच्या आगारवान पॅलेसमध्ये त्यांचा मृत्यू झाला.

१८८८ मध्ये महात्मा गांधी समलदास विद्यालयात दाखल झाले. पण ते महाविद्यालयाला सोडून पोरबंदला परत गेले. एका कौटुंबिक मित्राच्या सल्ल्यावरून ते कायद्याच्या अभ्यास करण्यासाठी लंडनला गेले आणि १८९७ मध्ये तिथे असतानाच त्यांच्या आईचा मृत्यू झाला. पण त्याची बातमी त्यांना कुणीही कळवली नाही. जेणेकरून त्यांचे शिक्षण पुर्ण व्हावे.

बॅरिस्टर बनून भारतात परत आल्यानंतर त्यांनी बॉम्बेमध्ये वकिलीची सुरूवात केली. पण त्यामध्ये ते तेवढेसे यशस्वी झाले नाही म्हणून ते पोरबंदरला परतले. त्यावेळी त्यांना दक्षिण आफ्रिकेत जाण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेमध्ये तेव्हा ब्रिटीश सरकार होते. तिथे भारतीय वंशाच्या लोकांना वर्णभेदाचा त्रास होत असे. या सर्व अनुभवातून महात्मा गांधीनी याबद्दल महात्मा गांधीचा खरा प्रवास सुरू झाला. महात्मा ही पदवी त्यांना दक्षिण अफ्रिकेतच मिळाली.

गोपाळ कृष्ण गोखले यांचे विनंतीला मान देवून ते भारतात परत आले. १९१५ साली दक्षिण अफ्रिकेतून परतल्यानंतर त्यांनी स्थानिक शेतकरी आणि कामगार यांच्या उच्च कर आणि भेदभावाच्या विरोधात लढा देण्यास सुरुवात केली. पुढे १९२१ मध्ये ते राष्ट्रीय काँग्रेस मध्ये सहभाग झाले आणि तेथून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत आपले योगदान देण्यास सुरूवात केली. १९३० मध्ये कॉग्रेसने स्वतंत्र भारताची घोषणा केली, पण ती ब्रिटीश सरकारने मान्य केली नाही पण वाटाघाटी करण्यात आले, ज्यानुसार भारतीयांना प्रांतीय सरकार मध्ये भाग घेण्यास परवानगी मिळाली.

यादरम्यान महात्मा गांधीजींनी अनेक चळवळी, सत्याग्रह, आंदोलने केले. १९१७ मध्ये बिहारच्या चंपारण्य सत्याग्रहात त्यांना यश मिळाले. १९१८ मध्ये गांधीजींनी उच्च महसुलाविरूद्ध खेड्यामध्ये असहकार सत्याग्रह पुकारला. वल्लभभाई पटेल यांनी शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्त्व केले आणि

ब्रिटीशासोबत वाटाघाटी करून राजस्व संकलन निलंबित केले व सर्व कैद्यांना सोडवले.

१९१९ मध्ये गांधीजीनी असहकार आंदोलन पुकारले. या दरम्यान जमलेल्या लोकांनी सार्वजनिक मालमत्तेची नासाडी केली. लोकांकडून होणारी हिंसा थांबवण्यासाठी गांधीजी आमरण उपोषणाला बसले. त्यानंतर त्यांनी आपले लक्ष स्वदेशी मोहिमेकडे वळवले. ज्यानुसार त्यांनी परदेशी वस्तूवर बहिष्कार घातला. स्वदेशी खरेदी वस्त्र वापरण्याचे आवाहन केले. या सोबत त्यांनी जनतेस ब्रिटीश सरकारच्या नोकऱ्या पद त्यांचा बहिष्कार करण्याचे आवाहन केले. पुढे जाऊन हे असहकार आंदोलन वाढले, ब्रिटीशांनी गांधीजींना ६ वर्षांची सजा सुनावली. या दरम्यान कॉंग्रेसमध्ये फुट पडू लागली. १९२४ मध्ये, २ वर्षानंतर गांधीजींनी ॲपेन्डिसाईटिसच्या शस्त्रक्रियेसाठी सोडण्यात आले. पुढे त्यांनी आपला लढा चालू ठेवला.

इंग्रजांशी लढा देतांना महात्मा गांधीनी अहिंसा, असहकार आणि सत्याग्रहाचा वापर केला. बऱ्याच वेळा त्यांना अटक करून तुरूंगात ठेवण्यात आले. परंतु ते निराश न होता ब्रिटीशाविरूद्ध लढा चालू ठेवला. पुढे जाऊन त्यांनी विदेशी वस्तू त्यागल्या. ते फक्त खादीचे धोतर आणि शाल परिधान करत असत. १९३० मध्ये त्यांनी दांडी यांत्रेद्वारा मिठावरच्या कराविरूद्ध सत्याग्रह पुकारला. १२ मार्च ते ६ एप्रिल दरम्यान गांधीजींची हजारो जनसमुदायासह अहमदाबाद ते दांडी अशी ३८८ किलोमिटरची पायी यात्रा केली. ब्रिटीशांनी या दरम्यान ६०,००० लोकांना जेल मध्ये टाकले.

१९४२ मध्ये गांधीजीनी ''भारत छोडो'' अभियान सुरु केले. याच दरम्यान त्यांनी ''करा या मरो'' चा नारा दिला. ब्रिटीशांनी त्यांना पुण्यातील आगा खान पॅलेसमध्ये नजरकैदेत ठेवले. या दरम्यान त्यांच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांची निधन झाले आणि गांधीजींना मलेरीया झाला होता. गांधीजींना ६ मे १९४४ ला सोडण्यात आले होते. कॉंग्रेसचे राजनैतिक वातावरण बदलेले होते. मुहम्मद अली जिना स्वतंत्र मुस्लिम देशांची मागणी करू लागले.

ब्रिटीशापासून स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महात्मा गांधीनी आपल्या सर्व शक्तीचा उपयोग केला. त्यांनी जनतेच्या एकोप्याची शक्ती जाणली होती. म्हणून त्यांनी विविध जाती, धर्म, समाज, वर्ण, वय किंवा लिंग सर्व मतभेद विसरून भारतीयांना एकत्र आणले.

■ ■ ■

महात्मा गांधी

संगीता दशरथ हाडे
बी.ए. तृतीय वर्ष
कला महाविद्यालय, बिडकीन.

महात्मा गांधीजींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ मध्ये गुजरात राज्यातील पोरबंदर येथे झाला. गांधीजींचे वडील पोरबंदर व राजकोट येथे दिवाण होते. तत्कालीन प्रथेप्रमाणे इ. स. १८८७ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले व वयाच्या तेराव्या वर्षी गांधीजींचा विवाह झाला. त्यानंतर १८८८ मध्ये त्यांनी बॅरिस्टरची परीक्षा देण्यासाठी इंग्लंडला प्रयाण केले. तेथे तीन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून ते बॅरिस्टर झाले व १८९१ मध्ये भारतात परत आले. मायदेशी आल्यावर प्रारंभी त्यांनी राजकोट येथे वकिली सुरू केली. मग त्यांनी लवकरच मुंबईला स्थलांतर केले. एका हिंदी कंपनीचे वकील म्हणून त्यांना दक्षिण आफ्रिकेस जाण्याचा योग आला. दक्षिण आफ्रिकेमध्ये कामधंद्यानिमित्त अनेक भारतीय लोक स्थायिक झाले होते. परंतु ते अत्यंत वाईट व अन्यायकारक अवस्थेत जीवन जगत होते. त्यांच्यावर अटी व निर्बंध लादण्यात आले होते. मूलभूत नागरी हक्क देखील त्यांना नाकारले होते. इ. स. १९०६ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या राजवटीने आशियाई लोकांची अप्रतिष्ठा करणारा 'एशियाटिका रजिस्ट्रेशन ॲक्ट' हा जुलमी कायदा संमत करून घेतला. या कायद्यातील तरतुदीनूसार आपली नोंदणी करून घेण्याची व नोंदणीपत्रावर अंगठा करण्याची सक्ती केली. या काळ्या कायद्याविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रह पुकारून आवाज उठविण्यात पुढाकार घेतला. पुढे बऱ्याचदा वापरलेल्या सत्याग्रह शस्त्रांचा गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत प्रथमच केलेला प्रयोग यशस्वी झाला. दक्षिण आफ्रिका सरकारला. अशा प्रकारे आफ्रिकेत यशस्वी झालेले गांधीजी इ. स. १९१४ मध्ये भारतात परत आले. याच वेळी युरोपमध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. त्यात ब्रिटीश सरकारला सर्व सहकार्य करण्याची गांधीजींनी भूमिका घेतली, परंतु, ब्रिटीश लोक मात्र बिहारमध्ये चंपारण्य जिल्ह्यातील युरोपियन मळेवाल्यांनी चालविलेल्या निळीच्या मळ्यातील मजुरांची पिळवणूक शांतपणे पाहत होते. त्याविरुद्ध इ. स. १९१७ मध्ये गांधीजींनी लढा लढविला. त्यानंतर इ.स. १९१८ मध्ये गुजरातेतील खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सत्याग्रह केला. या सत्याग्रहामुळे भारतीय जनता गांधीजींना ओळखू लागली.

इ.स. १९२० च्या सुमारास गांधीजी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे अग्रणी झाले. तेथ पासून इ. स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र होईपर्यंत गांधीजींनाच चळवळीचे नेतृत्व केले. या कालखंडास 'गांधी युग' असे म्हणतात. या कालखंडास गांधींजीच्या नेतृत्वाखाली झालेल्या १९२० ची असहकाराची चळवळ या तीन चळवळी ऐतिहासिक ठरल्या. भारतीय स्वातंत्र्य मिळवून देण्यात गांधीजींनी सिंहाचा वाटा उचलला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. पण स्वतंत्र भारतात राहण्याचे भाग्य गांधीजींना फार काळ लाभले नाही. कारण ३० जानेवारी १९४८ हा दिवस त्यांच्या जीवनाची अखेर करणारा ठरला. याच दिवशी नथुराम गोडसे नामक माथेफिरूने त्यांच्यावर गोळी झाडली आणि त्यातच गांधीजींच्या दुर्देवी अंत झाला. पण आपले आचार, विचार यामुळे गांधींजी आजही आजरामर आहेत.

व्यक्तीला व्यक्तिगत जीवनात व राष्ट्रला राष्ट्रीय जीवनात अजोड सामर्थ्य त्यांच्या सर्वच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व व्यक्तिनिष्ठ अशा सर्व क्षेत्रातील तरलस्पर्शी विचारांमध्ये आहे. त्यांच्या विचाराचा भारतीय जनमानसांवर फार मोठा व खोलवर प्रभाव पडला होता. त्यांच्या विचार प्रेरित होऊन सर्वसामन्य जनतेनेही स्वातंत्र्याच्या लढ्याला वेळोवेळी भाग घेतला. हजारो देशभक्त त्यांच्या शब्दासाठी देशाकरिता प्राणार्पत करण्यास तयार झाले. गांधीजींच्या विचारांनी प्रेरित झालेल्या नेत्यांची एक परंपरा या देशात तयार झाली. गांधीजींच्या विचारांना जगमान्यताही मिळाली. अमेरिकेमध्ये मार्टीन ल्यूथर किंग यांनी गांधीजींच्या तत्त्वावर आधारलेल्या नि:शस्त्र लढ्याची चळवळ यशस्वी केली. ते गांधीजींना आपले गुरु मानीत. अहिंसा व सत्य या परस्परपूरक तत्त्वांचा जितका व्यक्तिगत जीवनात अंगीकार करावयास हवा तितकाच तो राजकीय बाबीमध्ये पण करावयास हवा असे गांधीजींनी सर्व प्रथम प्रतिपादन केले. याच तत्त्वावर आधारित असणाऱ्या सत्याग्रहाचा शास्त्रसार वापर करून अहिंसक मार्गाने त्यांनी राजकीय चळवळी यशस्वी केल्या. त्यासाठी त्यांनी सविनय कायदेभंग असहकार, बहिष्कार, शासकीय आज्ञाभंग, उपोषण, धरणे इ. सत्याग्रहाचे मार्ग अवलंबिले. सत्य व अहिंसा हे गांधीजींच्या विचारांना पायाभूत आहेत. तरी गांधीजीना दुर्बलांची अहिंसा व विचार सर्वश्रेष्ठ गुण आहे, भित्र्याचा नव्हे. गांधीजींनी सत्य हे साध्य आणि अहिंसा हे त्याप्रत जाण्याचे साधन मानले होते. त्यांनी या दोन्ही तत्त्वांना समसमान महत्व दिले होते. प्रेममय व सहनशील अहिंसेच्या मार्गाने हृदय परिवर्तन करून शत्रुलाही मित्र बनविता येतो असा त्यांचा दृढ विश्वास होता. गांधीजी साधनशुचितेवरही भर देत. उन्नत व उदास साध्याप्रत पोचविणारी साधनेही नैतिक व उच्च प्रतीची असावयास हवी असे त्यांचे म्हणणे होते. भारतातील खेडी ही भारताची नस आहे हे ओळखून गांधीजींनी ग्रामविकासावर भर दिला. प्रत्येक खेडे आर्थिक व राजकीयदृष्टया स्वयंपूर्ण असले पाहिजे असे ते म्हणत. त्यासाठी त्यांनी लघुउद्योग, कुटीरउद्योग यांच्या विकासाचा आग्रह धरला. ग्रामवासीयांनी खेडे सोडून कधीही शहरात जाऊ नये असे ते सांगत. तत्कालीन अनिष्ठ सामाजिक रूढी विरूद्धही गांधीजींनी आवाज उठविला. त्याकाळी स्त्रीया व अस्पृश्य यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध गांधीजी उभे ठाकले. अस्पृश्यतेच्या प्रथेला ते कलंक समजत, त्या प्रथेला त्यांना कडाडून विरोध केला. त्यांचे अस्पृश्यता निवारण; स्त्री शिक्षण, जातीय ऐक्य, प्रौढ शिक्षण इत्यादी समाजसुधारणेचे विधायक कार्यक्रम राष्ट्रीय चळवळीचाच एक भाग बनले. अस्पृश्यता निवारण्याचे कार्य करणारा 'हरिजन सेवक संघ' त्यांनी इ.स. १९३३ मध्ये स्थापन केला. गांधीजींच्या विचारांनी प्रेरित होऊन अनेक कार्यकर्त्यांनी अस्पृश्योद्धाराचे कार्य अंगीकारले. मनुष्याच्या व्यक्तिगत जीवनासही गांधीजींने मूल्यांचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. अभ्यास आदर्श मानणे; चारित्र्य संवर्धन, व्रतनिष्ठा व संयम परोपकार, श्रद्धा, प्रेम, प्रार्थना, अभय, अनासत्की, अपरिग्रह, दया, बंधुभाव, सहनशीलता, नम्रता, नियमितपणा, स्वच्छता, अपरिगृह, नीतिमत्ता, आहार व स्वास्थ्य, क्रोधाचा अभाव व क्षमाशीलता अशा व्यक्तीचा सर्वकष विकास साधून देणाऱ्या विविधांगी मूल्यांचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला.

मेरा धर्म सत्य और अहिंसा पर आधारित है,
सत्य मेरा भगवान है, अहिंसा उसे पाने का साधन ।

अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरीत केले. नोबेल पुरस्कार विजेते रवींद्रनाथ टागोर यांनी गांधीजींना महात्मा ही उपाधी दिली. सुभाषचंद्र बोस यांनी गांधीजींना सर्वप्रथम राष्ट्रपिता असे संबोधित केले. गांधी जयंतीला राष्ट्रीय सुट्टी असते. सर्व शाळा व ऑफिस बंद असतात. भरपूर शाळामध्ये वत्कृत्व स्पर्धा व

निबंध स्पर्धा आयोजित केल्या जातात. गांधीजींच्या स्मरणार्थ 'रघुपतिराघव राजाराम' हे गीत गायले जाते. आफ्रिकेत झालेल्या लढाईत जे व्यक्ती जखमी झाले त्यांना गांधी व त्याच्या सोबतचे व्यक्ती पहाडावरून दुसरीकडे इलाज व मल्लमपट्टी करण्यासाठी घेऊन जात असत. त्यांना ते काम करण्याबद्दल पुरस्कारीत केले होते.

आफ्रिकेतुन ते जेव्हा आपल्या भारतात परत येत असतांना तेथील लोकांनी आपल्या डोळ्यात पाणी आणले व प्रत्येकांनी काही काही भेट वस्तु दिल्या होत्या. गांधीजी भारतात परत येण्याअगोदरच त्यांच्या आई स्वर्गवासी झाल्या होत्या. गांधीजींचा त्यांच्या आईत खुप जीव होता. गांधीजींच्या आईने त्यांना इंग्लंडला जाण्याआगोदर गांधीजींकडून वचन घेतले होते की, तु मांसाहार व मद्यपान व कशाचेही व्यसन करणार नाही; त्याचे पालन केले. गांधीजीच्या घरात रोज तुलसी पाठ होत असत आणि रामायण आणि भागवतगीता ही वाचण्यात येत असत. गांधीजींना त्यातुन काही शिकायला मिळत होते. त्यांच्या आईचा पूजा-पाठ करण्यात खुप विश्वास होता. त्या आपल्या मुलांना वाईटगोष्टीपासून दुर ठेवण्यासाठी पूजा पाठ करत असत. गांधीजींना बॅरिस्टरची परीक्षाला जाण्याचा खर्च त्यांच्या भावांनी केला होता. गांधीजींनी लढाईत खुप वेळा जेलमध्ये गेले होते. व एकदा तर आठवड्यातून चार वेळा ते जेल मध्ये गेले होते. गांधीजींनी आपल्या आयुष्यातला एकच निर्णय घेतला होता कि आपला भारत स्वतंत्र करायचा व त्यांनी आपल्या भारताला स्वतंत्र करून सोडले.

महात्माजींच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीनिमित्त आपली विचार संस्कृती त्यातील सत्य आणि सत्व शोधण्याचा प्रयत्न करतांना बालपणीची शाळेत दिलेली घोषणा आठवत राहते. 'एक रूपया चांदीचा, सारा देश गांधींचा' तुम्ही सहमत असला तरीही, नसला तरीही.

■ ■ ■

महात्मा गांधी : जीवन व कार्य

दिपाली सिद्धार्थ कांबळे
बी.ए. प्रथम वर्ष
कला महाविद्यालय, बिडकीन.

मोहनदास करमचंद गांधी (ऑक्टोबर २ इ. स. १८६९) संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्वज्ञ होते. महात्मा गांधी या नावाने ते ओळखले जातात. अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गानी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरीत केले. रविंद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम त्यांना महात्मा (महान आत्मा) ही उपाधी दिली. भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत आणि त्यांना अनधिकृतपणे भारताचे राष्ट्रपिता म्हटले जाते. सुभाषचंद्र बोस यांनी असे संबोधले असे म्हणतात. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. त्यांचा जन्मदिवस २ ऑक्टोबर हा भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भारतात सर्वाजनिक सुट्टी असते.

असहकार आणि अहिंसेच्या तत्त्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधीनी प्रथम दक्षिण आफ्रिकेमध्ये तेथील भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. इ.स. १९१५ मध्ये भारतात परत आल्यावर त्यांनी चंपारण्यामधील शेतकऱ्यांना जुलमी कर व जमीनदार यांच्याविरूद्ध लढण्यासाठी एकत्र केले. इ.स. १९२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सुत्रे संभाळल्यानंतर गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क, सर्वधर्म समभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वराज्य यासाठी देशभरात चळवळ चालू केली. गांधी आजीवन साम्प्रदायिक तत्त्वाचे (साम्प्रदांयावर राजकारण करणे) विरोधक होते आणि ते मोठ्या प्रमाणात सर्व धर्म आणि पंथ यांच्यापर्यंत पोहोचले. ढासळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीत होते. त्यांनी आधार दिला आणि ते मुस्लिमांचे नेते बनले. इ.स. १९३० मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे ४०० कि.मी. (२५० मैल) लांब दांडी यात्रेमध्ये प्रतिनिधित्त्व केले. इ.स. १९४२ मध्ये त्यांनी इंग्रजांविरूद्ध भारत छोडो आंदोलन चालू केले. या आणि यासारख्या इतर कारणांसाठी त्यांना भारतात तसेच दक्षिण आफ्रिकेमध्ये अनेकदा तुरूंगात टाकण्यात आले. गांधींनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा पुरस्कार केला. स्वत:ही याच तत्त्वांनुसर जगले आणि खेड्यांना खऱ्या भारताचे मूळ म्हणून पाहिले आणि स्वयंपूर्णतेचा पुरस्कार केला.

ब्रिटनमधील विन्स्टन चर्चिल यांनी १९३० साली यांची अर्धनग्न फकीर म्हणून निर्भत्सना केली. स्वत:कातलेल्या सुताचे धोतर, शाल अशी त्यांची साधी राहणी होती. त्यांनी शाकाहारीचा अवलंब केला आणि अनेकदा आत्मशुद्धीसाठी भावी राजकीय चळवळीसाठी साधन म्हणून दीर्घ उपवास केले. त्यांच्या शेवटच्या वर्षामध्ये भारत पाकिस्तान फाळणीमुळे व्यथित झालेल्या गांधीनी हिंदी मुस्लीम दंगे थांबवण्यासाठी प्रयत्न केले.

चंपारण व खेडा सत्याग्रह

गांधीनी पहिले मोठे यश १९१८ मध्ये चंपारण आणि खेडामधील सत्याग्रहात मिळाले. चंपारण बिहारमधील जमीनदार. जे प्रामुख्याने करावयास लावत असत. त्यांना मोबदला पण मिळत नसे, यामुळे ते सतत गरीबीत राहत

शेतकऱ्यांची गावे अत्यंत घाणेरडी आणि आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक ठेवली जात. तसेच दारू, अस्पृश्यता, पडदा पद्धत अशा अनेक समस्या या गावांमध्ये होत्या. यावर भर म्हणजे तेथील दुष्काळ. पण इंग्रजांनी तरीही अनेक जाचक कर लादले होते आणि ते वाढतच होते. गुजरातमधील खेड्यामध्ये सुद्धा स्थिती काही वेगळी नव्हती. गांधीजींनी तिथे एक आश्रम उभारला. तिथे त्यांनी त्या भागातील परिस्थितीची माहिती गोळा केली व सखोल अभ्यास केला. गावकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांनी गावाच्या स्वच्छतेचे तसेच शाळा रूग्णालयाच्या बांधकामाचे काम हाती घेतले. याचसोबत गावातील प्रमुखांना वर उल्लेखलेल्या प्रथा नष्ट करण्यास प्रवृत्त केले. जेव्हा पोलिसांनी त्यांना प्रदेशात अशांतता निर्माण करण्याच्या गुन्ह्याखाली अटक केली व तो भाग सोडून जाण्यास सांगितले.

■ ■ ■

विषयनिहाय विशेष कार्यक्रम २०१८-१९

विषय	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	वक्ते
मराठी	२१ ते २६/०२/२०१८	मराठी भाषा सप्ताह	
	२७/०२/२०१८	हस्ताक्षर, काव्य वाचन स्पर्धा	श्रीमती रेखा मेश्राम
हिंदी	१४ ते २०/०९/२०१८	हिंदी सप्ताह	डॉ. भारती गोरे
	३१/०७/२०१८	प्रेमचंद जयंती	डॉ. दत्तात्रय येडले
इतिहास	१७/०९/२०१८	हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिन	प्रा. दिनेश कचकुरे
	२०/०२/२०१९	विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धा	विविध महाविद्यालयातील स्पर्धक
राज्यशास्त्र	०२/१०/२०१८	महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती	प्रा. बाबासाहेब लहाने
अर्थशास्त्र	२५/०९/२०१८	पंडित दीनदयाळ जयंती	डॉ. सतीष कराड
	२७/०२/२०१९	महाराष्ट्र अर्थसंकल्प २०१९-२०	प्रक्षेपण
समाजशास्त्र	०६/१२/२०१८	डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन	डॉ. व्यंकटेश लांब
वाणिज्य	09/11/2019	Entrepreneurship Development programme	Mr. Arjun Gaikwad (Businessman) Mr. P. K. Deokar (Businessman)

महात्मा गांधीजींचा जन्म व जन्मठिकाण

नरवडे कोमल सुभाष
बी.ए. प्रथम वर्ष
कला महाविद्यालय, बिडकीन.

महात्मा गांधीजींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी पोरबंदर (सुदामपूरी) या काठियावाड संस्थानातील गावी मोढ समुदयातील वैश्य किंवा बनिया कुटुंबात झाला. त्यांचे आजोबा उत्तमचंद हे उत्ता गांधी, तर वडील करमचंद काबा गांधी म्हणून ओळखले जात असे, तर आईचे नाव पुतळाबाई काबा गांधीजींची तीसरी पत्नी होती. गांधीजींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी आहे. त्याचे वडील व पूर्वज काठियावाड संस्थानचे दिवाण होते. पुढे सगळ्या जगाला आपल्या विचारांनी आणि कार्यांनी थक्क करून सोडले. त्या गांधीचे आरंभीचे आयुष्य सामान्य दर्जाचे होते. त्यात कोणताही असाधारण भाग नव्हता, चमक नव्हती. बालपण पोरबंदरमध्ये घालवले, प्राथमिक, माध्यमिक शिक्षण राजकोट येथे झाले. भावनगरच्या समलदास कॉलेजमधून १८८७ मध्ये मॅट्रिक झाले. ते शाळेत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून ओळखले जात नव्हते. त्यांची स्मरणशक्ती बेताची होती. दणकट प्रकृती नसलेले गांधी, एकलकोंडे होते. मित्र परिवाराच्या गराड्यात रमणारे नव्हते. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी पुढील शिक्षणासाठी गांधी लंडनला गेले. युनिव्हर्सिटी लॉ कॉलेज ऑफ लंडन येथे प्रवेश घेतला.

जून १८९१ मध्ये बॅरिस्टरचे शिक्षण पूर्ण करून गांधी भारतात परत येण्यासाठी निघाले. जून १८९२ लंडनमध्ये शिक्षण घेत असताना आईला जैन मुनीच्या उपस्थितीत दिलेले मांसाहार, मद्य, स्त्री यांचा स्पर्शही न करण्याचे वचन त्यांनी तंतोतंत पाळले. काही इंग्रज रीतीरिवाज, नृत्यासारखे त्यांनी करून बघितले. शाकाहारी जेवण नीट न मिळल्याने घरमालकाकडील जेवण बंद करून ते शाकाहारी हॉटेलच्या शोधात निघाले. पुढे त्यांनी व्हेजिटेरियन सोसायटीची स्थापना केली. तिच्या कार्यकारिणीत काम केले. या सोसायटीत काही थिऑसॅफिकल सोसायटीचे काम करणारे लोक होते. त्यांच्यातील दोघांच्या प्रेरणेने गांधींनी गीतेचे वाचन केले. भगवद्गीतेने इतके प्रभावीत झाले की, आयुष्यभर त्यांनी गीतेचा ध्यास सोडला नाही. गीता अनमोल ग्रंथ आहे, याची त्यांना खात्री पटली. बुद्धचरित्र, बायबलमधील प्रवचने त्यांच्या वाचनात आली. कळत-नकळत या धर्मांच्या तत्त्वांची आणि त्यातून विविध धर्मांमध्ये समन्वयांची पायाभरणी या काळात झाली. बॅरिस्टर झाल्यावर राजकोट येथे गांधींनी वकिली सुरू केली. त्या आधी मुंबईतही वकिलीचा प्रयत्न केला.

गांधीजींचे जीवनकार्य :-

गांधीजींनी आपल्या सभोवतालच्या सर्वच गोष्टींबाबत सूक्ष्म निरीक्षणे नोंदवली आहेत. आपल्या तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करतांना त्यांनी आपले विचार मांडले आहेत. हिंद स्वराज्य, हरिजन व अन्य साहित्यामध्ये गांधीजींनी आपल्या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. समाजकारण, राजकारण, शिक्षण, आरोग्य, कुटुंब, विवाह, उद्योग, व्यवसाय, धर्म, चातुर्वण्यव्यवस्था अशा अनेक विषयांवर महात्मा गांधीनी चिंतनगर्भ विचारांची पेरणी केली आहे. इतर अनेक स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे गांधीजींचे राजकीय विचार ब्रिटिशांनी त्यांनी दिलेल्या प्रदीर्घ लढ्यातून व्यक्त झाले आहेत. मात्र देशाच्या स्वातंत्र्याच्या विचार करतांना गांधीजी परकीय जोखडातून

मुक्तता एवढा विचार न करता व्यापक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाच्या संदर्भात आपले विचार मांडतात. राजकारण, धर्म आणि राजकारण यांना एकत्र आणले. त्यांनी पाश्चात्य संस्था, प्रक्रिया, विचारव्यूह यातून विचार न करता भारतीय परंपरा, संस्कृती, इतिहास यामध्ये आपल्या राजकीय विचारांची मूळ शोधली. निर्भयता, निरवेंरता, स्पष्टता, निर्ममता यांनी त्यांनी महत्त्व दिले. मूल्याधिष्ठित राजकारणाचा परिपाठ घालून दिला. स्वत: गांधी संघटना व सत्ता यापासून दूर राहिले. साध्य व साधन सुचितेचा आदर्श घालून त्यांनी सत्याग्रह व अहिंसा यांची जगाला देणगी दिली.

लहानपणी गांधी धार्मिक वातावरणात वाढले. आई वैष्णव पंथाची, तरीही इतर धर्म आणि पंथ यांना घरात मुक्त प्रवेश होता. त्यामुळे बालपणीच सहिष्णुतेचे धडे मिळाले. जैन परंपरांचे संस्कारही त्याच्यावर झाले. दानशूर सत्यव्रत राजा हरिश्चंद्र, मातृभक्त श्रावणबाळ यांच्या कथा, रामायण, महाभारतातील व्यक्तीरेखा यांचे संस्कार गांधींवर झाले. त्यामुळे सत्य, प्रेम ही अंतिम मूल्य आहेत, हे त्यांच्या मनावर कोरले होते. गांधी मूलत: धार्मिक व्यक्ती होते. हिंदू धर्म त्यांना अत्यंत प्रिय होता. गांधीना माणसातील नैतिकता हवी होती.

गांधीजींचा विवाह वयाच्या १३व्या वर्षी मखनजी यांच्या कस्तुरबा या मुलीशी झाला. मखनजीला १४ मुली होत्या. त्यातील कस्तुरबा एक होती. गोड गाणे, नवे कपडे परिधान करणे, नात्यातील लोकांशी गाठी-भेटी एवढाच त्यांच्या लग्नातील आठवणी त्यांनी नोंदविल्या आहेत.

असे मानले जाते की, सर्वसामान्य माणसासारखे जीवन सुरू करून गांधीजी महात्मा बनले. राष्ट्रपिता म्हणून गौरविले. अहिंसेचे पुजारी म्हणून ओळखले गेले. गांधीजींचा हा प्रवास विचारात घेता ते सतत बदलत गेले असे म्हणावे लागेल. माणसांच्या आंतरक्रियांमधून संवादांमधून जसे त्यांच्यात बदल झाले तसेच सभोवतालच्या परिस्थितीशी तोंड देतांना, पर्यावरणाशी जुळवून घेतांना त्यांनी स्वत:ला बदलवले. गांधीजींमधील ही स्थित्यंतरे हे त्यांच्या आतल्या आवाजाच्या प्रतिसादातून घडले. हा आतला आवाज जगभरातील अनेकांचा त्यांच्यावर पडणारा प्रभाव. याची जशी परिनिती होती, तसाच त्यांच्या चिंतनाचा, बळकट श्रद्धा, बांधिलकी आणि मानव जातीबद्दल असणारे प्रेम यांचाही परिपाठ होता.

रायचंद, लिओ टॉलस्टाय, रास्किन आणि गोपाळ कृष्ण गोखले हे गांधीजींचे गुरू होते. गांधी अलौकिक व्यक्ती होते, नेते होते. याबाबत कदाचित एकमत होणार नाही. मात्र उच्च दर्जाची नैतिकता धारण करणारे होते. ते कोणीही नाकारणार नाही. नैतिकता ही गांधीजींची शक्ती होती.

अधिकारांऐवजी गांधीजींनी कर्तव्याला महत्त्व दिले. स्त्री-पुरूष समानतेसह सर्व प्रकारच्या समतेचा त्यांनी आग्रह धरला. वर्णाश्रमाची रचनात्मक बाजू समोर आणून वर्णाश्रम टिकवण्याचा सल्ला दिला. बुनियादी शिक्षणातून अनेक प्रयोग करून गांधीजींनी शिक्षण क्षेत्रात मोलाची भर घातली.

■ ■ ■

बलहीन व्यक्ती कुणालाही क्षमा करू शकत नाही. बलवान माणुसच क्षमा करू शकतो. **- म. गांधी**

महात्मा गांधी : जीवन व कार्य

मिरा तेजराव गाडेकर
बी.कॉम. द्वितीय वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

खादी मेरी शान है,

करम ही मेरी पुजा है,

सच्चा मेरा करम है,

और हिन्दुस्तान मेरी जान है ।

When you Love

an opponent win

it with Love

win with non-violence

धोती वाले बाबा की यह ऐसी एक लढाई थी ।

न गोले बरसाये उसने, न बन्दूक चलाई थी ।

सत्य, अहिंसा के बल पर ही दुश्मन को धूल चटाई थी ।मन की ताकत से ही उसने रोका हर तूफान को ।हम श्रद्धा से याद करेंगे गांधी के बलीदान को ।

जन्म :-

गांधीजींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर शहरी झाला. त्यांचे संपूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद आणि आईचे नाव पुतळाबाई होते. १८८७ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. १० जून १८९१ रोजी बॅरिस्टर झाले.

महात्मा गांधी जीवन आणि कार्ये :-

असहकार आणि अहिंसेच्या तत्त्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधीनी प्रथम दक्षिण आफ्रिकेमध्ये तेथील भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. इ.स. १९१५ मध्ये भारतात परत आल्यावर त्यांनी चंपारण्यामधील शेतकऱ्यांना जुलमी कर व जमीनदार यांच्या विरूद्ध लढण्यासाठी एकत्र केले. इ.स. १९२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सुत्रे संभाळल्यानंतर गरिबी निर्मुलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क, सर्वधर्म समभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वराज्य यासाठी देशभरात चळवळ चालू केली. गांधी आजीवन सांप्रदायिकत्वाचे (सांप्रदायावर राजकरण करणे) विरोधक होती आणि ते मोठ्या प्रमाणात सर्व धर्म आणि पंथ यांच्यापर्यंत पोहोचले. ढासळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीत होते. त्यांनी आधार दिला आणि ते मुस्लिमांचे नेते बनले. इ.स. १९३० मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे ४०० कि.मी. (२५० मैल) लांब दांडी यात्रेमध्ये प्रतिनिधित्व केले. इ.स. १९४२ मध्ये त्यांनी इंग्रजांविरूद्ध भारत छोडो आंदोलन चालू केले. या आणि यासारख्या इतर कारणांसाठी त्यांना भारतात तसेच दक्षिण आफ्रिकेमध्ये अनेकदा तुरूंगात टाकण्यात आले. गांधींनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा

पुरस्कार केला. स्वत:ही याच तत्त्वांनुसार जगले आणि खेड्यांना खऱ्या भारताचे मूळ म्हणून पाहिले आणि स्वयंपूर्णतेचा पुरस्कार केला. ब्रिटनमधील विन्स्टन चर्चिल यांनी १९३० साली यांची अर्धनग्न फकीर म्हणून निर्भत्सना केली.

इ. स. १९१५ मध्ये गांधीजी कायमसाठी भारतात परत आले. एक प्रमुख भारतीय राष्ट्रवादी थिओरिस्ट आणि संघटक अशी त्यांची आंतरराष्ट्रीय ख्याती होती. ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनेक संमेलनांतून बोलले. खऱ्या अर्थी भारताचे राजकारण व समस्या याचा परिचय त्यांना गोपाळ कृष्ण गोखले यांनी करून दिला. गोपाळ कृष्ण गोखले हे तेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रमुख नेते होते. गोखले त्यांच्या संयम, संतुलन आणि व्यवस्थेच्या आतमध्ये राहून काम करण्याच्या आग्रहाबद्दल ओळखले जातात. गांधीनी गोखल्यांच्या, ब्रिटीशांच्या व्हीगीश परंपरांवर आधारीत उदार दृष्टीकोन अनुसरला आणि ते पूर्णपणे भारतीय दिसण्यासाठी बदलला. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाल्यावर ते राष्ट्रीय सभेचे प्रमुख नेते बनले.

गांधीनी १९२० मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाची सुत्रे हातात घेतली. त्यानंतर मागण्यामध्ये सतत वाढ करत करत २६ जानेवारी १९३० काँग्रेसने भारताला स्वतंत्र जाहीर करून टाकले. १९३९ च्या सप्टेंबर मध्ये कोणाशीही सल्लामसलत न करता वॉईसरॉयने जेव्हा जर्मनीविरूद्ध युद्ध जाहीर केले. तेव्हा गांधीजी आणि काँगेसने ब्रिटीश सरकारचा पाठिंबा काढून घेतला. १९४७ मध्ये ब्रिटीशांनी भूमीची फाळणी केली आणि गांधीजींनी अमान्य केलेल्या शर्तीवर भारत आणि पाकिस्तानने वेगवेगळे स्वातंत्र्य मिळाले.

जरी अहिंसेचे तत्त्व गांधीजींनी स्वत: मांडले नसले तरी इतक्या मोठ्या राजकीय सत्तवर अहिंसेचे अवलंब करणारे ते पहिले व्यक्ती होते. हिंदू, बौद्ध, जैन, ज्यू धर्मात अनेक ठिकाणी अहिंसेच्या तत्त्वाचा उल्लेख आहे. ''माझे सत्याचे प्रयोग'' मध्ये गांधीजी त्यांच्या अहिंसेचे तत्त्वज्ञान मांडले आहे. ते म्हणतात, ''जेव्हा मी निराश होता तेव्हा मी स्मरण करतो की इतिहासात प्रत्येक वेळी प्रेमाचा आणि सत्याचा विजय होत आला आहे.'' इतिहासात अनेक क्रुरकर्मे होऊन गेले आणि काही काळासाठी ते अजिंक्य वाढले. पण शेवटी त्यांचा पराभवच झाले आहे.

''विध्वंश'' हा सर्वंकषतावादाच्या नावाखाली केला गेला की स्वतंत्र आणि लोकशाहीच्या नावाखाली (त्यातील) मृतांसाठी, अनाथांसाठी आणि गृहिनींसाठी काय फरक असणार? डोळ्यांसाठी डोळा सर्वजगाला आंधळे करून सोडेल अशी अनेक ध्येये आहे. ज्यासाठी मी जीव द्यायला तयार आहे. पण असे एकही ध्येय नाही ज्यासाठी मी कुणाचा जीव घेईन. पण गांधीजींना माहित होते की, अहिंसेचे या पातळीपर्यंत पालन करण्यासाठी प्रचंड श्रद्धा आणि धैर्य आवश्यक आहे आणि प्रत्येकाजवळच ते असणे शक्य नाही. त्यामुळे ते सल्ला देत की जर अहिंसा भित्रेपणाला झाकण्यासाठी वापरण्यात येत असेल तर प्रत्येकाने अहिंसेचे पालन करणे आवश्यक नाही.

भारत छोडो चळवळ भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामामधील सर्वात प्रभावी चळवळ ठरली. यात लाखांच्या संख्येने लोकांना अटक झाल्या. अभूतपुर्व अत्याचार करण्यात आला. हजारो आंदोलक पोलिसांच्या गोळीबारात मरण पावले. गांधीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे स्पष्ट केले की भारताला तत्काळ स्वातंत्र्य दिल्याशिवाय भारत महायुद्धात मदत करणार नाही. गांधीजींनी हेसुद्धा स्पष्ट केले की यावेळेस एखाददुसऱ्या हिंसक घटनेमुळे ही चळवळ मागे घेण्यात येणार नाही. आवारात ठरलेल्या अराजकतेपेक्षा

खरी अराजकता बरी असे सुचवून त्यांनी काँग्रेस सदस्यांना अहिंसेचे पालन करण्याचे आवाहन केले आणि भारतीयांना 'करो या मरो' (करा किंवा मरा) हा मूलमंत्र दिला.

गांधीजी आणि काँग्रेसची पूर्ण कार्यकारणी समितीस इंग्रजांनी ९ ऑगस्ट इ.स. १९४२ ला मुंबईमध्ये अटक केली. गांधीजींना दोन वर्षासाठी पुण्यातील आगाखान पॅलेसमध्ये बंदिवासात ठेवण्यात आले. तेथील वास्तव्यात गांधीजींना वैयक्तिक आयुष्यात दोन धक्के सहन करावे लागले. तरी भारत छोडो आंदोलनाला माफक यश मिळाले. करड्या जरबेने व कडक उपाययोजनांनी इंग्रजांनी इ.स. १९४३ च्या आतापर्यंत भारतातील आपले राज्य सुरळीत ठेवले होते. युद्धाच्या शेवटी इंग्रजांनी भारतीयांच्या हाती सत्ता देण्याचे स्पष्ट संकेत दिले. तेव्हा गांधीजींनी आंदोलन संपवले आणि जवळपास एक लाख राजनैतिक कैद्यांची सुटका करण्यात आली. ज्यामध्ये काँग्रेस नेत्यांचापण समावेश होता.

मृत्यू :-

३० जानेवारी १९४८ ला दिल्लीच्या बिर्ला भवनच्या बागेतून लोकांबरोबर फिरत असतांना गांधीजींची गोळी मारून हत्या करण्यात आली. त्यांचा मारेकरी नथुराम गोडसे हा एक पुरोगामी हिंदू होता. नथुराम गोडसेने महात्मा गांधी यांची हत्या करण्यासाठी बरेटा मॉडेलचे पिस्तुल वापरले होते. त्यांच्या मते पाकिस्तानला पैसे देऊन भारताला दुबळे पाडण्यासाठी गांधींजी जबाबदार होते. गोडसे आणि त्याच्या सहकारी नारायण आपटे यांच्यावर खटला दाखल करून त्यांना दोषी ठरवण्यात आले. त्यांना १५ नोव्हेंबर १९४९ ला फाशी देण्यात आली.

■ ■ ■

शैक्षणिक अभ्यास सहली २०१८-१९

विषय	ÖÖvekeÂ	nhLU
मराठी	२३/०१/२०१९	लोकुत्तर बुद्धविहार, चौका
हिंदी	१३/०१/२०१९	लोकुत्तर बुद्धविहार, चौका, फुलंब्री
इंग्रजी	13/1/2019	Lokuttar, Chauka
इतिहास	०६/०२/२०१९	श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय, औरंगाबाद
राज्यशास्त्र	०६/०२/२०१९	विभागीय आयुक्तालय, औरंगाबाद
अर्थशास्त्र	२३/०१/२०१९	नुजिविडू सिड्स लिमिटेड, नायगाव, औरंगाबाद
समाजशास्त्र	०६/०२/२०१९	बाबासाई एड्सग्रस्त मुला-मुलींचे बालकाश्रम, औरंगाबाद
वाणिज्य	०६/०२/२०१९	नुजिविडू सिड्स लिमिटेड, सावंगी, औरंगाबाद

महात्मा गांधी : जीवन व कार्य

कोलते शितल राधाकिसन
बी.कॉम. द्वितीय वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

वैष्णव जन तो तेने कहिए जे
पीड पराई जाणे रे ;
परहद: खे उपकार करे तोये,
मन अभिमान न आणे रे ।
सकल लोकामां सहुने वंदे,
निन्दा न करे केली रे ;
वाच, काछ, मन निश्चल राखे,
धन-धन जननी तेनी रे ।
समदृष्टि ने तृष्णा त्यानी,
परस्त्री जेने मात रे ;
जिव्हा थकी असत्य न बोले,
परधन नव झाले हाथ रे ।
रामनाथशु तालो लगी,
सकल तीरथ तेना तममां रे ।
वणलोभो ने कपटरहित छे,
काम क्रोध निवार्या रे ;
भणे नरसोंयो तेनु दरशन करतां
कुल अेकोतर तार्या रे ।

सत्य ! सत्यमेय जयते ! सत्याग्रह !!! सत्याचे प्रयोग..... सत्याचं सामर्थ्य हे काय असतं हे समजवणारे गांधींजी म्हणतात की, सत्याचे पुजारी, गांधीजी असे अनेक नावांनी समजणारे गांधीजी. महात्मा गांधी यांचा जन्म इ.स. दोन ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार असे महात्मा गांधी यांना म्हणता येईल. म्हणूनच त्यांना राष्ट्रपिता असा दर्जा देण्यात आला आहे.

आपल्या अहिंसात्मक आंदोलनाच्या माध्यामातून या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. गांधीजी यांचे नाव मोहनदास करमचंद गांधी. हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्त्वज्ञ होते. महात्मा गांधी या नावाने ते ओळखले जातात. महात्मा गांधीच्या वडीलांचे नाव करमचंद गांधी होते. तर त्यांच्या आईचे नाव पुतळाबाई होते. महात्मा गांधी यांची जात मूळ वाणी होती. तसेच गांधीजींची पत्नीचे नाव कस्तुरबा हे होते. पण त्यांना लोक 'बा' या नावाने ओळखत.

शाळेतील प्रसंग :-

लहानपणी योग्यवेळी त्यांना शाळेत घातलं गेलं. पोरबंदर सातव्या वर्षी त्यांना सोडावं लागलं. त्यांच्या वडिलांनी गांधीनी राजकोटच्या ठाकुरकडे दिवाण म्हणून नोकरी पत्करली. राजकोट येथे शालेय शिक्षण झालं. गांधीजींचं शालेय जीवनात ते एक सामान्य विद्यार्थी होते. त्यांच अक्षर तर मुळीच चांगलं नव्हतं. त्याची खंत अर्थातच गांधीजींना जन्मभर वाटत राहिली. गांधीजींना एके दिवशी चार वाजता शाळेत जायचंय पण घड्याळ नव्हतं. आभाळ भरून आलेलं होतं, किती वाजलेत याचा अंदाज आला नव्हता. म्हणून त्यांना शाळेत जाण्यासाठी उशीर झाला आणि त्यांना त्या दिवशी शिक्षा भेटली होती.

अहिंसेचं दर्शन :-

काबांच्या डोळ्यांतून ओघळलेले ते अश्रु नव्हे मोतीच ते ... गांधीजीचं पाप धुऊन गेले. खरं तर काबा रागावतील, संतापतील, मारतील असं काही घडण्याची गांधीजींनी मनाची तयारी ठेवली होती. पूत्रप्रेमामुळे फक्त अश्रुच डोळ्यातून ओघळले. मात्र त्यांनी आणि या प्रसंगातून गांधीजींना अहिंसेने दर्शन घडवलं. त्यांना अहिंसेच्या सामार्थ्याचा प्रत्यय आला. हे सर्व झाले आणि पुढे गांधीजींनी मॅट्रीकची परीक्षा पास झाल्यावर गांधीजींनी भावनगर येथील कॉलेजमध्ये नाव घातलं. हे शिक्षण पूर्ण झाल्यावर दुसरीकडे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांचे लग्न झाले. लग्न झाल्यानंतर त्यांनी बॅरिस्टरची पदवी धारण केली. गांधीजी हे सत्यासाठी लढले आणि ते सत्यासाठी लढणारे वकीलही होते.

स्वावलंबन :-

गांधीजींनी स्वावलंबनाची सुरूवात केली. ते दक्षिण अफ्रिकेत होते. तेव्हापासूनच स्वत:चे कपडे स्वत: धुणे, त्यांना इस्त्री करणे, स्वत:चे केस स्वत: कापणे याला त्यांनी सुरूवात केली. त्यांनी म्हटले होते की, मी 'काला आदमी' माझे केस कापले. त्याने तर त्याच्याकडे गोरे लोक केस कापण्यासाठी येणार नाहीत, असे हे स्वावलंबून.

सेवाव्रत :-

गांधीजी हे सेवाव्रतीपण होते. रूग्णांची सेवा करणे त्यांना आवडत असत. या सेवाव्रतामुळे इंग्रजांनी हिंदी लोकांकडे पाहाण्याची दृष्टी बदलली. मानवतेचा उदय झाला. ते म्हणत की, आपण त्यांना आपलं मानलं पाहिजे, हे तत्त्व महत्वाचं. दक्षिण अफ्रिकेतील वास्तव्याने गांधींना सत्याचे स्वरूप अधिक स्पष्ट झालं. ते म्हणतात, सत्य एका विशाल वृक्षासारखं आहे. त्याची जितकी सेवा कराल तेवढे तो अधिकाधिक फळ देतो. सत्य हे खाणीसारखे आहे. तुम्ही जितके खोलखोल जाल खाणीत, तेवढी अधिकाधिक मौल्यवान खनिज सापडतात.

तुरूंगातले वाचन :-

१९२१-२२ मध्ये बापूजी प्रथमत: भारतातल्या तुरूंगात येरवडा येथे दाखल झाले होते. त्यावेळेही तुरूंगातल्या लायब्ररीतून त्यांनी अनेक पुस्तके वाचली. त्यातली दोन पुस्तके त्यांना विशेष आवडली; Seekers Afer God आणि सर रूपयार्ड किपलिंगची Jungle Book या वेळेला त्यांनी हे दोन आणि असे अनेक पुस्तक वाचले.

सत्याग्रहाचा उदय :-

बोअर युद्धात गोऱ्या सैनिकांच्या जखमा धुणाऱ्यांना हिंदी सेवा द्या. पथकांसाठी युद्धानंतर ब्रिटिश सरकारनी मात्र अपमानस्पद वागणूक द्यायचं ठरवलं काय म्हणावं या कृतघ्नतेला? त्या लोकांच्या जखमा पाहून त्यांचे विचार व्यक्त करण्यास असमर्थ असत. मात्र त्यांचे डोळ्यातील भाव अधिक बोलके असत. सरकारनं युद्धानंतर एक वटहुकूम काढला. ठरल्याप्रमाणे सर्व लोकांनी कार्य कृती केली आणि सरकारने अनेकांना तुरूंगात घातलं. पण कुणीही मागे हटलं नाही. सत्याग्रहाचा कार्यक्रम मोठ्या शिस्तीत चालवला होता.

गांधीजींचे स्वावलंबन :-

रोज नियमाने चरख्यावर सूत काढायचे. हाताने विणलेले कापडच ते वापरायचे. गांधीजींचा स्वच्छता हा तर सगळ्यात महत्त्वाचा विषय. आश्रमवासियांनी आळीपाळीने सर्व स्वच्छता करायची. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह, शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन, सर्वधर्म-

समानता, स्वदेशी, स्पर्श भावना हे एकदश सेवा मी नम्रत्वे व्रत निश्चये.

कामगारासाठी लढा :-

चंपारण्याचा लढा हा एक महत्त्वाचा प्रसंग. १९१७ मध्ये चंपारण्यामध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा केला. आंदोलन केले. निळ पिकवण्याचे मळे इंग्रज मळेवाले हिंदी मजुरांकडून खूप काम करून घ्यायचे. वागणूक वाईट द्यायचे. आतोनात छळ व्हायचा. त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी गांधीजी मजूरांना भेटणार होते. याप्रकारे गांधीजींनी कामगारांसाठी विविध लढे केले.

दांडी यात्रा :-

१९२०-२२ मध्ये अहिंसक, असहकार आंदोलन केले आणि १९३०-३२ दरम्यान गांधीजींनी दांडी यात्रा काढली. १२ मार्च १९३० मध्ये मीठाचा सत्याग्रह सुप्रसिद्ध 'दांडी यात्रा' या नावाने ओळखला जातो. दांडी हे गाव सुरत जिल्ह्यात समुद्रकिनारी आहे. मिठावर कर लादून इंग्रज सरकारने राक्षसी वृत्तीची परीसीमाच गाठली होती.

मीठाचा सत्याग्रह :-

दांडी यात्रा हे स्वातंत्र्य संग्रामातील एक महत्त्वाचा पर्व. या यात्रेने देशवासियांना स्वातंत्र्याची दिशा दाखवली. गांधीजींनी मीठाचा सत्याग्रह इंग्रजाविरूद्ध केला होता. कारण की मीठ हे आपल्याला प्रत्येक गोष्टीसाठी महत्त्वाचे आहे आणि इंग्रजांनी त्यावर कर लादला होता. म्हणून मीठाचा सत्याग्रह केला.

चले जाव :-

अहिंसेचे उपासक गांधीजी इंग्रज सरकारवर चांगलेच चिडले होते. त्यामुळे ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत अखिल भारतीय काँग्रेस समितीय बैठक आयोजित केली. त्या दिवशी 'छोडो भारत' ही घोषणा करण्याचं ठरवलं. 'ब्रिटिश सरकार चले जाव', 'करंगे या मरेंगे' अशी घोषणा केली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळालं. गांधीजींचे म्हणणे सत्य, अहिंसा, प्रेम या त्रिसुत्रीचा ते अवलंब सर्वत्र करत. ग्रामोद्योगानेच सर्वांचा विकास होईल, ग्रामस्वच्छता हीच रोगराई निर्मूलन करेल, साक्षरता प्रसारानेच सगळे सुबुद्ध होतील, हे विचार आजही किती समर्पक आहेत. वाईट बोलू नका, वाईट पाहू नका, वाईट ऐकू नका. ही त्यांची तीन माकडे.

३० जानेवारी १९४८ रोजी गांधीजी सायंकाळच्या प्रार्थनेसाठी निघाले. वाटेत त्यांच्यावर नथुराम गोडसेनी गोळ्या घातल्या. गांधीजी जमिनीवर पडले. त्यावेळी 'हे राम' हे शब्द म्हणाले. असा हा सत्याचा पुजारी! अहिंसेचा उपासक! देवाघरी निघून गेला. 'हे राम' 'हे राम' 'हे राम'

स्वच्छ भारत! सुंदर भारत!

■ ■ ■

एखादा देश आणि त्याची नैतिक मूल्ये किती महान आहेत, हे तिथल्या प्राण्यांना कशी वागणूक देतात त्यावरूनही कळते. **- म. गांधी**

गांधी व त्यांचे विचार

मानसी गुलाबराव पवार
बी.कॉम. द्वितीय वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

गांधी महान, गांधी महान !!

गांधी महान, गांधी महान

हे सत्य अहिंसेचे प्रतीक, हे प्रश्नांचे उत्तर सटीक

हे युगनिर्माता, युगाधार, आतंकित तुझ्यातनं पाप-पुंजी आलेकित

तुझ्यातनं हे जग महान!

ही सुरूवात आहे गांधींची, गांधी म्हणजे महात्मा गांधी. पुर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. काय निष्ठा आहे नावातच, 'कर्म' आणि 'दासांचा' बोध होतो. गांधी (मोहनदास गांधी) यांचा जन्म १८६९ च्या ऑक्टोबरच्या २ तारखेला पोरबंदर अथवा सुदामपूरी येथे झाला. गांधी कुटुंब प्रथम तरी किराण्याच्या मालाचा व्यापार करणारे. परंतु त्यांच्या आजोबांपासून ते गेल्या तीन पीढ्या ते राज्यकारभार करत आले. बालपणाविषयी गांधी म्हणतात की जे वय मला आठवतं तेथुन ते कुमारवयापर्यंत मी कधीही शिक्षकांशी लबाडी केल्याचे किंवा कोणाशी मैत्री केल्याचे स्मरत नाही.

गांधी हे स्पष्ट वक्ते. निर्भिडपणा हा कणाच म्हणावा. गांधी स्वत:ला सत्याचे पुजारी मानत आणि ते तेच होते. एक सत्य व्यक्तिमत्व दिसून येतं यांच्यातनं. गांधी सर्वांचे प्रिय सारथी शांती आणि सत्य हे जपणारे, जाणणारे आणि जाणून देणारे. एक सरळ आणि स्पष्ठ व्यक्तिमत्व. गांधीच्या विचारांनी किंवा त्यांच्या विचारांतून सर्वश्रेष्ठत्वता सत्याला दिली जाते. सत्य, अहिंसा, मानवीय स्वतंत्रता, समानता आणि न्याय. यावरून त्यांच्या व्यक्तिमत्व जीवनाला जास्त महत्वशिलतेने समजू शकतो. सत्य आणि अहिंसेचा मार्ग शस्त्राच्या धारेसारखा तीक्ष्ण असतो. अहिंसा म्हणजे भित्रेपणाचा आडपडदा नव्हे. तो शुराचा सर्वश्रेष्ठ सद्‌गुण असतो. तिचा उपयोग करताना तलवार बहादुरीपेक्षा कितीतरी अधिक पराक्रमाची गरज आहे. भित्रेपणा अहिंसेशी सर्वस्वी विसंगत असतो.

गांधी म्हणायचे, 'सत्य' हा माझा ईश्वर आहे आणि सत्याचा शोध मला अहिंसेच्या मार्गानेच घ्यावा लागातो. सत्याची चव कधीही बदलत नाही. ते मिठाप्रमाणे तीक्ष्ण आणि प्रभावी असते. सत्य हे बलवाने शस्त्र आहे. जो सत्याच्या बाजूने, विजय त्याच्याच बाजूने सत्य हे परम सत्य आहे. सत्याने जग चालत आहे. जन्म जितकं सत्य आहे तिकच मृत्यू हे सत्य आहे. आपल्या विचारांप्रमाणे आपण घडतो. आपण जर स्वत:ला दुर्बळ समजलं तर दुर्बळ बनू आणि सामर्थ्यशाली समजलं तर सामर्थ्यशाली बनू. सत्याला हजारो प्रकारे बनवू शकतो. पण तरीही प्रत्येक सत्य हे एक सत्यच असेल.

'हरीनो मार्ग छे शुरानो' सत्याचा मार्ग हा शुरांचा आहे. सत्य हे जिवनातील सर्वोत्तम मूल्य आहे. यानंतर आपण गांधीजींच्या, राजकीय तत्त्वज्ञानाची म्हणजे गांधीवादीची विचारांची सारणी बघू. गांधीवाद हा जीवनाचा एक दृष्टीकोन आहे. जीवनाची एक शैली आहे. गांधीजींनी आपले राजकीय तत्त्वज्ञान 'हरिजन' व यंगइंडिया' या वर्तमानपत्रांतून व्यक्त

केले होते. त्यांनी कर्म चिंतन त्यांचा समन्वय साधला होता. गांधीजी वर्गविहीन समाजाची स्थापना करू इच्छित होते. गांधीवाद हा विकेंद्रीकरणावर भर देतो. गांधींनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यांच्यावर अनेक ग्रंथांचा प्रभावही होतो. ते म्हणत, गीतेने मला संकट काळात मार्गदर्शन केले. (श्रीमत्‌भगवतगीता) त्यांना अहिंसक विचाराचे शिक्षण बायबल मधून मिळाले.

गांधी एक प्रभावी व्यक्तिमत्व. त्याच्यावर अने वक्तव्य झाले. अमेरिकन जॉन हेन्स होल्मस् यांनी गांधीजी म्हणजे येशू ख्रिस्तानंतरचे श्रेष्ठ मानव असे गौरवोद्गार काढले होते. गांधीजी आदर्श जीवन व्यवहाराची जी प्रमुख तत्त्वे सांगितली आहेत. तीच एकादश तत्त्वे म्हणून प्रसिद्ध आहेत. मनुष्याला मोह स्वार्थी बनवतो आणि त्यातूनच तो जास्तीत जास्त संग्रह करत जातो. ही संग्रहलालसा एवढी तीव्र तर असते की त्याची मजल पुढील बेगमी सात पिढ्यांची करण्यापर्यंत जाते. म्हणूनच मनुष्याच्या संग्रहपराङमुखतेवर गांधींचा कटाक्ष होता. म्हणूनच त्यांनी साधी राहणी व कमीत कमी गरजांचा पुरस्कार केला. सत्याग्रह विषयीही गांधी ठाम होते. ते म्हणत गॅलिलिओ व कोलंबस हे थोर सत्याग्रही होते. गॅलिलिओ समाजाने प्रस्थापित विचारांचा छेद देणारे विचार मांडत व कोलंबस ही मृत्यूदंडाची भिती न बाळगता आपल्या मतावर ठाम निर्भिड असतो. जे शक्ती आणि सत्तीच्या जोरावर मिळवले जाते ते केवळ शक्ती आणि सत्तीच्या आधारावरच राखले जाऊ शकते. त्यामुळे सत्याग्रह हा अधिक शाश्वत आणि चिरायू असा मार्ग आहे. सत्य आणि अहिंसेच्या संयोगातून निर्माण झालेले हे अत्युच्च्य समार्थ्य आहे.

'नैतिकता' हाच गांधीप्रणित आर्थिक विचारांचा कणा होता. गांधीजी आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाचे कठोर विरोधक होते. गांधीजींनी 'विश्वस्ताची' संकल्पना मांडली. विनियोग स्वउपभोगासाठी नसून समाजउत्थानासाठी आहे याचे भान असणे हेच विश्वस्त. संपत्ती प्रवाहपतित होणारी नाही यासाठी जगल्याची भूमिका संपत्तीमान वर्गाने स्वीकारली पाहिजे. श्रीमंत होणे म्हणजे इतरांचे शोषण करणे, या प्रस्थापित मान्यतेतच संघार्षाची बीजे रोवली आहेत असे गांधीजींना वाटते. श्रीमंत वर्गाने शोषण महापाप मानायला हवे व इमानेइतबारे आपली विश्वस्ताची भुमिका पार पाडली पाहिजे असा महान विचार गांधीजींनी समाजापुढे मांडला. सत्य व अहिंसा हाच राज्यविहीन समाजाकडे जाण्याचा मार्ग आहे असे ते मानत. गांधीजींचा प्रजातंत्रात्मक नेतृत्वावर विश्वास होता. गांधींना धर्माशिवाय राजकारणाची कल्पनाच मान्य नव्हती. महात्मा गांधींनी अध्यात्मिक मूल्यांवर भर दिला.

गांधीवाद जीवनाचा एक दृष्टिकोन आहे. जीवनाची एक शैली आहे. मनुष्याच्या जीवनातील समस्यांचे निराकरण करणारी ती पद्धत आहे. सत्य, अहिंसा,. अपरिग्रह विश्वस्त संकल्पना, अराज्यवाद, साधनशुचिता इत्यादी विषयांवरील विचार गांधींच्या राजकीय तत्वज्ञानातूनं येतात. गांधी म्हणतात, 'मला स्वराज्याच्या आधी अहिंसा अपेक्षित आहे.'

अशा ह्या महान व्यक्तिमत्त्वाने आपले सर्व जीवन देशासाठी देशाच्या हितासाठी समर्पित केले. म्हणजे त्यांनी फक्त देशाच्या हिताचाच विचार केला. पण दुर्भाग्य असे की अशा महान व्यक्तिचे विचार व त्या विचारांचे अस्तित्वच मान्य करायला कधी तयार झालोच नाही. फक्त विरोधाभासाचा ढोल घेऊन फिरत असतो. बदल घडायला हवा आणि त्यासाठी तरी त्यांच्या विचारांचे अस्तित्व मान्य करावेच लागेल.

■ ■ ■

महात्मा गांधी

प्रतिक्षा भाऊसाहेब पवार
बी.एस्स्सी. द्वितीय वर्ष
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं)

ज्या माणसाने सत्यनिष्ठेच्या जोरावर अहिंसेचा मोठा मंत्र या जगाला दिला आणि सत्य, शिव व सुंदर या तीन चिरंतन मूल्यांवर श्रद्धा, परमेश्वरावर निष्ठा, दलितांबद्दल प्रेम, माया, वात्सल्य, देशनिष्ठा या गोष्टी ज्या मानवाच्या जीवनातील कार्यास पायाभूत ठरल्या, ते म्हणजेच राष्ट्रपिता महात्मा गांधी. ज्यांना सर्वजन प्रेमाने 'बापू' म्हणत.

जगातील अनेक नेत्यांपैकी ज्या नेत्याला मी आदर्शवादी मानले ते म्हणजेच राष्ट्रपिता महात्मा गांधी. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ मध्ये गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. राष्ट्रपिता म्हणून गांधीजींचे नाव संपुर्ण भारताला माहीत आहे. मोहनदास करमचंद गांधी हे राष्ट्रपिता महात्मा गांधी. हा एक साधकाच्या विकासाचा प्रवास सुमारे ८० वर्ष लांबीचा आहे. त्याचे एक टोक पोरबंदर आणि दुसरे टोक राजघाट आहे. १८६९ साली पोरबंदर येथे जन्मलेल्या या बालकात कोणतीही अलौकिक गुणसंपदा नव्हती. सर्वसामान्य मुलांप्रमाणेच आईच्या कुशीतून या बालकाचा जन्म झाला. सर्व सामान्यांप्रमाणेच या मुलाचे पालन-पोषण आणि शिक्षण-संवर्धन झाले. बुद्धिमत्ताही विशेष नव्हती. रूप आणि गुण या संदर्भातही काही वेगळे वैशिष्ट्य नव्हते.

पण एक होते, अंगी भरपूर हुडपणा असुनही काही विशिष्ट्य चांगुलपणाचा प्रभाव या मुलावर जन्मजात होता. त्यामुळेच आईने किंवा आजीने रामकथा ऐकविल्या कि त्यातल्या रामाच्या पितृभक्तीचा, एक पत्निव्रताचा प्रभाव या मूल्यावर पडे. राजा हरिश्चंद्र, दधीची यांच्या कथांतून त्याला सत्याचरणाची, त्यागाची, बलिदानाची प्रेरणा मिळे. उनाडपणा, चोरी, व्यसनाधिनता या दूर्गुणांची शिकार होवूनही दैवी गुण-संपदेला शरण जाण्याची मनोवृत्ती या मुलाची संपली नाही. किंबहुना ती अधिक वाढली आणि त्यामुळेच मोहनदास गांधीचे व्यक्तिमत्व राष्ट्रपिता महात्मा गांधीमध्ये झपाट्याने रूपांतरित होत गेले. या परिवर्तनाला ते आतल्या आवाजांचा आधार देते. या आतल्या आवाजालाच ते सत्य, ईश्वर, सर्व काही समजत आणि जीवनातले सर्व निर्णय याच एका कसोटीवर अत्यंत निर्भयपणे होत. हे निर्भयपणा म्हणजेच गांधीजींचा सत्याग्रह, म्हणजेच सत्याचा आग्रह.

महात्मा गांधीजींच्या जीवनात ही वृत्ती अगदी त्यांच्या बालपणापासून दिसून येते. शाळेत शिकत असतांना एका वर्गशिक्षकाने त्यांना कॉपी करण्यास प्रवृत्त केले. पण लहानग्या मोहनदासने गुरूजीच्या त्या आग्रही प्रयत्नांना दाद दिली नाही. उलट गुरुजींचा तिरस्कार केला आणि स्वत:चा सन्मान राखून, आपल्या आतल्या आवाजाला साक्षी ठेवून, जेवढे ठाऊक होते तेवढेच इमानदारीने उत्तरपत्रिकेत लिहिले आणि आनंदाने परिक्षकाने दिलेले गुण स्विकारले.

ही सत्यशिल प्रामाणिक वृत्ती गांधीजींनी शेवटपर्यंत जोपासत नेली. एवढेच नव्हे तर राष्ट्राच्या जीवनात, राजकारणात, समाजजीवनात या वृत्तीचा आग्रही स्वीकार केला आणि सत्याग्रहाचे सुलभ तंत्र विकसित केलं.

सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह. सत्य अधिक आग्रह त्या सत्याच्या आग्रहालाच गांधीजींनी ईश्वर मानले आणि त्या सत्याचा आग्रह हीच ईश्वराची पूजा मानली. गांधीजींच्या सत्याग्रहालाच अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह या दैवी संपदेचे अधिष्ठान होते. या सत्याग्रह शक्तीचा पहिला अनुभव त्यांनी दक्षिण आफ्रिकेत घेतला. मिर कासीम नावाच्या मुस्लिम नेत्याने त्यांना डर्बनच्या रस्त्यावर बेदम मारहाण केली तेव्हा आणि आगगाडीत पहिल्या वर्गाच्या डब्यातून त्यांना एक ब्रिटीश प्रवाशाने डब्याच्या बाहेर फेकण्याचा व लाथाबुक्क्यांनी मारण्याचा प्रयत्न केला तेव्हा. या दोन्ही प्रसंगात गांधी अचल रहिले, अहिंसक राहिले आणि आपल्या हक्कांबद्दल निग्रही व आग्रही राहीले.

गांधीजींनी आपल्या आत्मकथेत या सत्याग्रह वृत्तीचे श्रेय आपली जीवनसंगिनी कस्तुरबांना दिले आहे. एवढेच नाही तर या सत्याग्रहाचे धडे मी बाकडून शिकलो. ती माझी या क्षेत्रातील गुरु आहे असेही म्हटले आहे.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले आणि पाठोपाठ देशाच्या सिमेवरती जातीय दंगली उसळल्या. जिवित आणि मालमत्ता सर्वच असुरक्षित झाले. पश्चिम बंगालमधील नावाखाली भागात या सैतानी प्रवृत्तीचा अतिरेक झाला. तेथे गांधीजींनी आपल्या दोन कोवळ्या नातींना घेऊन शांतीयात्रा काढली. माणासांचे धार्मिक वैमनस्थाच्या नावावर रोज मुडदे पडताहेत. लहान मुलेसुद्धा चेंडूसारखी मारून रस्त्यावर फेकली जात आहेत. स्त्रिया सुरक्षित नाहीत, अशा पार्श्वभूमीवर गांधीजींची शांतीयात्रा एका गावातून दुसऱ्या गावात चालली होती. एक दिवस त्यांच्या एका लाडक्या नातीकडून चूक घडली. सामानाची आवराआवर करतांना दोन इंच लांबीचा पेन्सिलचा तुकडा ती मागच्या मुक्कामावर विसरली. दुसऱ्या मुक्कामावर गांधीजींनी तिला ती पेन्सिल मागितली. पेन्सिल मिळाली नाही तेव्हा गांधीजींनी काय करावे? रात्रीच्या भयाण अंधारात आणि भयाकूल परिस्थितीत तिला पाच मैल मागच्या मुक्कामावर पाठवली ती सहीसलामत कवडी किंमतीची पेन्सिल घेऊन आली. पण तिला मृत्यूच्या खाईत गांधीजींनी लोटले. केवळ पेन्सिल ही सुद्धा राष्ट्रीय संपत्ती आहे आणि तिचे जतन जिवाच्या मोलानेच केले पाहिजे हे शिकवण्यासाठी गांधीजींच्या सत्याग्रहाची हीच मूळ बैठक होती. सत्याग्रह हे दुसऱ्यावर दडपण आणण्याचे शस्त्र नसून आत्मविकासाचे ते प्रभावी माध्यम आहे. हा मुलभूत विचार गांधीजींनी सत्याग्रहाच्या पाठी उभा केला आणि प्रचंड उर्जेचा एकस्त्रोत सामान्य माणसांसाठी, त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी, त्यांच्या धार्मिक उन्नयनासाठी, त्यांच्या राष्ट्रसंरक्षक वृत्तीसाठी येथे सिद्ध करून दाखविला. सर्व अर्थाने एक दुबळा माणूस सत्याग्रहाच्या माध्यमाने किती उंचीवर पोहोचू शकतो आणि संपूर्ण राष्ट्राला पितृत्वाचे उबदार पांघरुण घालू शकतो हे सिद्ध करून दाखविले.

गांधीजींची साधी राहणी ही या देशाशी एकरूपतेचे प्रतिक होते. ही एकरूपता एवढ्या पराकोटीची की विल्सटन चर्चिलने त्यांना 'भारताचा नंगा फकीर' म्हणून हिणवले तरी त्या कुचेष्टेची पर्वा न करता तो आपला गौरव आहे असे त्यांनी मानले. श्रम-निष्ठा, वर्धा शिक्षण योजना किंवा नई-तालीम किंवा जीवन शिक्षण या नावाने प्रसिद्ध आहे.

महात्मा गाधींनी शिक्षणविषयक परिवर्तनाच्या इच्छेने १९३९ साली वर्धा येथे देशातील बहुतेक सर्व शिक्षणतज्ज्ञांनी एक परिषद आयोजित केली होती. त्या परिषदेची सुत्रे डॉ. जाकीर हुसेन यांच्याकडे होती. या परिषदेसमोर गांधीजींनी आपले शिक्षण-विषयक विचार सुत्ररुपाने पण विस्ताराने विषद केले. त्या परिषदेची सुत्रे डॉ. जाकीर हुसेन यांच्याकडे होती. या परिषदेसमोर गांधीजींनी, त्यावर विद्वानांनी सविस्तर चर्चा केली. त्या चर्चेत वास्तव फलित म्हणजेच वर्धा

शिक्षण योजना, नई तालीम यासंबंधी एक पुस्तिका तयार करण्यात आली.

वर्धा शिक्षण योजना वा नई-तालिम या संबंधीच्या पुस्तकाला महात्मा गांधींनी उपोद्घात लिहिला असून डॉ. जाकीर हुसेन यांनी सविस्तर प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेत अभ्यासक्रम निर्मितीचे सूत्र काय असावे हे सांगतांना त्यांनी लिहीले की अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांच्या जीवनातून उत्स्फूर्तपणे विकसित झाला पाहिजे. हीच वर्धा शिक्षण योजना पुढे स्वराज्यात जीवनशिक्षण योजना या नावाने प्रसारात आली. या योजनेचे महत्त्वाचे पैलू असे –

१) या योजनेचा अभ्यासक्रम १ ते ७ साठी होता.

२) या सातही वर्षांचे विद्यार्थ्यांचे शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून व्हावे अशी अट होती.

३) शाळा किमान ६ तास चालावी. पैकी तीन तासांचे पुस्तकी शिक्षण व तीन तासांचे श्रम-शिक्षण आणिआत्म-संयम.

या गोष्टी त्यांच्यामधील साधुत्ववृत्तीच्या निदर्शक होत्या. त्यांनी सत्याग्रहाच्या तंत्राने पारतंत्र्याविरुद्ध प्रतिकार केला. पदयात्रांच्या निमित्ताने देशवासियांत पुरुषार्थाचा पाया घातला. गांधीजींचे हे कार्य एवढे मोलाचे आहे की, त्यांच्या कृतिशीलतेची लहानशी स्मृतिसुद्धा माणसाचे आत्मभान जागृत करते, आणि देशभक्ती आहे ही प्रकाशमय जाणीव सर्वत्र पसरविते.ज्या थोड्या राष्ट्र-धुरिणांनी या धवल हिमालयांपासून तो विशाल सागरापर्यंत पसरलेल्या विशालकाय भारत देशाची नाडी ओळखली होती त्यात महात्मा गांधी हे प्रमुख होते. या देशाशी अंतर्बाह्य ओळख असल्यामुळेच ते नेहमी माझा देश चिमूटभर शहरात नसून ढीगभर खेड्यात विखुरलेला आहे असे म्हणत असत. या ग्रामीण भारताच्या उभारणीचे विधायक चिंतन सतत ते करीत असत. अशिक्षित देश, श्रम, शिक्षण आणि स्वावलंबन यांच्या आधाराशिवाय उभाराहू शकणार नाही अशी त्यांची धारणा होती. या धारणेचाच एक परिपाक म्हणून त्यांनी साध्या पण स्वच्छ राहणीचा स्विकार केला होता. आणि देशवासियांसाठी तसा आग्रह धरला होता. संपत्तीची उत्पत्ती कठोर श्रमाशिवाय शक्य नाही म्हणून त्यांनी श्रमनिष्ठेचा आवर्जुन पुरस्कार केला होता. हे सारे देशाला आणि विशेषतः उद्याच्या नव्या पिढीला सातत्याने शिकवले गेले पाहिजे, या हेतूने त्यांची शिक्षण विषयक विचारांची नवी देणगी या देशाला दिली. गांधीजीची या देशाला मिळालेली ही महत्त्वपूर्ण देणगी होती.

४) नोकरीचा संबंध प्रमाणपत्र वा पदवीशी न ठेवता तो अंगभूत गुणवत्तेशी व श्रमकुशलतेशी गृहीत धरला होता.

५) हात आणि डोके म्हणजेच श्रम आणि बुद्धी या दोहोंची गती आणि किंमत समान असावी, अशी अपेक्षा राखली गेली होती.

महात्मा गांधींचे हे विचार या खंडप्राय देशावर दूरगामी परिणाम करणारे व देशाचे अंतर्बाह्य परिवर्तन घडवून आणणारे क्रांतिकारी विचार होते. आजपर्यंतच्या शिक्षण-प्रणालीत या मूलभूत गोष्टींचा विचार कधीच झाला नव्हता. इंग्रजी राजवटीला पूरक असे कारकून तयार करणे व राजकर्त्यांच्या संस्कृतीचा प्रभाव येथील नागरिकांवर रुजविणे एवढाच सिमित हेतू इंग्रजी राजवटीत मेकॉलेप्रणीत शिक्षण पद्धतीचा होता. हा हेतू स्वतंत्र भारताला अंशमात्राही परवडणार नव्हता.

महात्मा गांधीजींनी कामाच्या निमित्ताने जिथे जिथे वास्तव्य केले तिथे तिथे त्या वास्तव्याला त्यांनी घर न म्हणता आश्रम म्हटले. आश्रम म्हणजे श्रमावर आधारित जीवनपद्धती जिथे स्वीकारली जाते ते ठिकाण लोकशिक्षणासाठी

गांधीजींनी अनेक ठिकाणी असे लहान-मोठे आश्रम निर्माण केले होते. त्या आश्रमांद्वारा लोकांना आणि खुद आश्रमवासियांना श्रमनिष्ठ जीवनप्रणाली जगण्याचे शिक्षण देण्याचा आणि देशामध्ये एक श्रमदान संस्कृती साकार करण्याचा मनःपूर्वक प्रयत्न केला होता.

महात्मा गांधी हे श्रम आणि स्वावलंबन या संस्काराचे पुरस्कर्ते होते. प्रत्येक मानवमात्राला स्वतःची कामे स्वतः करता आली पाहिजे. त्यासाठी तो परावलंबी असता उपयोगी नाही. यासाठी संपुर्ण समाजाला श्रमाचा आणि साधे जीवन जगण्याचा संस्कार दिला पाहिजे. ही त्यांची सतत धडपड होती.

श्रमाचे रहस्य आपल्या भारतीय संस्कृतीनेच गायिले आहे. श्रमाशिवाय जगतो तो चोर अशी भगवद्गीतेचीही शिकवण. गांधीजी हे भारतीय संस्कृतीचे पायिक आणि भगवद्गीतेचा परम उपासक होते. सततच्या डोळस प्रयत्नाने त्यांनी तो मूल्यसंस्कार जोपासला सुद्धा! आणि म्हणूनच त्यांच्या दैनंदिन प्रातःकालीन व सायंकालीन प्रार्थनेत,

फोकट खावे । चोर कहावे ।

गीता की आवाज है ।।

असा सूत्रपाठ असे. श्रमशक्तीचा पुरस्कार ही महात्मा गांधीजींची भारतीय मानवी समाजाला आणखी एक परिवर्तनकारी देणगी आहे. ही गांधीजींची देणगी भारतीय समाजपुरुषाने मनापासून स्विकारली तर त्यांच्या अंतरंगातील सारी परंपरागत मरगळ निघून, संपून जाईल आणि भविष्यकालीन समाज निकोप, निरामय, शोषणमुक्त, स्वावलंबी आणि श्रमजीवननिष्ठ बनेल. गांधीजींच्या श्रमदान-पुरस्कारामागे ही भावनिक अपेक्षा अनुस्यूत आहे.

महात्मा गांधीजींनी इंग्रजी सत्तेच्या राजकीय गुलामगिरीतून भारताला मुक्त केले. त्यामुळे लोक त्यांना राजकारणी मानतात. पण ही वस्तुस्थिती वास्तव नाही, खरी नाही. गांधीजी आधी समाजकारणी, समाजसेवी होते. तद्नंतर ते राजकारणी होते. त्यांचे राजकारणसुद्धा समाजसुधारकी थाटाचे तत्त्वनिष्ठ आणि सत्याच्या अधिष्ठानावर आरुढ झालेले होते.

महात्मा गांधींचा जन्म भारतात झाला म्हणून आपण त्यांना भारतीय म्हणतो. ते जन्माने हिंदू होते म्हणून आपण त्यांना हिंदू समजतो. परंतु त्यांच्या भावनिक कक्षा भारतीय सिमा उल्लंघून वैश्विक पातळीवर स्थिरावल्या होत्या. त्यांचा धर्म हिंदुत्वाच्यापुढे सर्वधर्म समभावाच्या बैठकीवर जाऊन पोचला होता. जात, धर्म, प्रदेश, पक्ष यांच्या पैलतिरी जाऊन केवळ मानवजातीचाच साकल्याने ते विचार करीत होते. त्यामुळे राज्यव्यवस्थेसंबंधीसुद्धा त्यांचे विचार पारंपरिक विचारांहून वेगळे आणि चिंतन करण्यायोग्य होते.

आजची राज्यव्यवस्था शोषणावर आधारित आहे. जित आणि जेता, प्रजा आणि नेता यामधील परस्पर संबंधावर राज्य-व्यवस्थेची उभारणी आहे. सैन्य, बंदुका, तोफा, अन्नवस्त्रे हे या राज्यव्यवस्थेचे अविभाज्य आधार आहेत. एकाचे श्रम दुसऱ्याने उपभोगावे, एकाची शक्ती दुसऱ्याच्या संरक्षणासाठी वापरली जावी. किंबहुना दुसऱ्याची संपत्ती आपली मानावी, अशी काहीशी या राज्यव्यवस्थेत सोय आहे. अगदी कल्याणकार्यत्वाचा डांगोरा पिटणारी लोकशाही शासनव्यवस्था सुद्धा या व्यवच्छेदक लक्षणापासून मुक्त नाही.

महात्मा गांधींचे रामराज्य म्हणजे सज्जन माणसांचे राज्य. माणुसकीचे राज्य. परस्पर करुणेचे व सहानुकंपेचे राज्य. या राज्यात गरजवंतांची गरज हीच त्याची क्रयशक्ती. आजार असेल तेथे औषधीने पैशाच्या मदतीशिवाय धावून गेले पाहिजे. भूक असेल तर भाकरीचे समर्पित झाले

पाहिजे. उघडा असेल तरी वस्त्राने अस्वस्थ झाला पाहिजे. पांगळ्यासाठी बलवंताने स्वतःहून पांगूळगाडा बनले पाहिजे. ही महात्माजींच्या रामराज्याची आधारशिला. गांधीजींनी आपल्या या रामराज्याला मानवतेचे अधिष्ठान आणि नैतिकतेचे अभेद्य कवच गृहीत धरले होते. रामराज्य संकल्पनेच्या निमित्ताने महात्मा गांधींनी एका सुंदर आणि निरामय विश्वाचे सुरम्य स्वप्न मनाशी जोपासले होते. आणि त्यांच्या प्रकटीकरणासाठी स्वतःचे संपूर्ण जीवनच त्यांनी धगधगता यज्ञकुंड बनविले होते.

आपल्या आयुष्यात सत्य व अहिंसा या तत्त्वाचे त्यांनी काटेकोर पालन केले. पण हरिजनांसाठी, देशासाठी लढणाऱ्या समतेवर आधारीत समाजव्यवस्था आणू पाहणाऱ्या आणि राष्ट्रऐक्यासाठी सर्वधर्म समभावाचा आग्रह धरणाऱ्या विचारसरणीच्या प्रणेत्याचा या विचारांना विरोध असलेल्या विचारसरणीने ३० जानेवारी १९४८ रोजी वध केला आणि शेवटी जाता जाता त्यांनी दोनच शब्द उद्‌गारले 'हे राम'...

महात्मा गांधींनी आपल्या आयुष्यात जितके कमावले, जितकी किर्ती संपादन केली, जितके प्रेम मिळवले, तितके कोणत्याही ऐतिहासिक महापुरुषाने क्वचित मिळविले असेल !

■ ■ ■

या जगातल्या सर्व महान धर्मांच्या मुलभूत सत्यावर माझा विश्वास आहे. ही सगळी देवाचीच देणगी आहे, हेही मला मान्य आहे. म्हणूनच फार पूर्वी मी एक निष्कर्ष काढलाय की; सर्वच धर्म सत्य आहेत आणि सर्वांमध्ये काहीना काही चूका आहेत. **- म. गांधी**

महात्मा गांधीजींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

डगळे पूजा बाळासाहेब
बी.एसस्सी. द्वितीय वर्ष
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं)

मोहनदास करमचंद गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्वज्ञ होते. महात्मा गांधी या नावाने ते ओळखले जातात. अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधीजींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरित केले. रवींद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम त्यांना महात्मा (महान आत्मा) ही उपाधी दिली. भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत आणि त्यांना अनधिकृतपणे भारताचे राष्ट्रपिता म्हटले जाते. सुभाषचंद्र बोस यांनी इ.स. १९४४ मध्ये पहिल्यांदा त्यांना राष्ट्रपिता असे संबोधले असे म्हणतात. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. त्यांचा जन्मदिवस २ ऑक्टोबर हा भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भारतात सार्वजनिक सुट्टी असते.

महात्मा गांधी एक महान स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य भारताच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी खर्च केले. महात्मा गांधींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातच्या पोरबंदर मधील हिंदू कुंटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील करमचंद गांधी हे पोरबंदर राज्यात दिवाण म्हणून काम करत असत. त्यांच्या आईचे नाव पुतळीबाई होते. त्यांना वाचनाची आवड होती. त्यांना गोष्टी वाचायला आवडत असे आणि त्या गोष्टी त्यांच्या मनावर खोलवर परिणामही करत असत. त्यांचे प्राथमिक शिक्षण राजकोटमध्ये पूर्ण झाले. वयाच्या चौदाव्या वर्षी महात्मा गांधीजींचे लग्न तेरा वर्षीय कस्तुरबा कपाडिया यांच्याशी झाले. नंतर त्यांना कस्तुरबा गांधी म्हणून ओळखले जाऊ लागले. महात्मा गांधींच्या पत्नी कस्तुरबा गांधीनीही त्यांना विविध चळवळीमध्ये साथ दिली. गांधीजी जेलमध्ये असताना त्यांनी चळवळीचे अध्यक्षपद सुद्धा सांभाळले. त्यांनी महात्मा गांधीजींना शेवट पर्यंत साथ दिली. पुढे जाऊन पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये त्यांचा मृत्यू झाला.

गांधीजींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

महात्मा गांधी ९ जानेवारी १९१५ ला अफ्रिकेहून भारतात आले. ९ जानेवारी हा दिवस भारतीय प्रवासी दिवस म्हणून साजरा केला जातो. महात्मा गांधी भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक महत्त्वाचे व्यक्ती असून त्यांनी भारतीय राजनितीला संपूर्णतया बदलून टाकले होते. सत्याद्वारे त्यांनी अनेक चळवळी यशस्वी केल्या. कोणतीही हिंसा न करता आपल्या मागण्या पूर्ण करुन घेणे हे त्यांच्या सत्याग्रहाचे प्रतिक होते. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात त्यांचे योगदान मोलाचे मानले जाते.

गांधीजींनी आपल्या कार्याची सुरुवात अफ्रिकेमध्येच केली होती. त्यांनी अफ्रिकेमध्ये गोऱ्या लोकांच्या वर्णद्वेषाच्या धोरणाच्या विरोधात सत्याग्रह केला होता. राजकारणाला पूर्णतया वेगळे वळण लावणारे व्यक्ती म्हणून गांधीजी इतिहासात प्रसिद्ध आहेत. शांततेच्या मार्गाने चळवळ करावयाची त्यासाठी तुरुंगवास, क्लेश सोसण्यास तयार असत. परिस्थिती प्राण घेण्यावर आली तरीही सत्याग्रहाचा मार्ग सोडावयाचा नाही हे त्यांचे धोरण असे.

चंपारण्य सत्याग्रह (१९१७)

बिहारमध्ये नीळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर तेथील इंग्रज मळेवाले व्यक्ती नीळ लावण्याची सक्ती करत असत. तेथील सर्व मळे ब्रिटीशांच्या मालकीची असत. नीळ हे नगदी पीक असून ती नीळ विकून तेथील मळेवाले भरपूर धन कमवित, पण त्याच्या विपरीत खूप कष्ट करुन काम करणारे तेथील शेतकरी त्यांची आर्थिक परिस्थिती खूप बिकट होती. अशा परिस्थितीत गांधीजींनी शेतकऱ्यांचे नेतृत्व करुन त्यांचा लढा यशस्वी केला. त्यामुळे इंग्रज पोलीसांनी त्यांच्या विरोधात खटला भरला होता. गांधीजींनी गुन्हा कबूल करुन आपल्याला शिक्षा करावी असे सांगितले. सर्व देशभर या खटल्याची चर्चा झाली. लोकमताच्या दबावाखाली सरकारला हा खटला वापस घ्यावा लागला. तसेच चंपारण्यात शेतमजूरावर होणारे अन्याय देखील इंग्रज मळेवाल्यांना थांबवावे लागले. आता भारतीय राजकारणात नवे व्यक्तिमत्वे आली आहे याची चर्चा सर्वत्र होऊ लागली. येथूनच गांधीचा भारतीय राजकारणात प्रवेश झाला.

अहमदाबादच्या गिरणी कामगारांचा संप (१९१८)

शेतकऱ्यांच्या प्रश्नाप्रमाणे गांधीजींनी गिरणी कामगारांच्या प्रश्नाकडे देखील लक्ष दिले. अहमदाबाद येथील गिरणीत काम करणाऱ्या मजुरावर अन्यायाविरुद्ध कोण्यातरी व्यक्तीला आवाज उठवावा लागणारच होता. याचा भार गांधीजींनी आपल्या डोक्यावर घेतला. त्यांनी तेथील सर्व गिरणी कामगारांना संघटीत केले व १९१८ साली संप पुकारला. हा संप रेंगाळला. गिरणी कामगार देखील ढिले पडू लागले. गांधीजींनी हे पाहून अमरण उपोषण जाहीर केले. हे पाहून गिरणी कामगारात नवचैतन्य पसरले व त्यांनी पुन्हा संपात सहभाग घेतला. उपोषणाच्या चौथ्या दिवशी तेथील गिरणीकामगारांना ३५ टक्के पगारवाढ देण्याचे कबूल केले. अशा प्रकारे अहमदाबाद येथील कामगारांचा प्रश्न सोडवण्यात आला.

खेडा सत्याग्रह (१९१८)

गुजरातमधील खेडा गावी शेतकऱ्यांना शोषणाविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रह पुकारला. अशा प्रकारे तेथील जुलमी लोकांना देखील शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या.

रौलेट कायद्याविरुद्ध सत्याग्रह (१९१९)

इंग्रज सरकारने १९१९ साली अन्यायकारक रौलेट कायदा लादला. हिन्दी जनतेची गळचेपी करणारा हा अन्यायकारक कायदा कायदेपुस्तिकेत राहू देणार नाही अशी शपथ गांधीजींनी घेऊन याविरुद्ध सत्याग्रहास सुरुवात केली. गांधीजींनी ६ एप्रिल १९१९ रोजी संपूर्ण देशात हरताळ पाळण्याचे जनतेला आव्हान केले. या कायद्याविरुद्ध अनेक ठिकाणी मोर्चे निघाले. तसेच या मोर्चावर इंग्रज पोलीसांनी लाठी हल्ले देखील केले. परंतु त्याचा काहीही परिणाम झाला नाही. रौलेट कायद्याच्या विरोधात सत्याग्रहासाठी ६ एप्रिल व ३० मार्च हे दोन दिवस ठरवण्यात आले होते. ह्या चळवळीला हिंसक वळण लागल्याने गांधीजींनी ही चळवळ तहकूब केली.

खिलाफत चळवळ व गांधीची (१९१९)

तुर्कस्तान येथील खलिफा हा सर्व मुस्लिमांचा धर्मगुरु म्हणून ओळखला जातो. १९१४ ला पहिले महायुद्ध सुरु झाले. या युद्धात तुर्कस्तान इंग्रजांच्या विरोधात जर्मनीच्या बाजूने उतरला. इंग्रजाच्या सैन्यात बरेच सैनिक मुस्लिम होते. ते आपल्या खलिफाच्या विरोधात लढण्यास तयार नव्हते. परंतु इंग्रजांनी त्यांच्या खलिफाला काही त्रास होणार नाही असे मुस्लिम सैनिकांना आश्वासन दिले होते. परंतु इंग्रजांनी ते आश्वासन पाळले नाही. परिणामी तुर्कस्थानचे साम्राज्य नष्ट करू नये म्हणून मौलाना महम्मद अली व मौलाना शौकत अली यांनी इंग्रजांच्या विरोधात खिलाफत चळवळ सुरु केली. स्वतः टिळकांनी सुद्धा या चळवळीला पाठिंबा दिला. तुर्कस्तानच्या राजास त्रास दिल्याबद्दल भारतीय मुसलमानात इंग्रजांच्या विरोधात मत तयार झाले. याचा

फायदा आपण घ्यावा असे महात्मा गांधी व लाला लजपतराय यांना वाटू लागले. त्यामुळेच २४ नोव्हेंबर १९१९ रोजी महात्मा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय खिलाफत कॉन्फरन्स ही सभा स्थापन करण्यात आली आणि यातच सर्व हिंदू व मुस्लिम यांना खिलाफत चळवळीच्या सोबत उभे रहावे असे आव्हान केले. पुढे तुर्कस्तान मधील परिस्थिती भारतीय मुस्लिमांच्या मनासारखी झाल्यामुळे पुढे ही चळवळ थंडावली.

भारतीय राजकारणावर परिणाम करणाऱ्या चळवळी :

असहकार चळवळ

खिलाफत चळवळीनंतर महात्मा गांधीजींनी संपूर्ण देशव्यापी चळवळ उभी करण्याचा निर्णय घेतला. पुढे सप्टेंबर १९२० च्या काँग्रेस अधिवेशनात महात्मा गांधीजींनी असहकार चळवळीचा ठराव मंजूर करवून घेतला. सी. आर. दास, बेझंट इ. नेत्यांनी या चळवळीला विरोध केला होता. परंतु हा ठराव शेवटी मंजूर झाला आणि लवकरच असहकार चळवळ हे राष्ट्रीय सभेचे अधिकृत धोरणच बनले. या ठरावात पुढील बाबींचा समावेश होतो-

* हिन्दी लोकांनी इंग्रजी प्रशासनातील सर्व नोकऱ्यांचा त्याग करावा.
* ब्रिटीश शासनाच्या प्रत्येक सभा, समारंभावर बहिष्कार टाकावा.
* ब्रिटीश शाळा, कॉलेज वर बहिष्कार टाकावा व स्वदेशी शाळेची निर्मिती करुन राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार करावा.
* सरकारी न्यायालयावर बहिष्कार टाकून आपापसातील तंटे ग्रामसभेच्या माध्यमातून सोडवावे.
* इंग्रजांच्या कायदे मंडळावर बहिष्कार टाकावा.
* दैनंदिन उपभोगामध्ये केवळ स्वदेशी वस्तुंचा वापर करावा.
* प्रत्येकाने ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकावा.
* प्रत्येक माणसाचे अंतिम ध्येय स्वराज्य प्राप्त करणे हेच असावे.

राष्ट्रसभेने मंजूर केलेला ठराव जर प्रत्येक हिंदी व्यक्तीने अंमलात आणला तर एका वर्षाच्या आत हिंदुस्थानाला स्वराज्य मिळवून देईल असा प्रचार महात्मा गांधी करु लागले. जवळपास सर्व हिन्दी लोकांनी स्वदेशी मालाचा वापर करण्यास सुरुवात केली व परदेशी मालावर बहिष्कार टाकण्यास सुरुवात केली. देशातील लघु व कुटीर उद्योगामध्ये पुन्हा उत्पादन सुरु झाले.

चळवळीचा शेवट – असहकार चळवळीने पूर्ण हिदूस्थानातील इंग्रजांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. चळवळीचे कार्यक्रम सर्वत्र जोमाने सुरू असतानाच अशी घटना घडली; जी नको व्हायला पाहिजे होती. उत्तर प्रदेशातील चौराचौरी या ठिकाणी ५ फेब्रुवारी १९२२ रोजी एका मिरवणुकीवर गोळीबार केला. गोळीबार केल्यामुळे उठाववाले संतापले व त्यांनी पुलीस कचेरीवर हल्ला करुन पोलीस स्टेशन जाळले. यात जवळ-जवळ २१ पोलिसवाले मारले गेले. हे महात्मा गांधीजींच्या कानी पडल्यावर त्यांनी ही चळवळ मागे घेतली. या सोबतच या चळवळीचा शेवट झाला. याचा फायदा घेऊन महात्मा गांधीजींना १० मार्च १९२२ रोजी अटक करुन ६ वर्षाची सजा सुनावण्यात आली.

कायदेभंग चळवळ

कायदा मोडून इंग्रजांचा विरोध करावा यासाठी कायदेभंग चळवळ सुरु करण्यात आली. १४ फेब्रुवारी १९३० रोजी राष्ट्रीय सभेने संपूर्ण जनतेला सविनय [illegible]

■ ■ ■

महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता

शितल भिकन गायके
बी.ए. प्रथम वर्ष
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं)

महात्मा गांधी यांनी केवळ भारत देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक विकासासाठी विलक्षण असे कार्य केले नसून संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी अहिंसेचे योगदान दिले. त्यांचा जन्म २ ऑक्टोंबर १८६९ रोजी गुजरात राज्यातील पोरबंदर या खेड्यात झाला. मॅचेस्टर गार्डियनने त्यांचे वर्णन राजकारण्यांमधील संत व संतांमधील राजकारणी असे केले. अंगाभोवती एक पंचा गुंडाळणाऱ्या गांधीनी संपूर्ण ब्रिटीश राजवट, भारतीय जनता आणि जगातील राजकीय संमोहन तज्ज्ञ होते. गांधीजी राजकरणात पडले असले तरी ते धार्मिक प्रवृत्तीचे होते. दक्षिण अफ्रिकेतील कृष्णवर्णियांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सत्याग्रहाला सुरुवात केली. त्यात जे अनुभव आले ते टिपून ठेवले. तो सत्यागृहाचा पहिला राजकीय प्रयोग होता. मोठ्या क्षेत्रात मोठ्या ध्येयप्राप्ती करिता तो करुन पाहण्यासाठी गांधीजी भारतात आले. जैन आणि बौद्ध धर्मातील तत्त्वज्ञानाचा त्यांच्या विचारांवर प्रभाव दिसतो. विशेषतः अहिंसेची कल्पना त्यांनी प्रामुख्याने या धर्मातील तत्त्वज्ञानातून उचललेली असावी. ख्रिश्चनांच्या बायबल मधील काही गोष्टींचा बराच प्रभाव त्यांच्या विचारांवर झालेला आहे. या येशूच्या शेवटच्या प्रार्थनेशी अनुरूप अशी त्यांच्या शत्रूकडे पाहण्याची दृष्टी आहे. गांधीजींनी त्यांचा विचारांचे प्रतिपादन 'हिंद स्वराज्य', (माझी आत्मकथा) सत्याचे प्रयोग, नैतिक धर्म, सत्याग्रह, सर्वोदय या स्वलिखित ग्रंथामधून केले आहे. याशिवाय दक्षिण अफ्रिकेतील 'इंडियन ओपिनियन' भारतात प्रकाशित होणारे यंग इंडिया, हरिजन, नवजीवन, हरिजन सेवक इत्यादी. वृत्तपत्रांमधून त्यांच्या तात्विक विचारांचे प्रतिपादन केले. यातूनच त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा परिचय होतो.

महात्मा गांधीजींच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा महत्त्वाचा विचार म्हणजे सर्वोदय होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीत ईश्वर आहे. मानवाची सेवा हीच खरी ईश्वर सेवा होय. शिवभावे जीव सेवा हा महात्मा गांधीच्या बहुमताने कल्याण असा शब्दप्रयोग केला नाही. सर्वांचे कल्याण असा शब्दप्रयोग केला. समाजातील एक जरी व्यक्ती विकासापासून, कल्याणापासून वंचित राहिली तरी सर्वोदय होणार अशा प्रकारे सर्व व्यापक समाजसेवेची व समाजकल्याणाची सर्वोदयी कल्पना गांधीजींनी मांडली. केवळ साध्य महत्त्वाचे, त्यासाठी वापरावयाची साधने कशीही असली तरी चालेल या कार्ल मार्क्सच्या विचारांशी महात्मा गांधीनी या संदर्भात फारकत घेतलेली आहे. यासाठी साबरमती आश्रमात पाळण्यात येणाऱ्या पाच प्रतिज्ञा १९१६ साली सांगितल्या या पाच प्रतिज्ञा म्हणजे – अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, ब्रम्हचर्य.

सत्य हा गांधीजींच्या जीवनातील व तत्त्वज्ञानातील ध्रुवतारा होय. अंतिम सत्यात संपूर्ण ज्ञान आणि अथक आनंद याचा अंतर्भाव होता. भाषण, कृती व विचार या तिन्हीत सत्य आणावयास पाहिजे. स्वातंत्र्य न्याय योग्य सामाजिक संबंध हे सत्य हे साध्य आहे. अहिंसा हा मानवी आत्म्याच्या गुणविशेष आहे. अहिंसा हे शुरांचे लक्षण आहे. पण आवश्यक परिस्थितीत हिंसा करावी लागल्यास त्याला गांधीजींचा विरोध नव्हता. स्त्रीच्या अब्रुचे संरक्षण

करण्यासाठी दुष्टांसमोर अहिंसा अयशस्वी ठरल्यास सरळ हिंसा करावी लागल्यास हरकत नाही, असे त्यांचे मत होते, किंवा अहिंसा यांचा त्याग करण्याचा प्रसंग आला तर अहिंसेचा त्याग करावा. परंतु सत्याची कास सोडू नये असे त्यांनी स्पष्ट सांगितलेले आहे.

स्वेच्छा स्वीकृत दारिद्र्याची कल्पना अपरिग्रहात मांडली आहे. जो पर्यंत शरीर आहे, तो पर्यंत ते इतरांच्या सेवेत झिजविणे म्हणजे अपरिग्रह होय. समाजाच्या सहकार्याशिवाय कोणीही संपत्ती जमवू शकत नाही. म्हणून संपत्तीचा स्वार्थासाठी व दुसऱ्यांच्या शोषणासाठी उपयोग करण्याचा नैतिक अधिकार कोणालाही नाही. स्वतःच्या जीवनात गांधीजींनी आपल्या गरजा कमीत-कमी केल्या.

अहिंसेसाठी फार आवश्यक अशी प्रतिज्ञा म्हणजे ब्रह्मचर्य होय. व्यक्तीचा आपल्या सर्व वासनांवर विचार शब्द आणि कृती या तिन्हींच्या बाबतीत संपूर्ण ताबा असणे म्हणजे ब्रम्हचर्य. उदात्तीकरण होत जाऊन अखेर ती संपुष्टात येते. प्रयत्नाने हा मनोनिग्रह प्राप्त होतो. अशा प्रकारे महात्मा गांधीजींनी पाच प्रतिज्ञा सांगून सत्याग्रहाचा आग्रह धराला. सत्याग्रह हा क्रांतीचा अभिनव मार्ग आहे. असहकार, सविनय कायदेभंग, आत्मक्लेश, हिजरत उपोषण, हरताळ, सामाजिक बहिष्कार, निरोधन ही सत्याग्रहाची प्रभावी शस्त्रे असल्याचे गांधीजींनी स्पष्ट केले.

गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतांना त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. गांधीजींचे अर्थकारण मानवता वादावर उभारलेले आहे. विश्वस्त कल्पना हे त्याच्या आर्थिक विचारसरणीतील महत्त्वाची कल्पना हे त्यांच्या आर्थिक विचारसारणीतील महत्त्वाची कल्पना होय. कोणत्याही व्यक्तिजवळ स्वतःच्या गरजेपेक्षा अधिक मालमत्ता असेल तर समाजातील गरीब दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी संपत्तीचा उपयोग करण्याकरिता त्याने त्या मालमत्तेचे विश्वस्त समजून कार्य करावे.

महात्मा गांधीजींच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतांना त्यांचे राज्यासंबंधीचे विचार अभ्यासणे अगत्याचे ठरते. व्यक्तीचा नैतिक विकास हा त्याच्या आत्मिक इच्छा व आकांक्षा यांवर अवलंबून असतो. परंतु, राज्य दंडशक्ती व भयाच्या आधारावर व्यक्तीला कायद्याचे पालन करण्यास बाध्य करते. त्यामुळे राज्य हे अनैतिक ठरते. गांधीजींनी राज्यविरोध करण्याचे आणखी एक कारण म्हणजे हिंसा व पाशवी बळावर आधारित आहे. राज्य कितीही लोकतंत्रात्मक असले तरी पद्धती ही सुद्धा गांधीजींसाठी चिंतेचा विषय होती.

गांधीजींची 'नई तालीम' किंवा 'वर्धा शिक्षण योजना' ही भारतात फार नावाजलेल्या गोष्टी होत्या. ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यात यावे व प्राथमिक शिक्षण स्वयंपूर्ण व पायाभूत स्वरुपाचे असावे. नवीन अहिंसात्मक समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने पायाभूत शिक्षण हे महत्त्वाचे असून ते नवीन पिढीत अहिंसाधिष्ठीत मूल्यांची निर्मिती करण्यास उपयुक्त आहे, असे त्यांचे मत होते. त्याला पायाभूत म्हणण्याचे कारण ते जीवनोपयोगी होते. स्वावलंबन हे या शिक्षणाचे वैशिष्ट्य होते. ते मातृभाषेतून देण्यात येईल. जीवनोपयोगी हस्तोद्योग शास्त्रयुद्ध नैतिक कल्पनांना प्राधान्य राहील. शारीरिकश्रम नैतिक कल्पनांना प्राधान्य राहील. अध्ययन विषयांशी करुन अन्नासाठी शारीरिक श्रमाचे महत्त्व मुलांच्या मनावर ठसविण्यात येईल. या शिक्षणातून जे उत्पादन होईल. त्यातून शिक्षणाचा खर्च भरून निघू शकेल. गांधीजींनी शिक्षणातील ३एच म्हणजे हँड, हार्ट, हेड त्यांच्या विकासावर भर दिला. गांधीजींचे शैक्षणिक तत्त्वज्ञान म्हणजे उद्योगशील आत्मोन्नती, बुद्धीमत्ता यांचा समन्वय होता.

आज एकविसाव्या शतकात गांधीजींच्या तत्त्वज्ञानाच्या व्यावहारिक दृष्टिकोनातून किती महत्त्व आहे.

आपल्या वैयक्तिक तसेच सामाजिक जीवनात त्याचा संदर्भ उपयुक्त ठरावा हा चर्चेचा विषय असतो. वास्तविकतः आज केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगाला गांधी तत्त्वज्ञानाचा संदर्भ अधिकाधिक उपयुक्त होत चाललेला आहे. नवीन पिढी इतर अनेक गोष्टींच्या जवळ जात असली तरी महात्मा गांधींच्या व त्यांच्या तत्त्वांपासून दूर गेलेली आढळते.

अपरिग्रहाची कल्पना आजच्या युगात फारच महत्त्वाची झालेली आहे. स्वतःच्या जीवनात गांधीजींनी विरक्त जीवनाचा स्वीकार केला व आपल्या गरजा कमीत कमी केल्या. अपरिग्रहाचा विचार तरूण पिढीसाठी सर्वात मौलिक आहे. विश्वस्त कल्पना ही गांधीजींनी आणखी एक देणगी आहे. प्रस्थापित समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था न मोडता तिलाच समाजहिताच्या दृष्टिने राबून घेण्याची व न्याय सामाजिक आणि आर्थिक संबंध प्रस्थापित करण्याची योजना त्यात आहे.

■ ■ ■

मी असा अनुभव करतो की गीता आम्हाला याची शिकवण देते की ज्या गोष्टींचे पालन आम्ही दैनंदिन जीवनात करत नाही, त्याला धर्म म्हटले जाऊ शकत नाही. **- म. गांधी**

महात्मा गांधीजींनी अनुभवलेले विविध प्रसंग

अश्विनी रमेश पवार
बी.ए. तृतीय वर्ष
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं)

असहकार आणि अहिंसेच्या तत्त्वावर अधारित, सत्याग्रहाच्या तत्त्वावर आधारित, सत्याग्रहाचा उपयोग गांधीजींनी प्रथम दक्षिण आफ्रिकेमध्ये, तेथील भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. इ.स. १९१५ मध्ये भारतात परत आल्यावर त्यांनी चंपारण्या मधील शेतकऱ्यांना जुलूमी कर व जमीनदार यांच्या विरुद्ध लढण्यासाठी एकत्र केले. इ.स. १९२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे सांभाळल्यानंतर गरीबी निर्मूलन आर्थिक स्वावलंबन स्त्रियांचे समान हक्क, सर्व-धर्म-समभाव, अस्पृश्यता निवारण आहे.

बालपणः-

हायस्कूलातील पहिल्याच वर्षी परीक्षेच्या प्रसंगी घडलेली एक गोष्ट सांगण्यासाठी आहे. शाळा खात्याचे इन्स्पेक्टर शाळा तपासण्यास आले आहे. त्यांनी पहिल्या इयत्तेच्या मुलांना पाच शब्द लिहायला घातले. त्यांत एक शब्द केटल (kettle) होता. याची वर्णरचना मी चुकीची लिहिली. मास्तरांनी महात्मा गांधीजींना आपल्या बुटाचे टोक मारुन इजार दिला. परंतु त्याच्या ते कोठून लक्षात येणार? मास्तर त्यांना समोरच्या विद्यार्थ्याकडून पाटीकडे पाहून त्याचे शुद्ध लेखन सुधारण्यास सांगत असतील अशी त्यांची कल्पना होऊ शकली नाही. त्याची समजूत की आम्ही एकमेकांचे चोरुन पाहून नये समजून की आम्ही एकमेकांचे चोरुन पाहू नये एवढ्यासाठीच सर नजर ठेवीत आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे पाचही शब्द बरोबर आले आणि गांधीजी काय ते ढ ठरले. त्याचा मुर्खपणा मास्तरांनी मागाहून त्यांना दाखवून दिला. परंतु त्याच्या मनावर त्या सांगण्याचा काही परिणाम झाला नाही. त्यांना दुसऱ्या विद्यार्थ्याची कॉपी कधीच करता आली नाही असे असूनही मास्तराविषयीची माझी विनयवृत्ती कधीच ढळली नाही. वडील मंडळीचे दोष न पाहण्याचा गुण त्याच्यामध्ये स्वभावतःच होता. त्याच मास्तरांचे इतर दोष मागाहून त्यांच्या ध्यानात आले. तरीही त्यांच्याबद्दल मला वाटणारा आदर कायम राहिला. वडिलाच्या आज्ञेचे पालन करायचे एवढे मला माहित होते, ते सांगतील ते करावे.

लग्न होऊन चुकले होते. मधले बंधू माझ्यापेक्षा दोन-तीन वर्षांनी मोठे. त्यांचा व माझा असे तीन विवाह एकत्र करण्याचा वडील मंडळींनी बेत केला. यात आमच्या कल्याणाचा प्रश्न नव्हता. इच्छेबद्दल तर त्याहूनही नव्हता. यात फक्त वडिलांच्या सोयीचा आणि खर्चाचा प्रश्न होता. हिंदू समाजामध्ये विवाह अशी तशी गोष्ट नाही. वधु-वराचे आईबाप लग्नापायी सर्वस्व घालवून बसतात. पैसा उधळतात आणि काळाचा अपव्यय करतात. आगाऊ कित्येक महिन्यांपासून तयारी सुरू होते. कपडे तयार होतात, दागिणे घडवायचे असतात, गाव भोजनाचे अंदाज चालतात, भोजनासाठी निरनिराळी पकवान्ने करण्याच्या शर्यती सुरू होतात. गळा असो किंवा नसो बायका बसे बसेतो गाणी गातात, आजारी पण पडतात! शेजारच्या शांततेचा भंग करतात, प्रसंग येईल तेव्हा त्यंना स्वतःलाही असेच सर्व करायचे असते म्हणून बिचारे शेजारीही गोंगाट, खरकटे

आणि इतर घाण मुकाट्याने सहन करतात. एवढा गोंधळ तीन वेळा करण्यापेक्षा एकाच वेळी उरकून घेतला तर किती चांगले? लग्न थोडक्या खर्चात आणि थाटाने होईल. कारण की तीन लग्ने एकत्र करायची तर द्रव्य मुबलकपणे खर्च करण्यात हरकत नाही. वडील व चुलते वृद्ध होते. आम्ही त्यांचे सर्वात धाकटे मुलगे. तेव्हा आमच्या लग्नाचा सोहळा डोळ्यादेखत व्हावा अशीही इच्छा असायचीच. या व अशा तऱ्हेच्या विचारांनी हे तिन्ही विवाह एकत्र करण्याचा निश्चय झाला आणि मी वर सांगितल्याप्रमाणे त्यांची तयार आणि सामग्रही कित्येक महिन्यांपासून चालू होते. त्या भावंडांची तयारी चाललेली पाहुनच समजले की, लग्ने व्हायची आहेत. त्यावेळी माझ्या मनात चांगले चांगले कपडे वापरायला मिळतात. वाजंत्री वाजतील, वरात निघेल, सुग्राम भोजन मिळेल, एका नव्या मुलीबरोबर खेळ करायला मिळतील, वगैरे हौसे पलीकडे दुसरे काही असल्याचे स्मरत नाही. विषयवासना मागाहून उद्भवली आहे.

बालविवाहः-

हे प्रकरण मला लिहावे लागू नये अशी माझी इच्छा आहे. परंतु या कथेमध्ये तऱ्हेचे कितीतरी कडू गोड द्यावे लागणार आहेत. स्वतःला सत्याचा पुजारी म्हणून घेणाऱ्या मला दुसरा मार्गच नाही. तेरा वर्षाचा असतांना माझा विवाह झाला. ही गोष्ट लिहितांना मला दुःख होते. आज माझ्यासमोर बारा-तेरा वर्षीची मुले आहेत. त्यांच्याकडे पाहतो आणि माझ्या विवाहाचे स्मरण करतो तेव्हा मला स्वतःबद्दल कीव वाटू लागते; आणि माझ्यावर ओढवलेल्या प्रसंगातून बचावल्याबद्दल या मुलांना धन्यवाद देण्याची इच्छा होते. तेरा वर्षीच्या वयात झालेल्या माझ्या विवाहाचा असा एकही नैतिक युक्तीवाद मला सुचू शकत नाही.

मी 'सगाई' विषयी लिहितो अशी वाचकाने समजूत करून घेऊ नये. काठेवाड्यात विवाह म्हणजे लग्न. सगाई नव्हे. सगाई म्हणजे मुला-मुलींचे काठेवाड्यात विवाह काठेवाड्यात विवाह म्हणजे लग्न लावण्यासंबंधी वर-वधूच्या आई-बापामध्ये झालेला करार सगाई मोडू शकते.

गांधीजी काठेवाडचे गुजराथेत विवाह म्हणजे वाङनिश्चय किंवा वर उल्लेखिलेली सगाई मध्ये वर व कन्या यांचा काही संबंध येत नाही. दोघांना त्याची गंधवार्ताही नसते. माझी एकामागून एक तीनदा सगाई झाली ती केव्हा व कशी झाली, याची मला गंधवार्ताही नाही. दोन कन्या एकामागून एक मृत्यू पावल्या असे मला कोणीच सांगीतले. त्यावरुनच मला माहित की माझ्या तीन सगाया झाल्या होत्या. तिसरी सगाईझाली त्यावेळी मला कोणीच सांगितले. त्यावरुनच मला माहीत की माझ्या तीन सगाया झाल्या होत्या. तिसरी सगाई झाली त्यावेळी मला काही सांगितले असल्याचे माहित नाही. विवाहामध्ये वर व कन्या दोघांची गरज असते. विवाहाचे विधी करायचा असतो मी लिहीत आहे ते या विवाहासंबंधी विवाहाचे मला पूर्ण स्मरण आहे. आम्ही तीन भाऊ होतो. हे वाचकांना माहीतच आहे. त्यापैकी वडील भावाचा विवाह झाला तेव्हा मी हायस्कूलात शिकत होतो. हे त्यांनी पूर्वी लिहिलेच आहे. त्यावेळी आम्ही तिन्ही भाऊ एकाच शाळेत शिकत असू. वडील बंधू वरील इयत्तेस होते आणि ज्या बंधूच्या लग्नाबरोबर त्याचे लग्न झाले ते एक वर्ष पुढे होते. विवाहाचा परिणाम असा झाला की, त्यांना दोघा भावाचे एक-एक वर्ष फुकट गेले. त्यांच्या बंधूंच्या बाबतीत तर याहूनही वाईट परिणाम घडला. विवाहनंतर ते शाळेत राहू शकले नाहीत. असला अनिष्ट परिणाम किती तरुणांवर घडत असेल देव जाणे! विद्याभ्यास आणि विवाह ही दोन्ही एकत्र हिंदू समाजामध्येच आढळतील.

महात्मा गांधी यांचा अभ्यास चालू राहिला. हायस्कूलात याची गणना 'ढ' विद्यार्थ्यात होत नसे. शिक्षकांची मर्जी तर मी नेहमीच संपादित असे. प्रत्येक वर्षी आई-बापांना विद्यार्थ्याचा अभ्यास व वर्तन यासंबंधी प्रमाणपत्रे

पाठविली जाते. त्यामध्ये कधीही याचा अभ्यास किंवा वर्तन खराब असल्याबद्दल टिका नव्हती. दुसऱ्या इयत्तेनंतर बक्षीसेही मिळविली. ती मिळविण्यात माझ्या हुशारीपेक्षा दैवाचा भाग विशेष होता. ही शिष्यवृत्ती सर्व विद्यार्थ्यांसाठी नव्हतीय; तर जे सोरठ-प्रांतातले विद्यार्थी असतील, त्यांत पहिला येणाऱ्याला होती. चाळीस-पन्नास विद्यार्थ्यांच्या वर्गात त्या दिवसांत सोरठ-प्रातांचे विद्यार्थी कितीसे असणार? महात्मा गांधी स्वतःला असे स्मरते की त्यांना त्यांच्या हुशारीबद्दल अभिमान मुळीच नव्हता. बक्षिस किंवा शिष्यवृत्ती मिळवली तर त्यांना आश्चर्य वाटत असे.

बक्षिस किंवा शिष्यवृती मिळाली तर त्यांना आश्चर्य वाटत असे. परंतु त्याच्या वर्तनाला त्यांना फार जपत असे. उणीव निघाली तर त्याला रडे येई. शिक्षकांना त्यांना बोलावे लागेल अशा तऱ्हेचे त्याच्या हातून काहीही घडणे किंवा शिक्षकांना असे वाटणे ही गोष्ट त्यांना स्मरते. माराचे दुःख नव्हते. परंतु त्यांना शिक्षेला पात्र झाले यांचे महादुःख नव्हते. त्यांना खूप रडले हा प्रसंग पहिल्या किंवा दुसऱ्या इयत्तेतील आहे. दुसरा प्रंसग सातव्या इयत्तेतील आहे. त्यावेळी दोराबजी एदलजी गिमी हेडमास्तर होते. ते विद्यार्थीप्रिय होते.

महात्मा गांधी हे बालपणापासून खूप चंचल होते आणि आपणही त्याच्यासारखे चंचल असले पाहिजे. महात्मा गांधी हे खूप धाडसी होते आणि आपल्या सर्वासारखे खोडकर होते. महात्मा गांधी यांनी काही गोष्ट वाईट घडली तर ती लपवून न ठेवता ती सर्वांना सांगितली. जेने जेनेकरून त्या वाईट गोष्टीला सुधारता येईल. महात्मा गांधी यांच्या सारखे कुणीही आपले वाईट काम करून लपविले नाही पाहिजे. तर ते उघड केले पाहिजे. जेणेकरून आपल्याला काही वाईट गोष्ट सुधारता येईल.

■ ■ ■

महात्मा गांधी आणि शिक्षण

राणी पवार
बी.ए. द्वितीय वर्ष
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं)

ब्रिटीशांनी भारतावर सुमारे २०० वर्षे राज्य केले. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनानींनी आपल्या घराचा त्याग केला. त्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. अशाच महान स्वातंत्र्य सैनानींपैकी एक म्हणजे आपले राष्ट्रपिता महात्मा गांधी हे भारताच्या लढाईतील एक प्रमुख नेते होते.

महात्मा गांधींच्या कार्याची माहिती जरी लहान असली तरी त्यांचे कार्य व त्यांची किर्ती ही खूप मोठी होती. महात्मा गांधी हे महान स्वातंत्र्य सैनिकांपैकी एक होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य भारताच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी खर्च केले. २ ऑक्टोबर १९६९ रोजी गांधीजी जेलमध्ये असताना त्यांच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांनी चळवळीचे अध्यक्षपद ही सांभाळले होते.

मोहनदास करमचंद गांधी हे महात्मा गांधीजींचे संपूर्ण नाव. त्यांचे आजोबा उत्तमचंद गांधी उर्फ ओता गांधी हे एक दृढ निश्चयी मनुष्य होते असे मानले जाते. गांधींचे एकामागून एक दोन विवाह झाले. पहिल्याचे त्यांना चार मुले होते. आणि दुसऱ्याचे दोन. त्यापैकी पाचवे करमचंद उर्फ कबा गांधी हे गांधीजींचे वडील होते. कबा गांधींचीही एकामागून एक चार कुटुंबे झाली. शेवटच्या पुतळीबाईपासून एक मुलगी व तीन मुलगे. आई साध्वी स्त्री होती. ती फार भाविक होती. पूजापाठ केल्याशिवाय कधी जेवत नसे. ती कठीणात कठीन व्रत करत असे. या आईबापांच्या घरी मी संवत् १९२५ च्या भाद्रपद वद्य द्वादशीच्या दिवशी म्हणजे सन १८६९ च्या ऑक्टोबरच्या २ तारखेला पोरबंदर अथ्झवा सुदामापूरी येथे जन्माला आलो. पोरबंदर मध्येच त्यांचे बालपण गेले. ते सात वर्षाचे झाले तेव्हा त्यांना राजकोटच्या गावठी शाळेत घातले.

एकदा वडिलांनी गांधीजीसाठी एक पुस्तक विकत आणलं. ते त्यांनी आवडीने वाचले. थे 'श्रवण-पितृभक्ती' नाटक. ते वाचण्याची खुप इच्छा झाली. मग मलापण श्रवणासारखे व्हायचे असे.

बालविवाह :-

तेरा वर्षांचा असतांना माझा विवाह झाला, ही गोष्ट लिहितांना मला दु:ख होते. आम्ही तीन भाऊ होतो. त्यापैकी वडील माझ्यापेक्षा दोन-तीन वर्षांनी मोठे होते. त्यांचा, माझा चुलत भाऊ कदाचित माझ्याहून वर्षभराने मोठा असेल, त्याचा व माझा असे तीन विवाह एकत्र करण्याचा वडील मंडळींनी बेत केला. यात आमच्या कल्याणाचा प्रश्न नव्हता. इच्छेबद्दलचा तर त्याहूनही नव्हता. यात फक्त वडिलांच्या सोयीचा आणि खर्चाचा प्रश्न होता.

लग्नाचा एवढा गोंधळ तीन वेळा करण्यापेक्षा एकाच वेळी उरकून घेतला तर किती चांगले? लग्न थोड्या खर्चात आणि थाटाने होईल. कारण की तीन लग्ने एकत्र करायची तर द्रव्य मुबलकपणे खर्च करण्यास हरकत नाही. वडील व चुलते वृद्ध होते. तेव्हा आमच्या लग्नाचा सोहळा डोळ्यांदेखत व्हावा, अशीही इच्छा असायचीच. या व अशा तऱ्हेच्या विचारांनी हे तिन्ही विवाह एकत्र करण्याचा निश्चय झाला आणि त्याची तयारी कित्येक महिन्यांपासून चालू होती. एकदाचा झालाच विवाह. परंतु मी नंतर जरा संशयी बनलो. ''मी जर एक पत्नीव्रत

पाळायचे, तर पत्नीने एक पतिव्रत पाळले पाहिजे. या विचाराने मी संशयी बनलो. मला काही पत्नीच्या पतिव्रतेबद्दल किंवा तिच्या पवित्रतेबद्दल शंका घेण्याचे कारण नव्हते; परंतु असुया ही कारण थोडीच शोधीत बसणार? माझी पत्नी कोठे जाते हे मला नेहमी माहित झालेच पाहिजे. म्हणून तिने माझ्या परवानगी वाचून कोठेही जाता कामा नये. या गोष्टीमुळे आमच्यामध्ये दु:खदायक बेबनाव होऊ लागले. परवानगी शिवाय कोठेही जायचे नाही, ही एक प्रकारची कैदच झाली, परंतु कस्तुरबाई ही अशा प्रकारची कैद सहन करणारी स्त्री नव्हती.

अशा तऱ्हेने आम्हा बालकांमध्ये अबोला वरचेवर उद्भवू लागला. कस्तुरबाईने जी मोकळीक घेतली, ती मी निर्दोष समजतो. जिच्या मनाला पापाचा स्पर्शही नाही, अशी बालीका देवदर्शनाला जायचे किंवा कोणाला भेटायला जायेच, असल्या गोष्टींवर नियंत्रण का म्हणून सहन करील? मी जर तिच्यावर दडपण घालणार तर तिने माझ्यावर का घालू नये? पण हे आता सुचते. त्याकाळी तर मला माझे स्वामित्त्व शाबीत करायचे होते. परंतु आमच्या या गृहसंसारात माधुर्य नव्हते असे नाही. माझ्या वक्रतेच्या मुळाशी प्रेम होते. माझ्या मनातून माझ्या पत्नीला आदर्श स्त्री बनवायचे होते.

कस्तुरबा ही निरक्षर होती. स्वभावाने सरळ, स्वतंत्र, मेहनती होती. आणि माझ्याशी तरी मितभाषण करणारी होती. मी शालेय वयात असतांना गाइले जाणारे काव्य शाळेत असे.

इंग्लिश राज्य करितो, देशी दबून जाती,
देशी दबून जाती, उभयांची देख शक्ती,
तो पाच हात पूर्ण, पुरणार पाचशेणा

या सर्वांचा माझ्या मनावर व्हावयाचा तो परिणाम झाला. माझे अंथरुग्णातच पडून असत, हे पूर्वी सांगितलेच आहे. त्यांच्या शुश्रुषेला मातुश्री, घरच एक जुना नौकर व मी असे तिघेजण बहुतेक वेळ राहत असू. वडिलांची परवानगी असेल आणि त्यांच्या प्रकृतीकडून अडचण नसेल, तेव्हा संध्याकाळी फिरायला जात असे. मृत्यूची घोर रात्र येऊन ठेपली. रात्रीचे साडेदहा किंवा अकरा वाजले असावेत. तेवढ्यात नोकराने दार ठोठावले. माझ्या पोटात धस्स झाले. ''उठ, बापू फार आजारी आहेत.'' नोकर म्हणाला. फार आजारी आहे हे मला माहितच होते. त्यामुळे त्या वेळच्या 'फार आजारीं'चा विशेष अर्थ माझ्या लक्षात आला. बिछान्यातून ताडकन उडी मारुन मी उठलो.

''काय झाले, सांग तर खरे!''

''बापू आटोपले!''

मला अतिशय दु:ख झाले. वडिलांच्या खोलीकडे धावून गेलो.

गांधींच्या सत्याग्रहाचा जन्म झाला. २२ ऑगस्ट १९०६ रोजी ट्रान्सवाल सरकारच्या गॅझेटमध्ये कायदेमंडळात सरकारच्या गॅझेटमध्ये कायदे समाविष्ट होणाऱ्या बिलाचा मसुदा वाचला. जसजशी बिलाशी कलमे वाचली असं वाटत होत की, या बिलानुसार, ट्रान्सवालात राहण्याचा हक्क बाळगणाऱ्या प्रत्येक हिंदी स्त्री-पुरुषाने आणि आठ वर्षे किंवा त्यावरील वयाच्या मुला-मुलीने एशियाटिक कचेरीत आपली नावे नोंदवून परवाने मिळवावे.

११ सप्टेंबर १९०६ रोजी सभा भरली. सभेत जे ठराव मांडले गेले. त्यात एक चौथाच ठराव महत्त्वाचा होता. त्याचा सारांश असा होता की, या बिलाविरुद्ध सर्व उपाय आजमावून सुद्धा जर ते पास झाले तर हिंदी लोकांनी त्याला शरण जायचे नाही. या चळवळीला काय नाव देता येईल. हे कोणाला सूचत नव्हते. णगनलाल गांधींनी सदाग्रह हे नाव सुचविले. कारण हा आग्रह 'सद म्हणजे शुभ' आहे. त्या नावात ज्याचा अंतर्भाव व्हावा असे वाटत हाते ते येत नव्हते. म्हणून मी 'द' चा 'त' करुन त्याचा 'य' जोडला व 'सत्याग्रह' नाव बनविले.

■ ■ ■

महात्मा गांधी

जाधव सीमा जयाजी
बी.ए. द्वितीय वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

महात्मा गांधीजींचे पुर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे आहे. गांधी कुटुंब प्रथम तरी किराणा मालाचा व्यापार करणारे असावे. परंतु माझ्या आजोबांपासून गेल्या तीन पिढ्या ते राज्याकारभार करीत आले आहे. उत्तमचंद गांधी उर्फ ओता गांधी दृढनिश्चयी असावेत. राज्यप्रकरणी लटपटीमुळे त्यांना पोरबंदर सोडावे लागले व त्यांनी जुनागडच्या राज्याचा आश्रय घेतला. त्यांनी नबाबसाहेबांना डाव्या हाताने सलाम केला. या उघड दिसणाऱ्या अविनयाचे कोणी कारण विचारले तेव्हा जवाब मिळाला, उजवा हात तर पोरबंदला देऊन चुकलो आहे. ओता गांधीची एकामागून एक दोन कुटुंबे झाली. पहिल्याचे त्यांना चार मुलगे होते आणि दुसऱ्याचे दोन. बालपणाची आठवण करता ते बंधु सावत्र आसावेत अशा तऱ्हेची कल्पनाही मला होत नाही. त्यांपैकी पाचवे करमचंद उर्फ कबा गांधी व शेवटचे तुलसीदास गांधी. उभयता बंधुंनी आळीपाळीने पोरबंदरमध्ये दिवाणगिरी सोडल्यानंतर ते राजस्थानी कोर्टात सभासद होते. नंतर राजकोटला व काही काळ बाकानेरला दिवाण होते. नंतर राजकोट दरबारचे पेंशनर होते. कबा गांधीचीही एकामागुन एक चार कुटुंबे झाली. पहिल्या दोहापासून दोन मुली झाल्या. शेवटच्या पुतळीबाईपासून एक मुलगी व तीन मुलगे. त्यांतला सर्वात धाकटा मी. वडील कुटुंबप्रेमी, सत्यप्रेमी, धीट, उदार पण रागीट असे होते. काही अंशी विषयासक्ती असावेत. त्यांचा शेवटचा विवाह चाळिसाव्या वर्षानंतर झाला होता. ते लाचेपासून दूर पळत. त्यामुळे शुद्ध न्याय देत अशी आमच्या कुटुंबात व बाहेरही बोलवा होती. सरकारशी ते अत्यंत राजनिष्ठ असत. एकदा प्रांताच्या एका साहेबाने राजकोटच्या ठाकूरसाहेबांचा अपमान केला. त्याबद्दल ते त्यांच्याशी भांडले. साहेब संतापले कबा गांधीना माफी मागण्यास फर्माविले. त्यांनी माफी मागण्याचे नाकारले व त्यापायी काही तास अटकेतही राहिले; परंतु ते डगमगले नाहीत. त्यामुळे अखेरीस त्यांना साहेबाने सोडून देण्याचा हुकूम केला.

वडिलांनी द्रव्यसंचय करण्याचा लोभ कधीच धरला नव्हता. त्यामुळे आम्हा भावांसाठी ते थोडी मिळकत ठेवून गेले. वडिलांचे शिक्षण केवळ अनुभवजन्य होते. ज्याला आपण आज गुजराथी पाचव्या इयत्तेचे शिक्षण म्हणू तेवढे शिक्षण त्यांचे झाले असेल. इतिहास-भूगोलाचे ज्ञान तर विचारायलाच नको, असे असुनही व्यवहारज्ञान इतक्या उच्च दर्जाचे होते की, सुक्ष्मात सुक्ष्म प्रश्नाचा उलगडा करण्यात किंवा हजार माणसांपासून काम घेण्यास त्यांना अडचण पडत नसे. परंतु देवळात जाण्याने कथा वगैरे ऐकून जे धर्मज्ञान असंख्य हिंदूंना सहजी मिळत असते. ते त्यांना होते. एक विद्वान ब्राम्हण आमच्या कुटूंबाचे मित्र होते. त्याच्या सल्ल्यावरून शेवटच्या वर्षात त्यांनी गीतापाठ सुरु केला होता आणि रोज पुजेच्या वेळी थोडेबहुत श्लोक ते मोठ्याने पठण करीत असत.

आई साध्वी स्त्री होती, अशी माझ्या मनावर छाप राहिलेली आहे. ती फार भाविक होती. पुजापाठ केल्याशिवाय कधी जेवत नसे. हवेलीत नित्यनेमाने जायची. मला समजू लागले तेव्हापासून तिने काही चातुर्मास्य व्रतवैकल्याखेरीज रिते दवडलेले मला स्मरत नाही. ती कठिणात कठीण व्रत घेई आणि निर्विघ्नपणे पार पाडी. घेतलेली व्रते आजारी पडली तरी सोडायची नाही. मला असा एक प्रसंग स्मरतो की, तिने चांद्रायण-व्रत केले. त्यामध्ये आजारी पडली.

परंतु व्रत भंगू दिले नाही. चातुर्मास्यात एकमूक्त राहणे यात तर तिला तिने एक दिवसाआड जेवण्याचा नियम केला होता. लागोपाठ दोन-तीन उपवास म्हणजे तर तिला काहीच नाहीसे वाटे. एक चातुर्मास्यात तिचे असे व्रत होते की, सूर्यनारायणाचे दर्शन करुन नंतरच जेवायचे. त्या पावसाळ्यात आम्ही मुले ढगांकडे डोळे लावून पाहत राहत बसायचे की केव्हा सुर्य दिसतो आणि आई जेवते. पावसाळ्यात पुष्कळ वेळा दर्शन दुर्मिळ होत असते. हे सर्वांना माहीतच आहे. असेही दिवस स्मरतात की ज्या दिवशी आम्ही सूर्य पहावा, "[illegible]' असे ओरडावे आणि आई घाईघाईने ती तो सुर्याने दडी मारावी! असे म्हणून ती परत वळे आणि स्वत:च्या कामात दंग होऊन जाई.

आई व्यवहारकुशल होती. दरबारच्या सर्व गोष्टी तिला समजत. राजस्त्रीयांमध्ये तिच्या बुद्धी बद्दल बहुमान असे. मी लहान म्हणून कधी-कधी आईला राजवाड्यात आपल्याबरोबर घेऊन जाई. त्यावेळी ठआजीसाहेबां'' बरोबर चालणारे कित्येक संवाद मला अजुन आठवतात. या आई-बापांच्या घरी मी संवत् १९२५ च्या भाद्रपद द्वादशीच्या दिवशी म्हणजे सन १८६९ ऑक्टोबरच्या २ तारखेला पोरंबदर अथवा सुदामपूरी येथे जन्म पावलो.

बालपण पोरबंदरातच गेले. कुठल्याशा शाळेत मला घातले होते असे आठवते. कसेबसे काही पाढे शिकलो. त्यावेळी मुलांबरोबर मी पंतोजींना मात्र शिव्या देण्यास शिकलो होतो. एवढी आठवण आहे; दुसरे काहीएक आठवत नाही. त्यावरुन मी अनुमान करतो की माझी बुद्धी मंद असावी आणि स्मरणशक्ती आम्ही पोरे एक कडवे गात असू त्यातल्या पापडासारखी असावी. ते चरण तर मला दिलेच पाहिजेत:

एकडे एक, पापडशेक
पापड कच्चो ..... मारो .....

पहिल्या रिकाम्या जागी मास्तराचे नाव असायचे. त्यांना मी अमर करु इच्छित नाही. दुसऱ्या रिकाम्या जागी दिलेली शिवी भरण्याचे प्रयोजन नाही.

बालपण:-

पोरबंदरहून वडील राजस्थानी कोर्टाचे सभासद होऊन राजकोटला गेले. तेव्हा माझे वय सात एक वर्षअसावे. मला राजकोटच्या गावठी शाळेत घातले. या शाळेतील दिवस मला चांगले आठवतात. पंतोजींची नावे वैगेरेही आठवतात. पोरबंदर प्रमाणेच येथीलही अभ्यासासंबंधी सांगण्यासारखे विशेष काही नाही. माझी गणना सामान्य दर्जाच्या विद्यार्थ्यात तरी होत असेल की नाही याबद्दल शंकाच. गावठी शाळेतून मुख्य शाळेत व तेथून हायस्कूलात. येथंपर्यंत पोहचता माझ्या वयाला बारा वर्षे होऊन गेली. तो पर्यंत मी कधीही शिक्षकांशी लबाडी, कौशल्ये किंवा कोणाशी मैत्री जोडल्याचे स्मरत नाही. मी अतिशय भिडस्त मुलगा होतो. शाळेत माझे काम बरे की मी बरा. घंटा वाजण्याच्या सुमारास पोचायचे आणि शाळा बंद होताक्षणी घरी पळायचे. 'पळायचे' हा शब्द इरादापूर्वक लिहिला आहे. कारण कोणाबरोबर बोलत राहणे मला आवडत नसे. कोणी माझी थट्टा केली तर, अशी भीतीही वाटे. हायस्कूलात पहिल्याच वर्षी परिक्षेच्या प्रसंगी घडलेली एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. शाळाखान्याचे इन्स्पेक्टर जाइल्स शाळा तपासण्यास आले होते. त्यांनी पहिल्या इयत्तेच्या मुलांना पाच शब्द लिहायला घातले. त्यांत एक शब्द केटल (kettle) होता. त्याची वर्णरचना मी चुकीची लिहिली. मास्तरांनी मला आपल्या बुटाची टोक मारुन इशारा दिला. परंतु विद्यार्थ्यांच्या पाटीकडे पाहुन माझे शुद्धलेखन सुधारण्यास सांगत असतील, अशी माझी कल्पनाही होऊ शकली नाही. माझी समजूत की आम्ही एकमेकांचे चोरुन पाहु नये. एवढ्यासाठीच मास्तर नजर ठेवीत आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे पाची शब्द बरोबर आले आणि मीच काय तो 'ढ' ठरलो! माझा मुर्खपणा मास्तरांनी मागाहून मला दाखवून दिला. परंतु

माझ्या मनावर त्या सांगण्याचा काही परिणाम झाला नाही. मला दुसऱ्या विद्यार्थ्याची कॉपी कधीच करता आली नाही.

असे असूनही मास्तरांविषयी माझी विनयवृती कधीच ढळली नाही. वडील मंडळीचे दोष न पाहण्याचा गुण माझ्यामध्ये स्वभावत:च होता. त्याच मास्तरांचे इतर दोषही मागहून माझ्या ध्यानात आले. तरीही त्यांच्याबद्दल मला वाटणारा आदर कायम राहिला वडिलांच्या आज्ञेचे पालन करायचे, एवढे मला माहित होते. ते सांगतील ते करावे; याच सुमारास दुसरे दोन प्रसंग घडले; ते कधीही माझ्या स्मराणातून गेलेले नाहीत. मला सामान्यपणे शाळेच्या पुस्तकांपलीकडे काहीही वाचण्याचा नाद नसे. धडे केले पाहिजेत; बोललेले सहन व्हावयाचे नाही. मास्तरांना फसवावयाचे नाही. म्हणून धडे वाचीत असे. परंतु मनातून कंटाळा. त्यामुळे धडे पुष्कळदा कच्चे राहत. मग इतर वाचन सुचणार कोठून? परंतु वडिलांनी विकत आणलेले एक पुस्तक माझ्या नजरेत भरले. ते श्रावण पितृभक्ति नाटक ते वाचण्याची मला इच्छा झाली. ते अतिशय आवडीने वाचले. त्याच सुमारास काचेतून चित्रे दाखविणारेही दारोदार हिंडत. त्यांच्यापासून श्रावण आपल्या आई-बापांना कावडीत बसवून यात्रा करण्यास घेऊन जात आहे, असे चित्र मी पाहिले. दोन्ही गोष्टींचा माझ्या मनावर खूप परिणाम झाला. मला पण श्रावणासारखे व्हावयाचे. असे मनात येई श्रावणाच्या मृत्यु समयीचा त्याच्या मातापित्यांचा विलाप अजून आठवतो. ती गोड चाल मी बाजावरही बसविली. बाज्या शिकण्याची हौस होती व वडिलांनी एक बाजाही घेऊन दिला होता.

याच समुमारास कोणी नाटकमंडळी आली होती. तिचे नाटक पाहण्याची परवानगी मिळाली. हरिश्चंद्राचे व्याख्यान होते. ते नाटक पाहण्याचा मला कंटाळा कसा तो वाटेच ना. ते पुन:पुन: पाहण्याची इच्छा होई. वारंवार पाहायला कोण जाऊ देणार? परंतु मनातल्या मनात मी नाटक शेकडो वेळा रंगविले असेल. हरिश्चंद्राची स्वप्ने पाडत. सर्वांनीच हरिश्चंद्रासारखे सत्यवादी का होऊ नये? हाच विचार छळे. हरिश्चंद्रावर आल्या तसल्या विपत्ती भोगून सत्याचे पालन करावे हेच खरे सत्य. नाटकात वर्णिलेल्या होत्या. तशाच विपत्ती हरिश्चंद्रावर येऊन पडल्या असल्या पाहिजेत, तसेच मी तरी समजत होतो. हरिश्चंद्राचे दु:ख पाहून त्याचे स्मरण करून मी खूप रडलो आहे. आज माझ्या मनसृष्टीत हरिश्चंद्र आणि श्रावण आजही जिवंत आहेत. आज सुद्धा मी ती नाटके वाचली, तर आजही मला अश्रू येतील.

गांधीजी असे म्हणतात की, माझी एकामागून एक तीनदा सगाई झाली. ती केव्हा व कशी याची मला गंधवार्ताही नाही. दोन कन्या एकामागून एक मृत्यू पावल्या, असे मला कोणी सांगितले. त्यावरून मला माहित की, माझ्या तीन सगाया झाल्या होत्या. तिसरी सगाई सातएक वर्षाच्या वयाला झालेली असावी असे काहीसे स्मरते. परंतु सगाई झाली त्यावेळी मला काही सांगितले असल्याचे माहित नाही. विवाहामध्ये वर व कन्या दोहोंची जरुर पडते. विवाहामध्ये विधी करायचा असतो. मी लिहित आहे ते या विवाहासंबंधी विवाहाचे मला पूर्ण स्मरण आहे.

आम्ही तीन भाऊ होतो, हे वाचकांना माहितच आहे. त्यापैकी वडील भावाचे लग्न होऊन चुकले होते. मधले बंधू माझ्यापेक्षा दोन-तीन वर्षांनी मोठे होते. त्यात माझा चुलत भाऊ कदाचित माझ्याहून वर्षाभराने मोठा असेल. त्याचा व माझा असे तीन विवाह एकत्र करण्याचा वडील मंडळींनी बेत केला. हिंदुसमाजामध्ये विवाह अशी तशी गोष्ट नाही. वर-वधुचे आई-बाप लग्नापायी सर्वस्व घालवून बसतात, पैसे उधळतात आणि काळाचा अपव्यय करतात. आगाऊ कित्येक महिन्यांपासून तयारी सुरू होते. कपडे तयार होतात, दागिने घडवायचे असतात, गावभोजनाचे अंदाज चालतात. भोजनासाठी निरनिराळी पक्वानन्ने करण्याच्या शर्यती सुरु होतात. गळा असो किंवा नसो, बायका घसे बसेतो गाणी गातात, आजारी पण पडतात! शेजाऱ्यांच्या शांततेचा भंग करतात.

एवढा गोंधळ तीन वेळा करण्यापेक्षा एकाच वेळी उरकून घेतला तर किती चांगले? लग्न थोडक्या खर्चात आणि थाटाने होईल. आम्हा भावांना तयारी चाललेली पाहूनच समजले की लग्ने व्हायची आहेत. त्यावेळी माझ्या मनात चांगले कपडे वापरायला मिळतील. वाजंत्री वाजतील, वरात निघेल, सुग्रास भोजने मिळतील, एका नव्या मुलीबरोबर खेळ करायला मिळतील, वगैरे. नैसेपलीकडे दुसरे काही असल्याचे स्मरत नाही. विषय वासना मागाहून उद्भावली. ती कशी उद्भवली त्याचे वर्णन मी करू शकेन. परंतु वाचकांनी तशी जिज्ञासा ठेवू नये. मी माझ्या लज्जेवर झाकण घालू इच्छितो. आम्हा दोघा भावांना राजकोटहून पोरबंदरला नेले. तेथे हळद लावण्याचे वगैरे विधी झाले, ते सर्व मनोरंजक असले तरी सोडून देणेच योग्य. वडील दिवाण झाले तरी नोकरच. शिवाय राजाच्या मर्जीतले. त्यामुळे विशेषत: पराधीनचं. ठाकूर साहेब शेवटच्या घटकेपर्यंत जाऊ देत ना. शेवटी जाऊ दिले तेव्हा मुद्दाम टफ्यांची व्यवस्था केली आणि दोनच दिवस अगोदर पाठविले. पण विधिघटित निराळेच होते. राजकोटहून पोरबंदर ६० कोस आहे. गाडी रस्त्याने पाच दिवसांची वाट होती. वडील तीन दिवसांत आले. शेवटच्या मजलीत टांगा उलटल्या. वडिलांना जबर दुखापत झाली. हातावर पट्टी, पाठीवर पट्टी. विवाहातून त्यांची आणि आमचा अर्धा आनंद मावळला. पण विवाह तर झालेच. लिहिलेले मुहूर्त काही टळणार आहेत? मी तर विवाहाच्या बालउत्साहात वडिलांचे दु:ख विसरून गेलो.

पितृभक्त खराच, पण विषयभक्तही तितकाच ना? येथे विषयाचा अर्थ एकाच इंद्रियाचा विषय नव्हे. तर भोगमात्र मातापितरांच्या भक्तीसाठी सर्व सुखांचा त्याग केला पाहिजे. हे ज्ञान पुढे यावयाचे होते. असे असूनही जणू काय मला या भोगेच्छेचे प्रायश्चित भोगणेच जरुर होते. म्हणून माझ्या आयुष्यात असा एक वेडावाकडा प्रसंग घडला की जो मला अद्यापर्यंत सलत आहे.

त्याग न टके रे वैराग्य विना, करीए कोटि उपाय जी।

हे गीत मी गातो किंवा ऐकतो, त्यावेळी हा दारुण आणि कटू प्रसंग मला आठवतो आणि शरम आणतो. बालविवाहाचा विचार करताना वडिलांच्या कृत्याची जी टीका मी आज केली आहे, ती काही माझ्या मनाने त्यावेळी थोडीच केली होती? त्यावेळी सर्व काही यथायोग्य आणि मनाजोगे वाटत होते. लग्नाची आवड होती आणि वडील करतात ते सर्व बरोबरच आहे असे वाटत होते. बोहल्यावर बसलो, सप्तपदी केली, शिरा खाल्ला, घास दिले, मिळालेल्या शिकवणीचा तरी काय उपयोग? पण या गोष्टी काय शिकवाव्या लागतात? जेथे संस्कारच बलवान असतात. तेथे शिकवण ही व्यर्थ बडबड होऊन बसते. हळूहळू ऐकमेकांना ओळखू लागलो. बोलू-चालू लागलो. आम्ही दोघं सारख्या वयाची आहोत. पण मी मात्र स्वामित्व गाजवायला सुरुवात केली.

विवाह झाला तेव्हा हायस्कूलात आम्ही तिन्ही भाऊ एका शाळेत शिकत होतो. हे त्यावेळी आम्ही वडील बंधी वरील इयत्तेत होते आणि ज्या बंधुंच्या लग्नाबरोबर माझे लग्न झाले ते एक वर्षे पुढे होते. माझा अभ्यास चालू राहिला. हायस्कूलात माझी गणना ढ विद्यार्थ्यांत होत नसे. शिक्षकांची मर्जी तर मी नेहमीच संपादित असे. प्रत्येक वर्षी आई-बापाना विद्यार्थ्यांचा अभ्यास व वर्तन यासंबंधी प्रमाणपत्रे पाठविली जात. त्यामध्ये कधीही माझा अभ्यास किंवा वर्तन खराब असल्याबद्दल टीका नव्हती. चार व दहा रूपयांची शिष्यवृत्तीही मिळविली.

मला स्वत:ला असे स्मरते की मला माझ्या हुशारीबद्दल अभिमान मुळीच नव्हता. बक्षिस किंवा शिष्यवृत्ती मिळाली तर मला आश्चर्य वाटत असे. परंतु माझ्या वर्तनाला मी फार जपत असे.

असे माझ्या शिक्षणाचे प्रयत्न चालू राहिले आणि आयुष्याचे.

■ ■ ■

महात्मा गांधी

पूजा संजय प्रधान
बी.ए. प्रथम वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरित केले. रविंद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम त्यांना 'महात्मा' (महान आत्मा)ही उपाधी पिली भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत आणि त्यांना अनाधिकृतपणे भारताचे राष्ट्रपिता म्हटले जाते. सुभाषचंद्र बोस यांनी इ.स. १९४४ मध्ये पहिल्यांदा त्यांनी राष्ट्रपिता असे संबोधले असे म्हणतात. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. त्यांचा जन्मदिवस २ ऑक्टोबर हा भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो.

असहकार आणि अहिंसेच्या तत्त्वावर आधारीत सत्याग्रहाचा उपयोग गांधींनी प्रथम दक्षिण आफ्रिकेमध्ये भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. इ.स. १९१५ मध्ये भारतात परत आल्यावर त्यांनी चंपारण्यामधील शेतकऱ्यांना जुलुमी कर व जमीनदार यांच्या विरुद्ध लढण्यासाठी एकत्र केले. इ. स. १९२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे सांभाळल्यानंतर गरिबी निर्मूलनण, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क, सर्व धर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वराज्य यासाठी देशभरात चळवळ चालू केली. गांधी आजीवन साम्प्रदायीकत्त्ववादाचे (सम्प्रदायांवर राजकरण करणे) विरोधक होते आणि ते मोठ्या प्रमाणात सर्व धर्म आणि पंथ यांच्यापर्यंत पोहोचले. ढासळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीला त्यांनी आधार दिला आणि ते मुस्लिमांचे नेते बनले. इ.स. १९३० मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे ४०० कि.मी. (२५० मैल) लांब दांडी यात्रेमध्ये प्रतिनिधित्व केले. इ.स. १९४२ मध्ये त्यांनी इंग्रजांविरूद्ध भारत छोडो आंदोलन चालू केले. या आणि यासारख्या इतर कारणांसाठी त्यांनी भारतात तसेच दक्षिण आफ्रिकेमध्ये अनेकदा तुरुंगात टाकण्यात आले.

गांधीनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा पुरस्कार केला. स्वत: ही याच तत्त्वांनूसार जगले आणि इतरांनी तसे करावे असे सुचवले. त्यांनी खेड्यांना खऱ्या भारताचे मूळ म्हणून पाहिले आणि स्वयंपूर्णतेचा पुरस्कार केला.

ब्रिटनमधील विन्स्टन चर्चिल यांनी १९३० साली त्यांची अर्धनग्न फकीर म्हणून निर्भत्सना केली. स्वत: कातलेल्या सुताचे धोतर आणि राजकीय चळवळींसाठी साधन म्हणून दीर्घ उपवास केले. त्यांच्या शेवटच्या वर्षामध्ये भारत पाकिस्तान फाळणीमूळे व्यथीत झालेल्या गांधींनी हिंदु-मुस्लीम दंगे थांबवण्यासाठी प्रयत्न केले.

सुरूवातीचा काळ

गांधींचा जन्म ऑक्टोबर २ इ.स. १८६९ या दिवशी सध्याच्या गुजरात मधील पोरबंदर शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद आणि आईचे नाव पुतळीबाई होते. करमचंद गांधी तत्कालीन काठेवाड प्रांतातील पोरबंदर मध्ये दिवाण होते. पुतळीबाई या करमचंद यांच्या चौथ्या पत्नी होत्या. करमचंद हिंदु मोध समाजातील होते तर पुतळीबाई वैष्णव समाजातील अत्यंत धार्मिक वातावरणातील बालपणीचा मोठा प्रभाव गांधीजींच्या पुढील आयुष्यावर दिसून येतो. विशेषण अहिंसा, शाकाहार, सहिष्णुता, इतरांबद्दल

करूणा या तत्त्वांचे बीज याच काळात रोवले गेले. जैन धार्मिक असलेल्या आईमुळे मोहनदास वर जैन संकल्पना आणि प्रथांचा प्रभाव होता. प्राचीन वाङमय यातील श्रावणबाळ आणि हरिश्चंद्र या दोन कथांचा मोहनदासच्या मनावर गहिरा परिणाम होता. स्वत:च्या आत्मचरित्रात ते कबूल करतात की या दोन कथांमूळे त्यांच्या मनावर अमिट परिणाम झाला होता. ते लिहीत त्यांने मला झपाटले आणि मी अगणिक वेळा माझ्याशीच हरिश्चंद्रासाखा वागलो असेन. गांधीच्या सत्य आणि प्रेम या दैवी गुणाशी झालेल्या स्व: ओळखीचा मार्ग हा पौराणिक पात्रांपर्यंत येऊन पोहोचतो.

त्यांच्या पोरबंदरमधील प्राथमिक तसेच राजकोट मधील माध्यमिक शिक्षणामध्ये ते एक साधारण विद्यार्थी होते. त्यांचा एका वार्षिक परिक्षेतील अहवाल पुढील

बॅरिस्टर

शालेय शिक्षण संपवून वयाच्या एकोणिसाव्या वर्ष इ.स. १८८८ मध्ये ते इंग्लंडमध्ये लंडनला युनिव्हर्सिटी कॉलेज, वकिलीचे शिक्षण घेण्यास गेले. तेथे त्यांनी इनरटेंपल या गावी राहून बॅरिस्टर होण्यासाठी भारतीय कायदा आणि न्यायशास्त्राचा अभ्यास केला. इंग्लंडला जाण्याआधी त्यांनी आईला जैन साधुच्या उपस्थितीत आपण मांस, बाई व बाटली (दारू) यापासून दूर राहू असे वचन दिले होते. त्याचे त्यांनी तिथे पालन केले. परंतु लंडन मधील दुर्मिळ असलेली एक भारतीय खानावळ सापडेपर्यंत ते खूप वेळा उपाधी राहत. गांधींनी तेथे इंग्रजी चालिरिती ग्रहण करण्याचा प्रयत्न केला.

सर्वधर्मसमानत्व कोणत्याच धर्माला मान्य नसते. प्रत्येक धर्माचे अनुयायी आपला धर्म परिपूर्ण निदोष व श्रेष्ठच मानीत असतात. हिंदू, बौद्ध व जैन आपणाला परिपूर्ण व निर्दोषच मानतात. फक्त ख्रिश्चन व मुसलमान यांच्याप्रमाणे आपला धर्म इतरांवर लादणे न्याय्य व समर्थनीय मानत.

■ ■ ■

राष्ट्रवाद पुनरुज्जीवन

मोनाली भाऊसाहेब उबाळे
बी.ए. प्रथम वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगवेगळ्या शक्तींचा उदय झाला. युद्धानंतर भारतातही राष्ट्रवादी हालचालींना सुरुवात झाली. आशिया आणि आफ्रिका व इतर युद्धात साम्राज्यवाद विरोधी शक्ती आता डोके वर काढू लागल्या. भारतीय स्वातंत्र्य चळवळीने या वेळा एक निर्णायक वळण घेतले. याचे सर्वात महत्त्वाचे कारण होते, भारतीय राजकारणात महात्मा गांधीचा झालेला उदय. महात्मा गांधीचा राष्ट्रीय आंदोलनात प्रवेश झाल्यानंतर आदोलनाला असलेला जनतेचा पाठिंबा प्रचंड वाढला. लोकसहभाग इतका वाढला की हे आंदोलन संपूर्ण भारतातील जनतेचे आंदोलन बनले.

महात्मा गांधीचे प्रारंभिक जीवन आणि दक्षिण आफ्रिकेतील सत्याचे प्रयोग

मोहनदास करमचंद गांधीं यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातच्या काठियावाड मध्ये पोरबंदर या ठिकाणी झाला. त्यांचे वडील काठियावाड येथील दिवाण होते. इंग्लंडमध्ये बॅरिस्टरची पदवी संपादन केल्यानंतर गुजरातच्या दादा अब्दुला या व्यापाराच्या खटला चालवण्यासाठी गांधीजी दक्षिण आफ्रिकेला गेलो. तेथे आशियातून मंजूरी करण्यासाठी आलेल्या लोकांना वंशवाद आणि वर्णभेदाचे शिकार व्हावे लागत असल्याचे गांधीजींच्या लक्षात आले. तिथे त्यांनी गोरे-काळे या वर्णभेदाला तीव्र विरोध केला. या नंतरच्या काळात गांधीजींनी अफ्रिकेत थांबून तेथील भारतीय मजुरांना न्याय हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा देत त्यांना संघटित करण्याचा निश्चय केला. इ.स. १९१४ पर्यंत गांधीजी अफ्रिकेत थांबले. त्यानंतर ते भारतात परतले.

मुळशी सत्याग्रह (१९२१-१९२४)

असहकार आंदोलनात चढ-उतार चालू होते. कर्ण जिल्ह्यात मुळशी येथे टाटा धरण बांधत होते. त्यामुळे १९२१ सत्याग्रह चालू राहिला. राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थी व प्राध्यापकांनी मुळशी सत्याग्रहात वाटा घेतला. अनेकांनी कारावास सोसला. या चळवळीचे नेतृत्व शंकरराव देव व त्यानंतर सेनापती बापट यांनी केला. या सत्याग्रहाचे वैशिष्ट्ये असे की, देशभरात शेतकऱ्यांच्या धरणग्रस्ततेमुळ निर्मित पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्यासाठी झालेला हा पहिलाच सत्याग्रह होय.

सायमन कमिशनवर बहिष्कारः-

मार्च ते सप्टेंबर १९२३ दरम्यान नागपूरला नाकेटवाद्यांच्या नेतृत्वाखाली झेंडा सत्याग्रह झाला. १९२६ च्या डिसेंबर मध्ये काँग्रेसचे अधिवेशन गुवाहटीला झाले. नोकरवाद्यांची प्रभाव जाणवला. मात्र प्रतिसहकार पक्ष, स्वश, पक्षा व नोकरवादी यांच्यात तिरंगी लढत दिसू लागली. अशा स्थितीमुळे राष्ट्रीय चळवळीचे नुकसान होणार म्हणून ऑगस्ट १९२६ मध्ये असल्याचे काँग्रसने जाहीर करावे असा त्यांनी आग्रह धरला.

■ ■ ■

महात्मा गांधींचे जीवनकार्य

माधुरी गजानन महाले
बी.ए. प्रथम वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

मोहनदास करमचंद गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्वज्ञ होते. महात्मा गांधी या नावाने ते ओळखले जातात. अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरित केले. भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत आणि त्यांना अनाधिकृतपणे भारताचे राष्ट्रपिता म्हटले जाते. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. त्यांचा जन्मदिवस २ ऑक्टोबर हा भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भारतात सार्वजनिक सुट्टी असते.

महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ या दिवशी सध्याच्या गुजरातमधील पोरबंदर शहरात झाला. त्यांच्या वाडिलांचे नाव करमचंद आणि आईचे नाव पुतळीबाई होते. करमचंद ग्रधी तत्कालीन काठेवाड प्रांतातील पोरबंदरमध्ये दिवाण होते.

इ.स. १८८३ मध्ये वयाच्या तेराव्या वर्षी त्यांच्या कस्तुरबा माखनची यांच्या बरोबर विवाह झाला. त्यांचे नाव लहान करुन कस्तुरबा (आणि प्रेमाने बा) असे घेतले जाई. पण त्या काळातील रिवाजानुसार कस्तुरबा बहुतांश काळ त्यांच्या वडिलांच्या घरीच होत्या. या प्रक्रियेत महात्मा गांधींनी शालेय शिक्षणाचे एक वर्ष गमवावे लागले. त्यांच्या पोरबंदरमधील प्राथमिक तसेच राजकोटमधील माध्यमिक शिक्षणामध्ये ते एक साधारण विद्यार्थी होते.

शालेय शिक्षण संपवून वयाच्या एकोणविसाव्या वर्षी इ.स. १८८८ मध्ये ते इंग्लंडमध्ये लंडनला युनिव्हर्सिटी कॉलेज वकिलीचे शिक्षण घेत गेले. तेथे त्यांनी इन टेंपल या गावी राहून बॅरिस्टर होण्यासाठी भारतीय कायदा आणि न्यायशास्त्राचा अभ्यास केला. इंग्लंडला जाण्याआधी त्यांनी आईला जैन साधुंच्या उपस्थित आपण मांस, बाई व बाटली (दारु) यापासून दुर राहू असे वचन दिले होते, त्याचे त्यांनी तिथे पालन केले.

इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास करुन ते बॅरिस्टर बनले आणि हिंदुस्थानात परत येऊन वकिली करु लागले. १८९१ मध्ये ते इंग्लंड सोडून परत भारतात आले. भारतात आल्यावर कळले की त्यांच्या आईचा ते लंडनमध्ये असतानाच देहान्त झाला आहे आणि त्यांच्या कुटुंबाने ही बातमी त्यांच्या पासून लपवून ठेवली. मुंबईमध्ये कायद्याची प्रॅक्टिस उभी करण्याची त्यांची योजना सफल झाल नाही. कारण ते कोर्टात बोलण्यासाठी अतिशय लाजाळू होते. खटल्यांसाठी मसुदा तयार करण्याच्या साध्या जीवनाची सुरुवात करण्यासाठी ते राजकोटला परत आले. परंतु एका ब्रिटीश अधिकाऱ्याच्या विरोधात गेल्याने हे काम त्यांना बंद करावे लागले.

गांधींनी आयुष्याची २१ वर्षे दक्षिण आफ्रिकेत घालवली, जेथे त्यांनी त्यांचे राजकीय दृष्टिकोन, नैतिक आणि राजकीय नेतृत्व कौशल्य विकसित केली. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचे नेतृत्व असणाऱ्या श्रीमंत मुस्लिमांनी आणि अतिशय कमी अधिकार असणाऱ्या गरिब हिंदू गिरमिठ्यानी गांधींना नोकरी दिली. भारतीयत्व सर्व धर्म आणि जातींमध्ये उतरले आहे, असा दृष्टिकोन आयुष्यभर

ठेवत गांधींनी या सर्वांना भारतीयच मानले. मुख्यत्वे धर्माच्या बाबतीत ऐतिहासिक भिन्नता आपण साधु शकू असा त्यांचा स्वतःबद्दल विश्वास होता, आणि हा विश्वास घेऊन ते भारतात आले. येथे त्यांनी या विश्वासाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. दक्षिण आफ्रिकेमध्ये गांधींना समाजाच्या विकालांगाची ओळख झाली. भारतीय धर्म आणि संस्कृती यामध्ये असलेल्या गुंतागुंतीच्या समस्यांपासून आपण दुर आहोत याची त्यांना जाणीव झाली आणि दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना समजून घेऊन व त्यांचे नेतृत्व करुन आपणास भारत समजला असे ते मानु लागले.

१९०६ मध्ये इंग्रजांनी नाताळमध्ये झुलू राज्याविरुद्ध युद्ध पुकारले. इंग्रजांच्या बाजूने लढण्यासाठी भारतीयांना भरती करवून घेण्यासाठी गांधींनी इंग्रजांना प्रोत्साहित केले. भारतीयांनी पुर्ण नागरिकत्वाच्या दाव्यास वैध ठरविण्यासाठी इंग्रजांचा पाठिंबा देणे गरजेचे आहे असा युक्तिवाद त्यांनी केला. ब्रिटिशांनी गांधींजींची ही मागणी मान्य केली. आणि २० जणांच्या भारतीय स्वंयसेवकाच्या तुकडीला जाऊ दिले. जखमी सैनिकांना उपचार देण्यासाठी स्ट्रेचरवरुन वाहुन नेणे ही या तुकडीची जबाबदारी होती. ही तुकडी गांधींच्या नियंत्रणाखाली होती. दोन महिन्यांपेक्षाही की काळ या तुकडीने काम केले.

या अनुभवातून ते असे शिकले की, ब्रिटिशांच्या अपरिहार्य वाढणाऱ्या मिलिटरी ताकदीस उघड उघड आवाहन देणे निराशाजनक आहे. त्यांनी ठरवून टाकले की याचा प्रतिकार हृदयातील पवित्र अश्या अहिंसात्मक पद्धतीनेच करता येईल. नंतर जेव्हा काळ्या लोकांचे बहुमत सत्तेत आले तेव्हा गांधींना राष्ट्रीय नायक म्हणून विविध स्मारकात घोषित करण्यात आले.

इ. स. १९१५ मध्ये गांधीजी कायमसाठी भारतात पर आले. एक प्रमुख भारतीय राष्ट्रवादी, थिओरिस्ट आणि संघटक अशी त्यांची आंतरराष्ट्रीय ख्याती होती. ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनेक संमेलनांतुन बोलले. खऱ्या अर्थी भारताचे राजकारण व समस्या यांचा परिचय त्यांना गोपाळ कृष्ण गोखले यांनी करुन दिला. गोपाळ कृष्ण गोखले तेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रमुख नेते होते. गोखले त्यांच्या संयम, संतुलन आणि व्यवस्थेच्या आतमध्ये राहून काम करण्याच्या आग्रहाबद्दल ओळखले जाते. आजही ते गांधीजींचे राजकीय गुरु म्हणून ओळखले जातात.

एप्रिल १९१८ ला पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात, व्हाईसरॉयने गांधींना दिल्लीत एका युद्ध परिषदेसाठी बोलावले. कदाचित गांधींनी त्यांचा इंग्रज साम्राज्यास असलेला पाठिंबा दर्शवावा आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणीसाठी मदत मिळवावी हा त्यामागचा हेतू होता. गांधीनी भारतीयांना सक्रियपणे युद्धात आणि १९१४ मधील प्रथम जागतिक युद्धामधील भारताच्या विरुद्ध यावेळी जेव्हा त्यांनी रुग्णवाहिका दलासाठी स्वयंसेवक भरती केले, तेव्हा योद्धे भरती करण्याचा प्रयत्न केला. गांधींच्या युद्धभरतीने त्यांच्या अहिंसेबद्दलच्या एकजिनसीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यांचा मित्र चार्ली आंद्रीउस नमुद करतो, ''वैयक्तिकरीत्या मला कधीही त्यांच्या ह्या वर्तणुकीचा त्यांच्या स्वत:च्या इतर वर्तनांशी मेळ घालता आला नाही. ज्यावर मी वेदनादायकरीत्या असहमत झालो आहे हा त्या मुद्यांपैकी एक आहे.''

गांधीजींना पहिले मोठे यश १९१८ मध्ये चंपारण आणि खेडामधील सत्याग्रहात मिळाले. चंपारण, बिहारमधील जमीनदार जे प्रामुख्याने ब्रिटिश होते. स्थानिक शेतकऱ्यांना सक्तीने नीळ उत्पादन करावयास लावत असत. त्यांना योग्य मोबदला मिळत नसे. यामुळे ते सतत गरिबीत राहत. शेतकऱ्यांची गावे अत्यंत घाणेरडी आणि आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक ठेवली जात. यावर भर म्हणजे तेथील दुष्काळ पण इंग्रजांनी तरीही अनेक जाचक कर लादले होते आणि ते वाढतच होते. गुजरात मधील खेडामध्ये सुद्धा स्थिती काही वेगळी नव्हती. गांधीजींनी तिथे एक आश्रम

उभारला. त्यांनी त्या भागातील परिस्थितीची माहिती गोळा केली व तिचा सखोल अभ्यास केला. गावकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांनी गावाच्या स्वच्छतेचे तसेच शाळा, रुग्णालयाच्या बांधकामाचे काम हाती घेतले. याचसोबत गावातील प्रमुखांना वर उल्लेखलेल्या प्रथा नष्ट करण्यास प्रवृत्त केले.

अहिंसा के पुजारी हैं हम तो
बातों से भी किसी का दिल ना दुखाऐंगे
दुखा लेंगे दिल अपना, मगर
औरो को दिल से बस दुआएं ही देंगे ।

मोठा मासा छोट्या माशाला खाऊन जगतो, हा जंगलचा कायदा. विकास, संस्कृती आणि प्रगतीबरोबर 'जगा आणि जगू द्या' हा सिद्धांत मानवाने जाणला. परंतु या विचारात महात्मा गांधी यांनी सांगितलेली अहिंसा नाही. महात्मा गांधीनी एक नवा विचार लोकांसमोर आणला. हा विचार होता, स्वत: जगा आणि इतरांना जगण्यासाठी मदत करा. हा सकारात्मक विचार असून त्यात संपुर्ण मानवता सामावलेली आहे. माणुसपणा आणि पुरुषार्थाचे दोन गुण असतात. एक मानवता आणि दुसरा पौरुष या दोहोंच्या समन्वयातून अहिंसेचा जन्म होतो. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत जराही न डगमगणाऱ्या गांधीजींचा पुरुषार्थ आणि शौर्य हे मानवी निष्ठा, अहिंसा, शास्त्रीयता आणि वास्तव यांचे अधिष्ठान होते.

आपल्या अहिंसेची दोन लक्षणे ते सांगतात. एक प्रेम आणि दुसरे पुरुषार्थ आणि मानवता यांचा अद्भुत मिलाफ त्यांच्या ठायी होता. पराकाष्ठेची वीरता त्यांच्याकडे होती. अहिंसा हे क्रियाशील तत्त्व आहे, असे ते मानत, त्यामुळेच अभय आणि निर्भयतेशिवाय सत्याचा शोध अशक्य आहे, असे ते म्हणत. या तत्त्वांशिवाय सत्याचा शोध अशक्य आहे, असे ते म्हणत. या तत्त्वांशिवाय अन्यायाविरुद्ध लढता येते नाही. शुर माणुस भयमुक्त असतो. तलवार बाळगणाऱ्या व्यक्तीला आपण शुर म्हणू शकत नाही. कारण तलवार बाळगणे हेच भयाचे द्योतक आहे. शस्त्रांचा आधारच भय हा असतो. भयाच्या उदरातुन केवळ नकारात्मक भावनांचा विकास होता. व्यवहारातच तेच सत्य असते. जो मृत्युला घाबरतो, त्याच्यात प्रतिकाराची शक्ती नसते. त्याचे अहिंसेशी नाते जुळत नाही.

१९२० च्या दशकाचा मोठा काळ गांधीजी प्रत्यक्ष राजकारणापासून दुर राहिले आणि त्यांनी आपले लक्ष स्वराज्य पक्ष आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधील मतभेद दूर करण्यावर केंद्रीत केले. या काळात त्यांनी समाजातील अस्पृश्यता, दारु समस्या आणि गरिबी कमी करण्याचे आपले प्रयत्न चालू ठेवले.

गांधीजींनी १९२८ च्या कलकत्त येथील काँग्रेसच्या अधिवेशनात एक ठराव पास केला. त्याद्वारे ब्रिटिश सरकारकडे भारताला सार्वभौम दर्जा देण्याची मागणी मंजुर न केल्यास पर पुर्ण स्वराज्यासाठी असहकार चळवळ सुरु करण्यात येईल असे बजावण्यात आले. गांधीजींनी ब्रिटिश सरकारला उत्तरासाठी एक वर्षाचा अवधी दिला. पण ब्रिटिश सरकारने काही उत्तर दिले नाही. आणि ३१ डिसेंबर १९२९ मध्ये लाहोर अधिवेशनात भारताचा ध्वज फडकवण्यात आला.

गांधीजींनी मार्च इ. स. १९३० मध्ये मिठावरील कराच्या विरोधात सत्याग्रहाची घोषणा केली आणि त्याची परिणती प्रसिद्ध दांडी यात्रेत झाली. १२ मार्चला अहमदाबादहुन निघालेली यात्रा ६ एप्रिलला ४०० कि.मी.चा प्रवास करुन दांडीला पोहोचली. हजारोंच्या संख्येने भारतीय या यात्रेत सहभागी झाले होते. ही यात्रा इंग्रजांची भारतातील पाळेमुळे उखडण्याच्या प्रयत्नांमधील सर्वांत यशस्वी प्रयत्न ठरली. ब्रिटिशांनी उत्तरादाखल ६०,००० हुन अधिक लोकांना तुरुंगात डांबले.

शेवटी लॉर्ड एडवर्ड आयर्विन यांच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश सरकारने गांधीजींनी वाटाघाटी करण्याचे ठरवले. मार्च इ. स. १९३१ मध्ये गांधी आयार्विन करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या करारानुसार ब्रिटिश सरकारने सर्व भारतीय कैद्यांना मुक्त करण्याचे मान्य केले.

गांधीजींचा शैक्षणिक दृष्टिकोन

लोकमान्य टिळकांनी त्यांच्या चतु:सुत्रीमध्ये स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि परकीय मालावर बहिष्कार या चार कल्पना मांडल्या आहेत. गांधीजींनी टिळकांच्या स्वदेशीचे रुपांतर खादीमध्ये केले. राष्ट्रीय शिक्षणाचे रुपांतर नयी तालीम या संकल्पनेत केले. याचा अर्थ असा की, गांधीजींना स्वयंभू शिक्षण विचार विकसित करायचा होतो. त्यासाठी महात्मा गांधींनी नयी तालीम ही संकल्पना मांडली. मकरंद परांजपे 'डिकॉलनायजिंग हिंद स्वराज' या ग्रंथात असे म्हणतात की, गांधीजींना वसाहतवादी शिक्षणाचा विचार बदलावयाचा होता व त्याऐवजी राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करायचा होता. असा राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करतांना त्यांनी भारतातील तत्कालीन परिस्थिती, इंग्रजांचे धोरण आणि भारतीय शिक्षण संस्थांपुढील आव्हाने या सर्व बाबींचा विचार करुन नवा विचार विकसित केला.

काळाच्या प्रवाहात विचार करता असे दिसते की, महात्मा गांधींनी नयी तालीम या शिक्षण विचारामध्ये स्वावलंबन आत्मसन्मान आणि श्रमप्रतिष्ठा ही तीन मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न केला. स्वावलंबन हाच आमचा निर्धार आहे आणि आम्हीच आमच्या यशाचे शिल्पकार आहोत. अशा व्यक्तिमत्त्वाच्या आस्मितेमधील स्वत:च्या जागरणाचा विचार आणि या स्वचे रुपांतर समाज व राष्ट्र जीवनामध्ये करण्याचा प्रयत्न गांधीजींनी केला.

३० जानेवारी १९४८ ला, दिल्लीच्या बिर्ला भवनच्या बागेतून लोकांबरोबर फिरत असतांना गांधीजींची गोळी मारुन हत्या करण्यात आली. त्यांचा मारेकरु नथुराम गोडसे हा एक पुरोगामी हिंदू होता व त्याचे संबंध जहालमतवादी हिंदू महासभेशी होते. नथुराम गोडसेने महात्मा गांधी यांची हत्या करण्यासाठी बरेटा मॉडेलचे पिस्तुल वापरले होते. त्याच्या मते पाकिस्तानला पैसे देऊन भारताला दुबळे पाडण्यासाठी गांधीजी जबाबदार होते. गोडसे आणि त्याचा सहकारी नारायण आपटे यांच्यावर खटला दाखल करुन त्यांना दोषी ठरवण्यात आले. त्यांना १५ नोव्हेंबर १९४९ ला फाशी देण्यात आली. गांधीजींच्या राजघाट येथील समाधीवर 'हे राम' असे लिहिले आहे. हे त्यांचे शेवटचे शब्द होते असे अनेक जण मानतात, पण त्यांची सत्यासत्यता वादग्रस्त आहे.

■ ■ ■

व्यक्ती आपल्या विचारांशिवाय काहीच नाही.
lesperedkÛ kÛles lenyeles - **म. गांधी**

महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास

दीपाली सुधाकर बोलकर
बी.ए. द्वितीय वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

'दे दी हमे आझादी बिन खड्ग बिना ढाल, साबरमती के संत तुने कर दिया कमाल'

रक्ताचा एक थेंबही न सांडविता ज्या माणसाने करोडो भारतीयांना नि:शस्त्र होऊन स्वातंत्र्य मिळवून दिले, तेही कोणतेही शस्त्र न वापरता. ही जगातील अद्भुत अशीच क्रांती होती. भारतीयांना इंग्रजांच्या गुलामगिरीतुन मुक्त करण्यासाठी गांधींनी सत्य, अहिंसा व सत्याग्रह यांचा वापर केला. महात्मा गांधी एक महान व श्रेष्ठ असे जागतिक कीर्तीचे नेते होते. अशा या महान राष्ट्रपित्याला माझे कोटी कोटी वंदन.

महात्मा गांधींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी हे होते. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी पोरबंदर (सुदामपुरी) या काठियावाड संस्थानातील गावी मोढ समुदायातील वैश्य किंवा बनिया कुटुंबात झाला. वडीलांचे नाव करमचंद काबा गांधी हे होते. आईचे नाव पुतळाबाई हे होते. त्यांचे वडील व पूर्वज काठियावाड संस्थानाचे दिवाण होते. पुढे सगळ्या जगाला आपल्या विचारांनी आणि कार्यांनी थक्क करुन सोडले, त्या गांधीचे आरंभीचे आयुष्य अतिशय सामान्य दर्जाचे होते. त्याचे प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण राजकोट येथे झाले. भावनगरच्या समलदास कॉलेजमधून १८८७ मध्ये मॅट्रिक झाले. वयाच्या एकोणीसाव्या वर्ष पुढील शिक्षणासाठी गांधी लंडनला गेले. युनिव्हर्सिटी लॉ कॉलेज ऑफ लंडन येथे प्रवेश घेतला. जून १८९१ मध्ये बॅरिस्टरचे शिक्षण पूर्ण करुन गांधी भारतात परत येण्यासाठी निघाले. बॅरिस्टर झाल्यावर राजकोट येथे गांधींनी वकिली सुरु केली. त्याआधी मुंबईतही वकिलीचा प्रयत्न केला. अर्धवेळ शिक्षक म्हणून कामही केले. न जमल्याने ते राजकोटला परत गेले. वकिली करतांना गांधी लाजाळू आणि निराशेने ग्रासलेले असत नंतर ते अर्ज लिहिण्याचे काम करु लागले. अशातच दक्षिण आफ्रिकेतील गुजराती मुस्लिम व्यापारी अब्दुलशेठ यांनी यांनी गांधींना त्यांचा खटला चालवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत बोलावले. गांधींना ही एक संधी होती. पोरबंदरच्या मेणपिढीची वकिली करण्यासाठी ते दक्षिण आफ्रिकेत निघाले. १८९३ ते १९१४ जवळ-जवळ २१ वर्षे गांधी आफ्रिकेत होते. जातांना ते एक वर्षासाठी जायचे ठरवून निघाले. कारण ब्रिटिश साम्राज्याचा भाग असलेल्या नाताळ वसाहतीतील 'दादा अब्दुल्ला आणि कंपनी' या भारतीय कंपनीशी त्यांचा एक वर्षाचा करार झाला होता. पुढे त्यांना इतर कामे मिळाली.

मुख्य म्हणजे आफ्रिकेत भारतीयांच्या परिस्थितीचे दर्शन त्यांना झाले. तिथे त्यांच्या जीवनाला नविन वळण लागले. त्यांचे जीवन आणि कार्य आमुलाग्रपणे बदलले. या सगळ्यातून त्यांनी दक्षिण आफ्रिकेत सत्याचा मार्ग न्यायाचे प्रयत्न आणि गोऱ्या सरकारविरुद्ध अहिंसेचा लढा यांचे प्रात्यक्षिक घडवले. गांधींनी दक्षिण आफ्रिकेत प्रवेश करताच तेथील भारतीयांचे शोषण त्यांच्या नजरेस पडले. भेदभावाची वागणूक अनुभवास आली. भारतीयांना नोंदणी करावयास लावणारा अन्याय नोंदणी कायदा रद्द करण्यासाठी त्यांनी सतत ७ वर्षे आंदोलन केले. सत्याग्रह केलाच तो यशस्वी झाला. १८९३ मध्ये दरबन ते प्रिटोरीया असा रेल्वेचा पहिल्या वर्गाने प्रवास करीत असतांना गांधींना

उतरवून देण्यात आले. भारतीय पहिल्या वर्गाने प्रवास करु शकत नाही. असा वर्णद्वेशाचा कायदा तेथे होतो. थंडीत कुडकुडत गांधींना रेल्वेस्टेशनवर रात्र काढावी लागली. एक युरोपीय प्रवाशाला जागा देण्यासाठी त्यांना फळीवर उभे राहून प्रवास करायला सांगितले. यांनी नकार देताच ड्रायव्हरने त्यांना मारले. दरबानला त्यांना न्यायदंडाधिकाऱ्याने पगडी काढायला लावली. गांधींनी नकार दिला. असे छळवणूकीचे अनेक अनुभव त्यांना दक्षिण आफ्रिकेत आले. तेथील भारतीयांना शोषणाविरोधात संघटीत करुन १९१५ पर्यंत गांधींनी संघर्ष केला व ते भारतात परतले. पूर्वग्रह, अन्याय, वर्णद्वेष या विरोधात लढण्यासाठी गांधी सक्रीय झाले होते. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी १८९४ मध्ये 'नाताळ आफ्रिकन इंडियन काँग्रेस' स्थापन केली होती.

दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यावर गांधींनी येथील परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन केले. गांधींचे गोखल्यांनी स्वागत केले. गोखल्यांच्या पुढाकाराने १९१७ मध्ये गांधी काँग्रेसचे सभासद झाले. गोखल्यांकडून वैचारिक बैठक, साधन सुचिता, राजकीय अध्यात्म या गोष्टी गांधी शिकले. गोपाळकृष्ण गोखले हे महात्मा गांधींजीचे राजकीय गुरु होते.

बिहारमधील चंपारण्याच्या १९१७ मधील सत्याग्रहापासून गांधींची भारतीय राजकीय चळवळीची सुरुवात झाली. निळीची शेती करणाऱ्यांवर जुलूम दूर करण्यात त्यांना यश आले. पुढील वर्षी गुजरातमधील खेडा येथे साराबंदी सत्याग्रह केला. शक्तीने शेतसारा वसुली थांबवली. असहकार, अहिंसा शांततापूर्ण प्रतिकार या शक्तीतून केलेल्या चंपारण्य आणि खेडा सत्याग्रह हे गांधींचे लक्षणीय यश होते. या आंदोलनात गांधीजींना बापू म्हणून संबोधण्यात आले. स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या 'रौलट ॲक्टविरुद्ध' १९१९ मध्ये त्यांनी लढा दिला. गांधींच्या अहिंसात्मक युद्धाचा आणि शांततामय क्रांतीचा देशाला प्रत्यय आला. तेव्हा पासून गांधी देशाचे नेते बनले. खेडा येथे त्यांनी आश्रम स्थापन केले. स्वच्छ नैसर्गिक जिवन, घरबांधणी, दवाखाने, अनिष्ट चालीरींतींचे उच्चाटन यातून खेडूतांमध्ये त्यांनी आत्मविश्वास निर्माण केला. सत्याग्रहाच्या घटना घडत असतानाच गांधींनी 'यंग इंडिया' साप्ताहिक, 'हरिजन' हे बहुभाषिक नियतकालिक आणि 'नवजीवन' पत्रक सुरु केले. १९२२ नंतर असहकार पुकारुन आपले आंदोलन गांधींनी व्यापक केले, शिस्तबद्ध केले. त्यात स्त्रियांचा सहभाग वाढवला. सुतकताई, चरखा या रचनात्मक कार्यक्रमांची चळवळीस जोड दिली. ब्रिटिश मालावर, शिक्षण संस्थावर, पदव्यांवर, न्यायालयांवर, परकीय नौकऱ्यांवर बहिष्कार पुकारला. चळवळ ऐन बहरात असतांना चोरीचौरा शहरात हिंसाचाराची घटना घडली. गांधींनी चळवळ थांबवली. गांधींना १९२२ मध्ये देशद्रोहाच्या खटल्यात अटक होऊन ६ वर्षे शिक्षा झाली. १९२४ मध्ये सुटका झाली. ती गांधी आजारी असल्याने गांधींच्या चळवळीत महत्त्वाचे स्थान १९२८ मध्ये कायदेभंग करुन केलेल्या मिठाच्या सत्याग्रहाला आहे. त्यासाठी अहमदाबाद ते दांडीगाव अशी त्यांना दांडी यात्रा काढली. सुमारे ३८५ किमीच्या पदयात्रेत मार्गावरील अनेक गावांमधून त्यांनी भाषणे केली. आपल्या भाषणातून गांधीजींना जनतेला निर्भय होऊन कायदेभंग चळवळीत सामील होण्याचे आवाहन केले. गांधीजींच्या भाषणामुळे कायदेभंगाचा संदेश सर्वत्र पसरत गेला आणि चळवळीला अनुकूल वातावरण येथे पोहचले व तयार झाले. ५ एप्रिल १९३० रोजी गांधीजी दांडी येथे पोहचले.६ एप्रिल रोजी दांडीच्या समुद्र किनाऱ्यावरील मीठ उचलून गांधीजींनी मिठाचा कायदा मोडला आणि देशभर सविनय कायदेभंग चळवळ सुरु झाली. या आंदोलनात ८०,००० लोकांना अटक करण्यात आली. १९३० मध्ये गांधी आयर्विन करार झाला. गांधींना गोलमेज परिषदेसाठी बोलावले. त्यांनी एकट्याने भारताचे प्रतिनिधित्त्व केले. मात्र परिषदेतून फारसे निष्पन्न झाले नाही. पुन्हा १९३४ पर्यंत सत्याग्रह पुकारला. पुढे १९४२ ची 'चलेजाव चळवळ' त्यात 'करा

किंवा मरा' आदेश आणि देशभरात हजारोंनी त्याला दिलेला प्रतिसाद हा गांधींच्या आंदोलनाचा चमत्कार होता. देशाच्या फाळणीला आणि सांप्रदायिक दंग्यांना गांधींना जबाबदार धरुन माथेफिरूने गांधींवर ३० जानेवारी १९४८ रोजी गोळ्या झाडल्या व त्यांची प्राणज्योत मावळली. खरचं महात्मा गांधीजींचे जीवन कार्य खुप चांगले होते. मला त्यांच्या जीवनकार्यातून असे स्पष्ट होतांना दिसते की ते खुप अहिंसावादी व सत्यवादी व्यक्ती व महान पुरुष होते.

महात्मा गांधी नावाचा एक माणुस भूतलावर होऊन गेला. यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणार नाही, अशा आशयाचे वक्तव्य ऑईनस्टॉईनने केले होते. त्याचा प्रत्यय महात्मा गांधींनी समजुन घेताना पुन:पुन: येत राहतो. जस जसा काळ निघुन जात आहे तस तसा महात्मा गांधींचे विचार अधिकच उजळुन निघत आहेत आणि माणुसकीची मशाल हातात घेतलेला हा महात्मा काळाच्याही पुढे कसा होता, हे सिद्ध होत आहे.

सुसंवाद, शांतता आणि अहिंसेच्या या मार्गाचा अवलंब करणारे महात्मा गांधी होत. गांधी मुलत: धार्मिक व्यक्ती होते. हिंदू धर्म त्यांना अत्यंत प्रिय होता. हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था, धार्मिक सन समारंभ, विवाह संस्कार, आहार-विहार, व्रतवैकल्ये, उपवास, पाप-पुण्य, आत्मा, शरीर, रामायण, महाभारत, भगवतगीता, गीतेतील कर्म सिद्धांत अशा अनेक विषयांची चर्चा गांधींनी केली आहे. प्रेम, सत्य, सद्‌गुण, सहिष्णुता, बंधुभाव, भूतदया अशा अनेक मुल्यांवर गांधींनी वेळोवेळी भाषणे केली आहेत. त्यातुन गांधींचा धर्मविषयक दृष्टिकोन व्यक्त होतो. मात्र त्यांचे वर्णन व वर्तन व्यवहार काहीसे गुढ होते. त्यामुळे गांधी हिंदुत्ववादी गांधी होते. गांधीचा धर्मविचार हा व्यावहारिक, वास्तववादी होता. म्हणजे धर्मातुन समाजाचे दैनंदिन प्रश्न सुटायला हवे. धर्माच्या बाबतीत गांधी बुद्धीवादी विवेकी होते. ते म्हणतात, ''धर्माचे कोणतेही तत्त्व विवेकाच्या विरोधात जाणारे असेल किंवा नैतिकतेशी संघर्ष करणारे असेन, तर या तत्त्वाला मी नकार देईन.'' धर्म नैतिकतेला अव्हेरु शकत नाही. तर सर्व प्रकारचा स्वार्थ, संकुचित मानसिकता ही अनैतिक असते. गांधीजींचा दिवस हा प्रार्थनेने सुरु होत असे. आश्रमाच्या दिनचर्येत प्रार्थनेला स्थान हाते. मात्र या प्रार्थना वेगवेगळ्या धर्मांच्या असाव्या यावर गांधींचा कटाक्ष होता. गांधींच्या धार्मिकतेचे वैशिष्ट्य असे होत की, वर्णाश्रम धर्माचे तत्त्व कायम ठेवुन सामाजिक समता, रोटी-बेटी व्यवहार, अस्पृश्यता निवारण, हरिजन उद्धार जातीविषमतेचे उच्चाटन ही कार्ये त्यांनी हाती घेतली. व त्यांनी या तत्त्वांचा प्रचार-प्रसार ही खुप केला. कारण अधर्माचा उच्छेद, न्याय धर्माची संस्थापना या त्यांच्या प्रेरणा होत्या. कृष्णाचा कर्मयोग आणि बुद्धाची अहिंसा यांच्यात महात्मा गांधी हे समन्वय मानत होते.

गांधीजींच्या समतेच्या विचारात स्त्री-पुरुष समानतेला मान्यता होती. त्यावर खास भर होता. प्राचीन ऋषींनी स्त्रीयांचा बहुमान केला होता. याकडे त्यांनी लक्ष वेधले. स्त्री-पुरुषांमधील नैसर्गिक भेद, श्रेष्ठ, कनिष्ठता देर्शवत नाही. तर कर्तव्यामधील वेगळेपण व्यक्त करतात. स्त्रियांना त्यांचे सांगणे असे आहे की, गुलामगीरीवृत्ती सोडा पुरुषांबरोबर काम करुन मानव विकासाला हातभार लावा. विशेषत: 'अहिंसा' प्रस्थापित करण्यात स्त्रीयांचे मोठे योगदान करु शकतात. कारण त्यांच्या ठिकाणी अमर्याद प्रेम देण्याची क्षमता असते. त्यागाच्या कष्ट सहन करण्याच्या आदर्शातुन त्या पुरुषांना योग्य मार्गावर आणू शकतात. स्त्रियांमधील अज्ञान, निरक्षरता घालवण्यासाठी आणि विधवांच्या पुनर्विवाहाच्या प्रचारासाठी व बालविवाह प्रथेसाठी महात्मा गांधींनी प्रयत्न केले. अशा रीतीने गांधी समाज क्रांतीकारक होते. समाज आमुलाग्र बदलने व ती आदर्शप्राप्त पोहोचवणे हे त्यांचे अवलंब गांधीजींनी केला नाही.

गांधीजींच्या धार्मिक-सामाजिक विचारांचे एक वैशिष्ट्यपूर्ण अंग म्हणजे त्यांनी रचनात्मक कार्याचे मोहोळ उठवले. सांप्रदायिक ऐक्य, अस्पृश्यता निवारण, दारुबंदी, ग्रामोद्योगांचा विकास, मूलभूत शिक्षण, स्त्रियांचा उद्धार, आर्थिक समानता असे कार्यक्रम त्यांनी दिले. देशाच्या विकासाची प्रक्रिया सांप्रदायिक सद्भाव एकमेकांना जोडून असावा, असा संदेश त्यांनी दिला. गांधीजींचे अहिंसा व सत्याविषयक तत्त्वज्ञान सत्याग्रह विषयक गांधींचे विचार इतके मूलभूत असाधारण होते की, जावडेकरांनी सत्याग्रही क्रांतीशास्त्र असे त्याचे नामाभिधान केले. जगभर गांधीजींच्या संकल्पनांचा उद्घोष झाला. आजही त्यांची युगानकूलता आहे. सत्य, अहिंसा हे शब्द एकमेकांना जोडून वापरले जातात. इतके ते अन्योन्य संबंधीत आहेत. सत्य आणि अहिंसा हा आंतर्मनातील आवाज आहे, हे त्यांना टॉलस्टायकडून कळले. गांधीजींच्या अहिंसाविषयक विचारांवर टॉलस्टायचा प्रभाव होता. सत्याचे परिपक्व फळ म्हणजे अहिंसा, असेही गांधी म्हणतात. अहिंसा शब्दप्रयोग भारतासाठी अपरिचित नाही. वेद, उपनिषद, गीता या ग्रंथांमध्ये अहिंसाचा पुरस्कार असला तरी गौतम बुद्ध, महावीर जैन, सम्राट अशोक यांनी त्याचा स्वीकार केला.

ग्रामीण विकास आणि गांधी विचार

भारतासारख्या खंडप्राय व विविधतेने नटलेल्या राष्ट्राचे पितृत्व लिलया पेलवणारे महात्मा गांधी हे केवळ एक राजकीय विचारवंतच नव्हते, तर ते महान सामाजिक, आर्थिक व धार्मिक मानवतावादी सुधारक होते. महात्मा गांधी संपूर्ण मानवी समाजाचे दृष्टे मार्गदर्शक व काळजीवाहक होते. म्हणुनच त्यांनी दक्षिण आफ्रिकेच्या यशस्वी सत्याग्रही लढ्यानंतर भारतासाठी केवळ स्वातंत्र्यच नाहीतर स्वराज्याचे स्वप्न पाहिले. 'हिंद-स्वराज्य' या छोट्या पुस्तिकेत त्यांनी आपल्या देशासाठी आदर्शाचे चित्र रेखाटले आहे.

महात्मा गांधीजींना भारतीय समाज हा शोषणमुक्त निर्भयी, स्वावलंबी बनवण्याची तळमळ होती. या तळमळीतुनच त्यांनी खेड्यांचा विकास हा राष्ट्राचा विकास हे सूत्र निर्माण केले होते. त्यासाठी त्यांनी ग्रामस्वराज्यगड ही संकल्पना मांडली आहे. ग्रामस्वराज्यात गांधीजींनी ग्रामीण मूल्यव्यवस्थेचा कायापालट करण्याविषयी आपले विचार मांडले आहेत. ग्रामीण विकास व ग्रामस्वराज्यगड या संकल्पना समान अर्थानेच विचारात घेतल्या जात असल्या तरी त्यामध्ये मूलभूत फरक आहे.

विकास हा मानवी जीवनाच्या परिवर्तनाची बहुमुखी प्रक्रिया आहे. समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था व राजकीय व्यवस्थेतील दोष निवारण व आधुनिकीकरणाच्या विकासात समावेश होतो. महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्यामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय, शिक्षण व कृषी व्यवस्थेत दोष निर्माण होणार नाहीत. याची पुरेपूर काळजी घेतली जाते. आधुनिकीकरणाचा ग्रामस्वराज्यमध्ये पुरस्कार केला जात असला तरी पाश्चात्याचे आधुनिकीकरणाच्या नावाखाली अधानुकरन केले जात नाही. 'हिंद स्वराज्य ते ग्रामस्वराज्य' ही गांधी विचारांचा केंद्रबिंदू होता. 'स्वराज्य' हा शब्द वैदिक परिभाषेतील एक शब्द आहे. वेदात सूर्याला 'स्वराट' म्हटले आहे. तो स्वयंप्रकाशी आहे. चंद्राला 'अन्यराज' म्हटले आहे. तो पर-प्रकाशी आहे. ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून गांधींनी क्रांती अहिंसेसाठी असल्याने यासाठी हिंसेचा आधार हा निषिद्ध होता. ग्रामीण समाज शोषण, अज्ञान, अंधश्रद्धा, निरक्षरता, कर्जबाजारीपना, दारिद्र्य, जातीयता, अस्पृश्यता, दैववाद, कृषी क्षेत्रातील समस्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्वच्छता व आरोग्याचा अभाव, शुद्ध हवा, अन्न पाणी यांचा अभाव, संयुक्त कुटुंबाचे विघटन, हुंडा पद्धती, व्यसनधीनता, स्थानिक राजकारन, परावलंबन या समस्यांनी व आधुनिक भारत व जगाने ग्रासलेल्या धर्मांधता व दहशतवादाने सुद्धा ग्रस्त झालेला आहे. अशावेळी ग्रामीण

विकासासाठी गांधीजींच्या ग्रामस्वराज्यविषयक विचारांची प्रासंगिकता पाहणे इष्ट ठरते.

नव्या भारताचा जन्म झाला. त्यावेळी या देशाच्या महात्म्याने ऐक हाक दिली. 'खेड्याकडे चला' खेडे हा या देशाचा आत्मा होता, आत्मा आहे आणि आत्मा राहणार. ज्या सुख-सुविधा, समृद्धता शहरांमध्ये आहेत, त्या प्रत्येक सोयी-सुविधांना खेड्यातला माणुस पात्र असून व असतांनाही ६० वर्षानंतर आमच्या या खेड्यांतल्या माणसाला निरोगी जीवन, सुखी-समृद्ध जीवनाची गुरुकुल्ली आम्ही आज अखेर देऊ शकलो नाही. त्यामुळे आज गांधीजींचे विचार वेगवेगळ्या माध्यमातून पुढे येणे आवश्यक आहे. भारताचे वर्णन कधीही व नेहमी 'सुजलाम् सुफलाम' असे केले जाते.

भारताचे खरे दर्शन खेड्यातच घडते असे म्हटले आहे. ॲग्रीकल्चर ही खरी कल्चर आहे. भारतीय सण आणि उत्सव सुद्धा ग्रामिकांच्या शेती व्यवसायाला केंद्रस्थानी मानुन तयार झालेले आहेत. भारताच्या आत्मा खेड्यातच वास करतो. कारण सर्व जगाचा पोशिंदा त्या खेड्यातच राहतो. हजारो आक्रमणे झाली; पण खेड्याची ग्रामव्यवस्था कोलमडली नाही. कारण ती निकोप होती. ग्रीक नगर राज्याप्रमाणे ही ग्रामव्यवस्था स्वयंपूर्ण होती. म्हणूनच परकीय आक्रमने तिला नष्ट करु शकले नाहीत. याची जाणीव महात्मा गांधींना होती. म्हणून त्यांनी 'खेड्याकडे चला' हा मंत्र दिला. यातच गांधीजींचे महात्मेपण दडलेले आहे. ग्राम स्वयंपूर्ण झाल्याशिवाय भारताचा विकास नाही. कारण महात्मा गांधींनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली. भारतीय ग्रामव्यवस्था बळकट झाली तरच सक्षम व बलवान भारत निर्माण होईल. याची गांधींना संशोधनाच्या पातळीवरच जणू दखल घेतली होती. त्यांचे हे ग्राम स्वराज्यांचे द्रष्टेपण व एकूणच विचारांचे सामर्थ्य पाहून आईन स्टाईन, मार्टिन ल्युथर किंग, रवींद्रनाथ टागोर, नेल्सन मंडेला या सर्वांनी महात्मा गांधींना आदर्श मानले आहे. महात्मा गांधींजी भारताच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीविषयचे जाणकार होते. म्हणून त्यांनी अर्थशास्त्रज्ञांना विनंती केली. पश्चिमेकडील अर्थशास्त्राचा विसर पडू द्या. आपले पूर्वग्रह नष्ट करा. आपले पूर्वग्रह नष्ट करा. खेड्यात जाऊन तेथील परिस्थितीचे अवलोकन करा. लोकजीवनाच्या गुणदोषांचा शोध घ्या. आणि एक ठोस आणि मजबूत आधारावर आधारित स्वतंत्र आणि लाभकारक अर्थशास्त्राची रचना करा जे भारताच्या परिस्थितीस अनुकूल असावे आणि देशाच्या सामान्य जनतेचा उद्धार करणारे असावे.

अहिंसा ही राजकीय विचारप्रणाली म्हणून गांधीजींनी जगासमोर ठेवली. सत्याग्रहातुन क्रांती हा गांधीजींच्या नावीन्यपूर्ण विचार ठरला. असहकार, संप, हरताळ, बहिष्कार, कायदेभंग, उपोषण, हिजरत असे शांततामय सत्याग्रहाचे तंत्र गांधींनी देशालाच नव्हे तर जागाला दिले. आज या तंत्राचा वापर विकृत स्वरुपात होत आहे. त्यामुळे या मागचं तत्त्वज्ञान ठिसुळ आहे की त्याचे उपयोजन करणार परिपक्त नाही, असा संभ्रम निर्माण होऊ शकतो. अधिकाराऐवजी गांधीजींनी कर्तव्याला महत्त्व दिले. स्त्री-पुरुष समानतेसह सर्व प्रकारच्या समतेचा त्यांनी आग्रह धरला. मी अशा महान महात्मा गांधींना वंदन करते.

■ ■ ■

ऐसे जिएं कि जैसे आपको कल मरना है और
सिखे ऐसे जैसे आपको हमेशा जीवित रहना है।
. **- म. गांधी**

बॅरिस्टर तर झालो; पण पुढे काय?

अमोल डकले
बी.एस्सी. द्वितीय वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ज्या कामासाठी बॅरिस्टर होण्यासाठी मी विलायतेला गेलो त्याचे मी काय केले. याचे वर्णन आतापर्यंत तहकूब केले आहे. आता यासंबंधी थोडेबहुत लिहिण्याची वेळ आली.

बॅरिस्टर व्हावयास दोन गोष्टींची जरुर होती. एक 'टर्म' भरणे म्हणजे सत्रे सांभाळणे. वर्षाची चार सत्रे. अशा तऱ्हेने बारा भरायची. दुसरी गोष्ट कायद्याची परीक्षा देणे. सत्रे भरणे याचा अर्थ 'जेवण जेवणे' म्हणजे दर एका सत्रात सुमारे चोवीस जेवणे असत. त्यापैकी सहाच जेवणे. जेवण जेवायचे म्हणजे खाल्लेच पाहिजे असा काही नियम नाही; पण नेमलेल्या वेळी हजर राहणे व जेवण पुरे होण्याचा वेळ होईपर्यंत बसून राहणे. साधारणपणे सर्वजण खातपीतच. जेवणात चांगली-चांगली पक्वान्ने असायची आणि पिण्यासाठी उत्तम गणली जाणारी दारु असायची. त्याचे पैसे तर दिलेच पाहिजेत; ते अडिच ते साडेतीन शिंलींग असत; म्हणजे दोन-तीन रुपयांचा खर्च झाला. तिकडे ही किंमत बरी अल्प म्हटली पाहिजे. कारण बाहेरच्या भोजन गृहामध्ये अशा थाटाचे जेवण घेणाऱ्याला फक्त दारुचेच जवळ-जवळ तितके पैसे पडतील. जेवणाच्या खर्चापेक्षाही दारु पिणाऱ्याला दारुचा खर्च अधिक येतो, ही गोष्ट आम्हा हिंदवासीयांना आपण 'सुधारलेले' नसू तर आश्चर्यकारक वाटेल. मला तर विलायतेला गेल्यावर ते पाहून मोठा धक्का बसला. दारु पिण्यासाठी इतक्या पैशाची खराबी करायला लोकांची हिंमत कशी होते याचे मला गुढ पडले. मागाहून समजू लागले! प्रथम-प्रथम मी काहीच खात नसे. मला चालण्यासारखे तेथे रोटी, उकडलेले बटाटे आणि कोबी एवढेच असे. सुरवातीला त्या वस्तू आवडत नसत. म्हणून खात नसे.मागाहून केव्हातरी त्यातही रुची लागू लागली. इतर पदार्थ मिळविण्याची शक्ती मझ्यामध्ये आली होती.

विद्यार्थ्यांसाठी एक तऱ्हेने खाणे आणि बेंचरांसाठी (विद्या मंदीरातील मोठे लोक) निराळे श्रीमंती जेवण अशी व्यवस्था असे. माझ्याबरोबर काही पारशी विद्यार्थी होते. तेही अन्नाहारी बनले होते. आम्ही उभयतांनी अन्नहाराच्या प्रचाराच्या दृष्टीने बेंचरांच्या खान्यामधून अन्नहाऱ्यांना चालतील अशा पदार्थांची मागणी केली, ती मागणी मंजूर झाली. त्यामुळे आम्हाला बेंचरांच्या टेबलावरुन फळ-फळावळ व जादा भाज्या मिळू लागल्या.

दारु तर मला चालत नव्हती. चौघांना मिळून दारुच्या दोन बाटल्या मिळत, त्यामुळे माझी मागणी अनेक चौकड्यांकडून होत असे. मी दारु प्याला नाही म्हणजे बाकीच्या तिघांनाच दोन बाटल्या 'उडवायला' मिळत ना! शिवाय या सत्रामध्ये एक महारात्र (ग्रँड नाइट) होत असे. त्या दिवसी 'पोर्ट' व 'शेरी' खरीज शॅम्पेन दारुही मिळत असे. शॅम्पेनची लज्जत काही औरच मानली जाते. त्यामुळे माझी किंमत विशेषच वाढे आणि त्या रात्री हजर राहण्याबद्दल मला आग्रहही होत असे.

या खाण्या-पिण्यापासून बॅरिस्टरला काय लाभ होतो, ते मला त्यावेळी समजले नाही की त्यानंतरही समजलेले नाही. एक काळ असा होता खरा, की तेव्हा या जेवणांना थोडेच विद्यार्थी असत आणि त्यांच्यामध्ये व बेंचरामध्ये बोलणे-चालणे होई व भाषणेही होत. त्यातुन ते

व्यवहारज्ञान मिळवू शकत. बरं वाईट; पण एक प्रकारचा शिष्टाचार शिकत आणि भाषण करण्याची शक्ती वाढवित. माझ्या वेळी तर हे सर्व अशक्य होते. बेंचर दूर अस्पृश्यासारखे बसत असत. या जुन्या रिवाजामध्ये मागाहून काही अर्थ राहिला नाही, तरिही तो प्राचीनता प्रेमीधिम्या इंग्लंडमध्ये राहून गेला.

कायद्याचा अभ्यास सोपा होता. बॅरिस्टरांना विनोदाने 'डिनर (भोजन भाऊ) बॅरिस्टरच' म्हणत. सर्वांना समजत होते की परीक्षेची किंमत तितकीच. माझ्या वेळी दोन दोन परीक्षा झाल्या होत्या, रोमन लॉ व इंग्लंडचा कायदा. दोन हप्त्यांनी द्यावयाच्या या परीक्षांची पुस्तके नेमलेली होती. परंतु ती क्वचितच कोणी वाचीत. वेमन लॉसाठी छोटी टिपणे लिहिलेली असत, ती पंधरा दिवसात वाचून पास होणारा मी पहिला आहे. प्रश्न सोपे, परिक्षक उदार. रोमन लॉच्या परीक्षेत ९५ ते ९९ टक्के उमेदवार पास होते आणि शेवटच्या परीक्षेत ७५ टक्के किंवा त्याहून जास्त, म्हणजे नापास होण्याची भिती फारच थोडी. शिवाय परीक्षा वर्षातून एकदाच नाही तर चारदा व्हायची. इतक्या सोयीची परीक्षा कोणालाही जड वाटणे शक्यच नाही.

पण मी तीला कठीण करुन घेतली. मला वाटले, की मुळ पुस्तके वाचुन काढली पाहिजेत. न वाचने म्हणजे फसवणुक होय, असे मला वाटले. त्यामुळे मी मुळ पुस्तके खरेदी करुन खूप खर्चात आलो. रोमन लॉ लॅटीनमधून वाचून काढण्याचा निश्चय केला. विलायतेतील मॅट्रिक्युलेशन साठी मी लॅटीन शिकलो होतो. त्याचा या कामी उपयोग झाला. हे वाचन फुकट गेले नाही. दक्षिण आफ्रिकेत रोमन डच लॉ प्रमाणभूत मानला जातो. तो समजवून घेण्याच्या कामी जस्टिनियनचे वाचन मला फार उपयोगी पडले.

इंग्लडच्या कायद्याचे वाचन चांगले मेहनत घेऊन मी नऊ महिन्यात पूर्ण करु शकलो; कारण, की ब्रमचे 'कॉमन लॉ चे बडे' पण सुरस पुस्तक वाचण्यात किती तरी वेळ गेला. स्नेलच्या 'इक्विटी' मध्ये गोडी वाटली. पण समजता समजता नाकी नऊ आले. व्हाईट व ट्युडरच्या मुख्य मुकदम्यांपेकी जे नेमलेले होते ते वाचण्याची मला मौज वाटली व ते वाचण्यापासून ज्ञानही मिळाले. विलियम्स आणि एडवर्डसचे स्थावर मिळकतीवरील पुस्तक आणि गुडीपच जंगम मिळकतीवरील पुस्तक मी रसपूर्वक वाचू शकतो. विलयम्सचे पुस्तक तर मला कांदबरीइतके मनोरंजक वाटले. ते वाचतांना कंटाळा वाटलाच नाही. कायद्याच्या पुस्तकांपैकी तितक्याच आवडीने असे हिंदुस्थानात आल्यावर मी मेनचे 'हिंदू लॉ' चे पुस्तक वाचू शकलो; पण हिंदुस्थानच्या कायद्याचा उल्लेख येथे करीत नाही.

परीक्षा पास केली. १८९१ मध्ये जूनच्या १० तारखेला मला बॅरिस्टरचा किताब मिळाला. ११ तारखेला इंग्लडच्या हायकोर्टात अडिच शिंलींग भरुन माझे नाव नोंदविले. १२ जूनला हिंदुस्थानला परत येण्यासाठी निघालो.

पण माझ्या निराशेला व भितीला सीमा नव्हती. कायदे वाचले खरे; पण वकिली करता येईल असे मला काही एक येऊ लागलेले नाही असे वाटे.

■ ■ ■

आंख के बदले आंख पुरे विश्वको अंधा बना देगी ।
- म. गांधी

महात्मा गांधीचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान

राऊत पूजा बबन
बी.ए. द्वितीय वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

इ. स. १८९३ मध्ये त्यांना दादा अब्दुला यांच्या व्यापारी कंपनीचा खटला चालविण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत जावे लागले.

दक्षिण आफ्रिकेत असतांना त्यांना स्वत:लाही अन्याय-अत्याचारात तोंड द्यावे लागले. त्याचा प्रतिकार करण्यासाठी भारतीय लोकांना संघटित करुन त्यांनी इ. स. १८९४ मध्ये नाताळ इंडियन काँग्रेसची स्थापना केली.

इ. स. १९१५ मध्ये गांधीजी भारतात परत आले आणि त्यांनी सुरुवातीला साबरमती येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली.

एका आदेशान्वये कृष्णवर्णीयांना ओळखपत्र बाळगणे सक्तीचे गेले होते. या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी गांधीजींनी सत्याग्रहाच्या मार्गाने यशस्वी लढा दिला.

इ. स. १९१७ मध्ये बिहारच्या चंपारण्य भागात ब्रिटिश मळे मालकांकडून भारतातील शेतकऱ्यांवर ठरलेल्या दरात पिकविण्याची सक्ती केली जात असे. ही नीळ ठरलेली दरात मळेवाल्यांना विकण्याची सक्ती असल्यामुळे त्यात शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत होते. त्यासाठी गांधीजींनी चंपारण्यात शेतकऱ्यांना सत्याग्रहाच्या मागणीच्या बाबत आंदोलन केले.

इ. स. १९२० मध्ये लोकमान्य टिकांच्या निधनानंतर राष्ट्रीय सभेचे नेतृत्त्व महात्मा गांधीकडे आले.

इ. स. १९२० सालच्या नागपूर येथील अधिवेशनात राष्ट्रीय सभेने असहकाराच्या देशव्यापी चळवळीला पाठिंबा देणारा ठराव संमत केला. असहकार आंदोलनाची सर्व सूत्रे महात्मा गांधीकडे सोपवण्यात आली. असहकाराच्या ठरावान्वये शाळा, महाविद्यालये, विधिमंडळे, न्यायालये यांच्यावर बहिष्कार घालण्याचे ठरवले.

इ. स. १९२४ साली बेळगाव येथे राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

इ. स. १९३० मध्ये सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु झाली. मिठावरील कर व मीठ तयार करण्याची सरकारची मक्तेदारी रद्द करावी अशी गांधीजींनी व्हाइसरॉयकडे मागणी केली. व्हाईस रॉयने ही मागणी धुडकावून लावली.

गांधीजींनी १९३० साली दांडीयात्रा सुरु करुन त्यात सहभाग घेतला.

इ. स. १९४२ मध्ये चले जाव चळवळ सुरु झाली. 'करेंगे या मरेंगे' हा नवा मंत्र गांधीजींनी लोकांना दिला.

३० जानेवारी १९४८ रोजी गोडसे नायक माथेफिरुने चालविलेल्या गोळीला ते बळी पडले.

■ ■ ■

The future depends on what we
do in the present.
- M.K. Gandhi

गांधीजींचा शैक्षणिक विचार

निवृत्ती गाडेकर
बी.ए. द्वितीय वर्ष
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

आधुनिक भारताच्या नवनिर्माणात राजा राम राममोहन रॉय यांच्यापासून ते स्वातंत्र्यविर सावरकर, महात्मा गांधी, राम मनोहर लोहिया, दीनदयाळ उपाध्याय आदी महापुरुषांनी मौलिक योगदान दिले आहे. त्यापैकी महात्मा गांधी यांचे योगदान राष्ट्रजिवनाच्या विविध क्षेत्रात महत्त्वाचे आहे. त्यामळे आपण त्यांना 'राष्ट्रपिता' असे संबोधतो. महात्मा गांधी यांनी 'हिंद स्वराज्य' या ग्रंथामध्ये आधुनिक भारताच्या नवनिर्मितीचा विचार मांडला आहे. राष्ट्रजीवनाच्या विविध क्षेत्रात कृषी, उद्योग आणि शिक्षण या क्षेत्रातील भारतीय दृष्टीकोन त्यांनी प्रामुख्याने मांडला आहे. १९३६ मध्ये लिहलेल्या 'नयी तालीम' हा त्यांचा ग्रंथ शिक्षणाचा मुलभूत विचार म्हणून ही ओळखला जातो. गांधजींचा विचार शिक्षण आणि राष्ट्रजीवन यांना जोडणारा आहे. तसेच व्यक्ती महत्त्वाच्या सकल अंगांना स्पर्श करणारा आहे. मी पेक्षा आम्ही महत्त्वाचे आहे. आपण सर्वांनी मिळून राष्ट्रजीवन बदलवायचे आहे. असा त्यांचा स्वच्छ, सुस्पष्ट आणि पारदर्शी विचार होता.

गांधीजींचा शैक्षणिक दृष्टीकोन

लोकमान्य टिळकांनी त्यांच्या चतु:सूत्रीमध्ये स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि परकीय मालावर बहिष्कार या चार कल्पना मांडल्या होत्या. गांधीजींना टिळकांच्या स्वदेशीचे रुपांतर खादीमध्ये केले. राष्ट्रीय शिक्षणाचे रुपांतर नयी तालीम या संकल्पनेत केली याचा अर्थ असा की गांधीजींना स्वयंभू शिक्षण विचार विकसित करायचा होता. त्यासाठी महात्मा गांधींनी नयी तालीम ही संकल्पना मांडली. मकरंद परांजपे 'डीकॉलनायजिंग हिंद स्वराज्य' या ग्रंथात असे म्हणतात की, गांधीजींना वसाहतवादी शिक्षणाचा विचार बदलवाया होता व त्या ऐवजी राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करायचा होता. असा राष्ट्रीय शिक्षणविचार विकसित करतांना त्यांनी भारतातील तत्कालीन परिस्थिती, इंग्रजांचे धोरण आणि भारतीय शिक्षण संस्था पुढील आव्हाने या सर्व बाबींचा विचार करुन नवा विचार विकसित केला. काळाच्या प्रवाहात विचार करता असे दिसते की, महात्मा गांधींना आपल्या 'नयी तालीम' या शिक्षण विचारामध्ये स्वावलंबन, आत्मसन्मान आणि श्रमप्रतिष्ठा ही तीन मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न केला. गांधीजींना प्रत्येक विद्यार्थ्यांस स्वावलंबी हाच आमचा निर्धार आहे आणि आम्हीच आमच्या यशाचे शिल्पकार आहोत. अशा व्यक्ती महत्त्वाच्या अस्मितेमधील स्वच्या जागरणाचा विचार आणि या स्वचे रुपांतर समाज व राष्ट्र जीवनामध्ये करण्याचा प्रयत्न गांधीजींनी केला.

बुद्धी, मन आणि हात

गांधीजींचा शिक्षण विचार मन, मस्तिक आणि कर म्हणजेच मन, मेंदू आणि हात यांना जोडणारा होता. माणसाच्या बुद्धीमत्तेचा संपूर्ण विकास व्हावा, त्याच्या हाती निर्मितीचे सामर्थ्य श्रमप्रतिष्ठा प्राप्त व्हावी. त्यांचे अंतकरण स्वच्छ व्हावे, त्यांच्या हृदयातून येणारा हुंकार आणि आतला आवाज हा त्याला स्वाभिमान आणि अस्मिता प्रदान करणारा असावा. गांधीजींना वाटत होते. त्याच्या मते हाताने श्रमदान करावे, मनाने समाजातील दुर्बलांचा विचार करावा आणि बुद्धीच्या विवेकाने संबंध राष्ट्र जीवन उजळून टाकावे. असे स्वावलंबी शिक्षण ओजस्वी शिक्षण गाधीजींना अभिप्रेत

होते. त्याच्या शिक्षणामुळे व्यक्ती आणि सभोवतीचा निसर्ग, शिक्षण, संस्था आणि समाज, शिक्षण आणि राष्ट्रजीवन यांना एकत्रित जोडणे शक्य होणार होता. त्यामुळे गाधीजींना मूल्याधारित शिक्षणावर भर दिला. शिक्षणाचे आध्यात्मिकरण व्हावे, अशी त्यांची भूमिका होती. भारतीय प्रश्नांना भारतीय उत्तरे शोधण्याचा प्रयत्न 'नयी तालीम' या संकल्पनेतुन केला आहे.

स्वानुभवातुन शिक्षण

शिक्षण ही गुरु आणि शिष्य यांच्यातील आंतर क्रिया असते. त्याच्यातील तो श्रोतृसंवाद असतो. गांधीजी शाळा व महाविद्यालयांना 'टेम्पल ऑफ नॉलेज' म्हणजेच ज्ञान मंदिर मानत. ज्ञानाचे ग्रहण करतांना या मंदिराचे पावित्र्य शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक घटकाने पाळले पाहिजेत. प्रत्येक व्यक्तीने त्यांचे पावित्र्य जपले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. गांधींजी असे म्हणत की शिक्षण हे स्वानुभवावर आधारलेले असले पाहिजे. त्यामुळे त्यांचाा शिक्षण विचार हा कृती विचारांवर आधारित आहे. माओत्सेत्सुंग प्रत्येक व्यक्तीने शेतात काम करावे, घाम गाळावा आणि काहीतरी निर्मितीचे कार्य करावे, असा आग्रह धरत असत; याप्रमाणे राष्ट्रमध्ये जन्मलेल्या प्रत्येक तरुणाने राष्ट्र निर्मितीत महत्त्वाचा वाटा उचलावा, असा गांधीजींचा दृष्टीकोन होता. प्राथमिक शाळापासून महाविद्यालये आणि विद्यापीठापर्यंत भारतीय मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश त्यांनी आपल्या शिक्षणाद्वारे दिलेला असतो. ज्ञान, कर्म आणि उपासना या तीन प्रक्रियातून शिक्षणाला उंची देण्याचा त्यांचा प्रयत्न राहीला. उच्च कोटीचे दर्जेदार ज्ञान कौशल्य विद्यार्थ्यांनी ग्रहण करावे. तसेच त्याअनुसरुन चांगले कार्य करावे आणि उपासना आणि ध्यान धारणेतून नैतिक मूल्यांची जपणूक करावी, असे त्यांना वाटते. भारतीय शिक्षणातील सर्वात मोठी समस्यांची समस्या कोणती असेल तर नैतिक आणि अध्यात्मिक शिक्षण ही आहे. हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे निती तत्त्वावर आधारलेला समाज आणि प्रखर देशभक्ती आणि त्याग, सेवा, समर्पण या मूल्यावर आधारलेल्या राष्ट्र उभे करण्यासाठी त्यांनी शिक्षणाचा विचार मांडला. शिक्षण हे लोकशाही मूल्यांची जपणूक करणारे साधन आहे, हे लक्षात घेऊन गांधींनी नव्या शिक्षणाचा विचार मांडला होता.

■ ■ ■

महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

रुपाली सुधाकर पवार
बी.ए. द्वितीय वर्ष
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगार (रंगारी)

भारत हा खेड्यांचा आणि कृषीप्रधान देश आहे. या खेड्यातील अर्थव्यवस्थेचा 'शेती' हा मुख्य आधार आहे.भारतीय स्वातंत्र्यानंतर आजपर्यंतच्या ग्रामीण आर्थिक जीवनाचा अभ्यास केला असता स्पष्ट होते की, आज ग्रामीण भागातील आर्थिक जीवन अत्यंक विस्कळीत झाले आहे. कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्यांची आत्महत्या या शिर्षकाखाली वर्तमान पत्राहून नेहमीच बातम्या वाचावयास मिळतात. कर्जाला कंटाळून 'शेतकऱ्याची आत्महत्या' ही बाब आता नित्याचीच झालेली आहे. अगदी प्राचीन काळातील ते स्वातंत्र्यापर्यंत आणि त्यानंतरही काळी काळ आपल्याला 'कर्जबाजारीपणाला' कंटाळून शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचे दिसून येते नाही. मग स्वातंत्र्यानंतरच्या या काही वर्षातच येथील शेतकरी आत्महत्या करु लागला? त्याच्या जीवनात असा कोणता बदल झाला, की त्याला आत्महत्येशिवाय दुसरा पर्यायच उरला नाही? याला आत्महत्येपासून रोखण्यासाठी काही उपाय शोधता येतील काय? या विचार आम्हाला करावा लागणार आहे. प्राचीन काळापासून येथील शेती पंरपरेचा अभ्यास केला असता स्पष्ट दिसून येते की, या काळातील राज्य प्रमुखांनी शेतकऱ्यांविषयी चांगले धोरण अवलंबिले होते. मध्ययुगीन कालखंडात छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतकऱ्याविषयीचे धोरण तर उल्लेखनीय आहे. या काळात सगळीकडे सरंजामशाहीव्यवस्था असताना आपल्या राज्यव्यवस्थेत शिवाजी महाराजांनी जमिनीची मोजणी करुन शेतीच्या प्रतवारीनुसार सारा ठरवला. खेड्यांची विस्कटलेली आर्थिक घडी व्यवस्थित बसवायची असेल, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवयाच्या असतील तर, आपणास महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या ग्रामीण आर्थिक विचारांची कास धरावी लागेल.

महात्मा गांधीजींनी स्वावलंबन व आत्मनिर्भरतेवर भर दिला. प्रत्येक व्यक्ती स्वावलंबी व आत्मनिर्भर असावी असे गांधीजी म्हणत. माणसाने आपल्या जीवनात आवश्यक गरजा भागल्या की पूर्ण संतोष मानावा आणि नेहमी स्वावलंबी असावे, हा गांधीजींच्या कार्यातील एक भाग होता.

गांधीजी म्हणत गावोगावी लोकांचे किंवा पंचायतीचे राज्य असेल. पंचायतीपाशी पूर्ण शक्ती आणि सत्ता असेल. याचा अर्थ असा की, प्रत्येक गावाला स्वत:च्या पायावर उभे राहावे लागेल. आपल्या गरजा स्वत:च भागवून घ्याव्या लागतील. म्हणजेच त्यांना स्वत:च पूर्ण कारभार चालविण्यात येईल. गांधीजी नेहमी म्हणत, साध्या प्रामाणिक जीवनात सुख असल्यामुळे अर्थोत्पादन हे जरुरीपेक्षा जास्त झाले तर ज्याच्या जवळ संपत्ती जमेल ती जनतेची आहे व ते जनतेकरिता खर्च केली पाहिजे. निष्कृष्ट जीवन हा अर्थातच जीवनहेतू नसावा. पण दुसऱ्याचे शोषण करुन आपण अर्थ संपादनामागे लागावे हाही हेतू नसावा. महात्मा गांधींनी खेड्याच्या पुनरुत्थानावर भर दिला. भारतातील खेडी भारतीय शहरांच्या सर्व गरजा भागवित आहेत. मात्र खेडी ऱ्हास पावत आहेत. ही त्यांची खंत होती. लोक तांत्रिक स्वराज्यात शेतकऱ्यांच्या हाती राजकीयच नव्हे, तर सर्व प्रकारची सत्ता राहील यात मला शंका नाही. त्यांना त्यांचे योग्य स्थान मिळावे आणि त्यांच्या मनाला देशाचा अग्रमान असावा. खेड्यांनी जगायला तर हवेच, त्यांनी शक्तीशाली आणि समृद्धी व्हावे असे आम्हाला वाटत असेल तर

आमची संपूर्ण विचाराची सरणी ग्रामाभिमुखच असावी लागेल असे महात्मा गांधीजींचे मत होते.

जगातील कोणत्याही अर्थतज्ज्ञाप्रमाणे गांधीजींनी आपले वेगळे असे काही आर्थिक विचार मांडले नाहीत. आपण फार मोठे अर्थतज्ज्ञ नाहीत असा दांडोराही त्यांनी कधी पिटविला नाही. एवढेच मात्र निश्चित की, त्यांचे अर्थकारण हे मानवतावादावर आधारलेले होते. अर्थकारणात त्यांनी स्वाश्रयी आणि स्वावलंबी जीवनावर भर दिला होता. त्यांच्या चळवळीत विचारात आपणास अधिक स्थैर्य दिसून येते. महात्मा गांधींनी आर्थिक विकास यावर खूप मोठा प्रभाव टाकलेला आहे.

महात्मा गांधीजींवर 'टॉलस्टॉय' आणि 'जॉन रास्किन' यांच्या विचारांचा प्रभाव होता. 'अनटू धिस लास्ट' या रस्किनच्या पुस्तकाने तर त्यांचे पूर्ण जीवनच बदलून गेले. रस्किनने आपल्या या पुस्तकातून मांडलेली सर्वांच्या कल्याणासाठी उपयुक्त अशी अर्थव्यवस्था महात्मा गांधींना आवडली. त्यांनी जे काही आर्थिक विचारांचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. गांधीजी म्हणत की, जगाची अर्थव्यवस्था अशी असावी की, कोणालाही अन्न व वस्त्राची कमी पडू नये. प्रत्येकाला ते प्राप्त करण्या इतपत काम मिळावे. प्राथमिक जीवनोपयोगी जिन्नसा निर्माण करण्याची साधने जनतेच्या नियंत्रणात असतील तर शक्य होईल. गांधीजी म्हणत की, 'मी अर्थशास्त्राला नीती शास्त्राहून वेगळे मानीत नाही. वैयक्तिक किंवा राष्ट्रीय नीती मत्तेच्या चिंध्या उडविणारे अर्थशास्त्र पापी आहे' मी म्हणेन. जे मजुरांचा न्याय – न्याय मजुरी न देता त्यांचे शोषण करतात, अशांनी बनविलेल्या वस्तूचा उपयोग करणे पाप ठरेल. अशा खेट्या अर्थशास्त्राला कवटाळून आम्ही फक्त मृत्यूला आमंत्रण देऊ शकतो. खरे अर्थशास्त्र तर न्यायपूर्ण राहील आणि सर्वांचे समाज कल्याण करण्याचा प्रयत्न करणारे असेल. सर्वांचा सामाजिक दर्जा सारखाच असावा. ही गांधीजींची भूमिका होती. आर्थिक समतेची स्थापना हा गांधीजींच्या अर्थशास्त्रीय चिंतनाचा गाभा होता. गांधीजींना तळागाळातल्या सर्व सामान्य माणसांच्या विकासावर भर दिला. न्हावी आणि वकिलाच्या श्रमाचे मूल्य सारखेच असावे असे गांधीजी म्हणत.

महात्मा गांधीजी म्हणतात, आर्थिक समता ही अहिंसक स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे. आर्थिक समतेसाठी प्रयत्न करणे म्हणजे भांडवल व श्रम यामधील सनातन संघर्ष नष्ट करणे. राष्ट्रीय संपत्तीचा गाभा ज्यांच्या मुठीत एकवटला आहे. श्रीमंत लोक व उपाशी राहणारे लोक यांच्यातील विशाल दरी जोवर कायम आहे तो पर्यंत अहिंसात्मक राजसत्ता स्थापन होणार नाही. अशा अनेक प्रकारची उदाहरणे गांधींनी दिली आहेत.

गांधीजींची ग्रामस्वराज्याची कल्पना

महात्मा गांधींनी खेड्यांच्या स्वयंपूर्णतेवर भर दिलेला आहे. खेडे हे शक्यतो स्वयंपूर्ण स्वायत्त राज्य असावे. अशी त्यांची धारणा होती. आज मात्र खेड्यांची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे. खेड्यांना आर्थिक बकालपणा आलेला आहे. त्यामुळे खेड्यांचा ऱ्हास आणि नाश होत आहे. बरेच लोक हे खेड्यातून शहरात जात आहे. खेड्यातील माणूस आर्थिक नग्न झालेला आहे. शेतकरी या सर्व चक्रात अडकला असून त्याला यातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नसल्यामुळे आत्महत्या करत आहे.

गांधीजींची ग्राम स्वराज्याची कल्पना अशी आहे की, ते एक संपूर्ण लोकसत्ताक राज्य आहे. आपल्या अत्यंत आवश्यक गरजांच्या बाबतीत ते नाही आणि तरी इतर ज्या बाबतीत त्यांनी शेतकऱ्यांवर अवलंबून असणे हे आवश्यकच असेल अशा बाबतीत ते परस्परावलंबी आहेत. महात्मा गांधीजींनी ग्रामस्वराज्याची कल्पना खूप चांगल्या पद्धतीने सांगितलेली आहे.

■ ■ ■

महात्मा गांधी -ग्रामजीवन

शुभांगी रमेश पवार
बी.ए. द्वितीय वर्ष
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगार (रंगारी)

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधीजींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. महात्मा गांधीजी ही एकमेव व्यक्ती होय की जिचे नाव संपूर्ण भारतात व जगातील सर्व देशांतील जनतेपर्यंत जाऊन पोहचले. णहात्मा गांधी १९१५ मध्ये दक्षिण आफ्रिकेहून भारतात परत आले. भारतातील परिस्थिती जाणून घेण्यासाठी ते देशभर फिरले. भारतीय लोकजीवन संस्कृती आणि समस्या जाणून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भारत हा खेड्यांत वसलेला देश आहे. हे त्यांना आढळून आले. ते म्हणतात, ''माझे असे निश्चित मत बनले आहे की भारत हा काही मोजक्या शहरांत आढळणार नाही. तो सात लाख खेड्यांत आढळेल.''

आज भारतीय खेडी अनेक समस्यांचा सामना करत आहे. ''बेरोजगारी अस्पृश्यता, निरक्षरता, रोगराई या सारख्या समस्यांतून भारतीय खेड्यांना वाचविण्यासाठी गांधीजींनी प्रयत्न करण्याचे ठरविले.'' परकीय गुलामगिरी, आर्थिक शोषण, अन्न-धान्य टंचाई, निसर्गाची कृपा अशा समस्यांमुळे भारतीय खेड्यांची अवस्था गरीब व कमकुवत बनली आहे. महात्मा गांधीजी म्हणतात, ''जर तुम्ही भारतातील खेडी बघितली तर त्यांनी तुमचे डोळे आश्चर्य चकीत होऊन जाणार नाहीत. ती उकिरड्याच्या ढिगाऱ्याखाली शोधावे लागतील. पण ती पूर्वी तशी नव्हती.'' भारताला एकेकाळी सुवर्ण भूमी म्हटले जात होते. म्हणजे येथे खूप सोने निघत होते असे नव्हे. येथे चांगल्या प्रकारचे कापड आणि उत्तम प्रकारचे मसाल्याचे पदार्थ उत्पन्न होते. त्यासाठी इतर देश सोने देत असतात.

पूर्वी भारताला जगात जे गौरवाचे स्थान पुन्हा निर्माण करता येऊ शकते. भारताचे विकासाचे विचार मांडताना गांधजींनी ग्रामविकासाला अधिक महत्त्व दिले. शहरे आपली देखभाल करण्यासाठी तयार आहेत. यामुळे खेड्यांकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. स्वयंपूर्ण आणि स्वयंशासित खेडे गावांचा विचार महात्मा गांधीजींनी मांडला.

ग्रामीण जीवनाची सद्य:स्थिती

भारतीय स्वातंत्र्यानंतर देशाच्या विकासासाठी नियोजनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. अनेक पंचवार्षिक योजना राबवून पूर्ण झाल्या आहेत. शहरात औद्योगिकीकरण होऊन रोजगाराच्या संधीत वाढ झाली. परंतु ग्रामीण जीवनात फारसा फरक पडला नाही. ग्रामीण बेरोजगारीची समस्या सुटली नाही. ग्रामीण भागातील चांगले कामगार शहराकडे जात आहे. शहराकडे वळत आहे. शिकलेल्या व बुद्धीवान तरुणांनी शहरानांच पसंत केले आहेत. शहरात सर्व चांगल्या सुविधा उपलब्ध झाल्या आहे. देशातील व परदेशातील मालांनी दुकाने चमकत आहेत. परंतु ग्रामीण जीवनातील जनतेची प्रश्न अपुरे आहेत. संपूर्ण देशातील जनतेला शहरात जाऊन राहणे कठीण आहे. महात्मा गांधीजी म्हणतात, ''ग्रामीण संस्कृतीचा काळ आता संपला आणि शहरात राहणे आवश्यक आहे असे वाटले तरी ते शक्य नाही. ७ लाख खेड्यांना ७०० शहरांत स्थलांतरित करावे असे वाटले तरी त्याला वेळ हा लागणारच आहे. खेड्याची

पुन्हा रचना कशी करणार म्हणून शहरात राहायचे ठरवले तरी ते कठीणच आहे.''गांधजींना भारतातील वास्तवतेची जाणीव होती. म्हणून त्यांनी ''खेड्यांच्या पुन:रचनेवर भर दिलेला आपणास दिसून येतो.''

भारत स्वातंत्र झाला तेव्हा ८२.७ टक्के (१९५१ च्या जनगणनेनुसार) लोकसंख्या सध्या ७२.२ टक्के (२००१ च्या जनगणनेनुसार) लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. भारतात सध्या ५,८०,७७९ खेडी आहेत. आज ही शेती हाच ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६५ ते७० टक्के शेती व शेतीवर आधारित व्यवसायावर अवलंबून आहेत. वाढत्या लोकसंख्यामुळे शेतीची तुकड्यांत वाटणी विभागणी झालेली आहे. कमीत कमी शेती असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढली असून कुटुंबाच्या वाढत्या गरजा भागविणे कठीण झाले आहे. रोजगाराच्या शोधात खेड्यांतील तरुण पिढी शहराकडे स्थलांतर करीत आहे. ग्रामीण भागातून शहराकडे सर्व कुंटुंब जात आहे.

खेडेगावाच्या समग्र (सारख्या) विकासाचा विचार मांडतांना अनेक गोष्टी बाबत क्रांती होणारे विचार गांधीजींनी व्यक्त केले. महात्मा गांधीजींना हवे असलेले ग्राम हे गणराज्याप्रमाणेच होते. खेड्यातील लोकांना गावाबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. केंद्रीय स्तरांवर खेड्याबाबतचे निर्णय होऊ नयेत. पंचायतीला गावातील निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असावे. गावातील तंटे मिटविणे व न्याय देणे हे काम पंचायतीने करावे. गावातील लोकांना प्रत्येक वेळी संरक्षणासाठी सरकारवर अवलंबून राहण्याची गरज असू नये. गावात ग्रामशांती असावी. गावाच्या संरक्षणाचे काम त्यांनी करावे. ग्रामपंचायती आर्थिक बाबतीत तयार असाव्यात. त्यांचे स्वत:चे उत्पन्न असावे.

खेडे गाव आर्थिक बाबतीत स्वावलंबी असावे. स्वत: तयार असावे. खेड्यांनी शहरांवर अवलंबून राहण्याची गरज असू नये. गावात शांतता असावी. गावाच्या संरक्षणाचे काम त्यांनी करावे. ग्राम पंचायती आर्थिक बाबतीत सशक्त असाव्यात. त्याचे स्वत:चे उत्पन्न असावे. खेडेगाव आर्थिक बाबतीत स्वत: तयार असलं पाहिजे. खेड्यांनी शहरावर कधीही अवलंबून नाही राहिले पाहिजे. मूलभूत गरज पूर्ण करण्यासाठी आवश्यक अशा वस्तुंचे उत्पादन खेड्यात झाले पाहिजे. ग्रामीण भागाची व्यवस्था ही चांगल्या प्रकारची असली पाहिजे. जेणे करुन प्रत्येक माणसाला अन्न, वस्त व निवारा या प्राथमिक गरजा पूर्ण करता येतील. प्राथमिक गरजांची उत्पादन साधने सर्व सामान्य माणसाच्या हातात असावीत. हवा, पाणी जसे सर्वांसाठी गरजेचे असते. तशी उत्पादन वाढी बरोबरच उत्पादनाचे योग्य वितरण झाले पाहिजे.

व्यक्तीगत स्वच्छतेच्या बाबतीत भारतीय लोक लक्ष देत असतात. परंतु सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत असे घटत नाही. खेड्यातील लोक शौचासाठी रस्त्याच्या कडेलाच बसतात. त्यामुळे गावाच्या बाजूने दुर्गंधी पसरते. स्वच्छता आरोग्यासाठी आवश्यक आहे. ग्राम सफाई ग्राम जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. खेड्यातील प्रत्येक व्यक्तीला आरोग्य रक्षणाचे ज्ञान असले पाहिजे. लोकाच्या दररोजच्या आहारात दुध व ताजा भाजीपाला यांचा समावेश असला पाहिजे.

शेती विषयी विचार मांडतांना महात्मा गांधीजी म्हणतात, ''हिंदुस्थानी लोक जर शेताचा विकास करु शकले नाहीत तर त्यांच्या हातून कसलेच काम होणार नाही. देशातील खूप लोकांची उपजिवीका शेतीवर अवलंबून आहे. त्याकडे दुर्लक्ष करणे आत्महत्या करण्यासारखे आहे. सर्व मिळून किंवा सहकारी पद्धतीने शेती केल्यास अधिक

लाभ होईल. शेती हा भारतातील प्रमुख उद्योग असल्यामुळे शेतीला सर्व नजरेतून प्रथम स्थान दिले पाहिजे.'' गावात दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी गुरांची गुणवत्ता सुधारली पाहिजे. आदर्श गुरे नसतील तर आदर्श गाव बनविता येणार नाही. गुरे ग्रामीण भागाचा महत्त्वाचा भाग आहे. गुरांची जोपासना योग्य प्रकारे करण्यात यावी. प्रत्येक गावात उपलब्ध दुधाच्या विक्रीसाठी सहकारी दुध पुरवठा केंद्र असावे. खेड्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी ग्राम उद्योग सुरु झाले पाहिजे. (परकीय) दुसरीकडील मालामुळे येथील उद्योग बुडाले आहेत. भारतात गरिबी वाढली आहे. सरसकट यंत्राना गांधीजींचा विरोध नव्हता. माणसांना बेरोजगार बनविणाऱ्या यंत्राला गांधीजींचा विरोध होता. प्रत्येक खेड्याने आपल्याला आवश्यक त्या वस्तू तयार कराव्यात आणि शहरांच्या गरजा भागविण्यासाठी काही प्रमाणात जास्तीचे उत्पादन करावे. मोठे उद्योग राष्ट्रीय मालकीचे करावे हे अत्यंत गरजेचे आहे.

ग्राम जीवनाचा विकास हा चांगल्या प्रकारे झाला पाहिजे. खेड्यातील सर्व लोकांचे मत, विचार हे एक राहिले पाहिजे. लोकसंख्या वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीची तुकड्यात वाटणी होत आहे. आजही ग्रामीण भागात शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. ६५ ते ७० टक्के लोक शेती व शेतीवर आधारीत व्यवसायावर अवलंबून आहेत. ग्रामीण भागात कमीत कमी शेती असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत आहेत. ग्रामीण भागातील लोक शेतीवर अवलंबून आहे आणि शहराकडील लोक खेड्यावर अवलंबून आहे.

■ ■ ■

महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसेविषयी विचार

कोमल अनिल गायके
बी.ए. द्वितीय वर्ष
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगार (रंगारी)

भारतीय राजकीय विचारवंतान महात्मा गांधीजींचे स्थान महत्त्वाचे आहे. महात्मा गांधीजींच्या राजकीय विचारांचा आधार सत्य आणि अहिंसा आहे. ते मानवतावादी होते. धर्म व राजकारणाचा समन्वय साधून त्यांनी राजकारणाला अध्यात्मिक आधार दिला. महात्मा गांधीजींनी राजकारणात नवीन दृष्टी दिली. सत्य, अहिंसा आण सत्याग्रह या तीन संकल्पनाची अनमोल देणगी संपूर्ण मानवजातीस दिलेली आहे. या संकल्पना भारतीय तत्वज्ञान व धर्मतत्वज्ञानात प्राचीन काळापासून रुढ असल्या तरी राजकीय क्षेत्रात त्या संकल्पनाचे उपयोजन प्रथम गांधीजींने केले. महात्मा गांधीजींच्या संदर्भात बाबा आमटे म्हणतात की गांधीजींचे महात्म्य सांगून गांधी सांगता येणार नाहीत. उद्याच्या पिढ्यांना त्यांची ओळख पटवण्यासाठी कदाचित संगणक लागेल. पण काळाच्या भागावर उमटलेली ही तप्त युगमुद्रा कोणत्याही इतिहासाला पुसून टाकता येणार नाही.

महात्मा गांधीचे ध्येय सर्वोदयी आदर्श समाज निर्मितीचे होते. आदर्श समाजाचा पाया नैतिकचारित्र्य संपन्न व्यक्ती असावी असे त्यांचे ठाम मत होते. नितीमुल्यांचा स्वीकार केल्याशिवाय व्यक्तीचे व्यक्तीगत किंवा समाजाचे सामाजिक व राष्ट्रीय प्रश्न सुटणार नाही. यामुळे त्यांनी आपल्या राजकीय विचारात धार्मिक तत्त्वांचा आधार घेऊन धार्मीक तत्त्वांना महत्त्व प्राप्त करुन दिले आहे. महात्मा गांधी म्हणतात, ''सत्यासाठी अहिंसा, अहिंसेसाठी आत्मशुद्धी, आत्मशुद्धीसाठी ब्रम्हचर्य, ब्रम्हचर्यासाठी अस्वाद आणि अस्वादासाठी अस्तेय अत्यंत आवश्यक आहे. म्हणजेच गांधीजींना सत्यालाच अत्यंत मानाचे स्थान दिल्याचे दिसते.''

सत्य

महात्मा गांधीजी अहिंसा हे मूल्य सर्वश्रेष्ठ मानत होते. अहिंसा परमधर्म ही शिकवण त्यांना बालपणापासूनच मिळाली होती. अहिंसा पालनात सत्य हा महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यांच्या संपूर्ण राजकीय विचाराचा तो आत्मा आहे असे महात्मा गांधीजी म्हणतात. माझ्या दृष्टीने सत्य हे सार्वभौमत्व आहे. ज्यात इतर अनेक तत्त्वांचा समावेश होतो. सत्य हे केवळ शाब्दिक नसून ते विचारात असले पाहिजे. सत्य याची केवळ आपण कल्पना करतो. सत्य हे असत्याला प्रेम हे क्रोधाला व आलक्लेश हे हिंसेला शमवते. हा अंतिम व शाश्वत नियम आहे. व तो केवळ संत महंतासाठी नसून सर्वांसाठीच आहे. सत्याशिवाय कोणतीच कामे पूर्ण होऊ शकत नाही. किंवा सत्या अभावी जगाचे कल्याणही होऊ शकणार नाही, असा विचार त्यांनी मांडला.

सापेक्ष सत्य

सापेक्ष सत्य हे व्यक्ती, स्थळ, काळ आणि परिस्थितीनुसार बदलत जाते. म्हणून सापेक्ष सत्य हे पूर्ण सत्य किंवा अंतिम सत्य असू शकत नाही. तरी ही ती अंतिम सत्याकडे नेणारी एक पायरी आहे. उदा. सुखाची कल्पना

निरपेक्ष सत्य

निरपेक्ष सत्य हे शाश्वत व अंतिम स्वरुपाचे असते. निरपेक्ष सत्य म्हणजेच परमेश्वर होय. व्यक्तीचा नैतिक

विकास झाला म्हणजे त्याला निरपेक्ष सत्याची प्राप्ती होते. म्हणजेच परमेश्वराचा साक्षात्कार होतो. यासाठी सत्याचे पालन कोणत्याही परिस्थतीत व कितीही किंमत देऊन केले पाहिजे. सदविचार, सदवर्तन, सदवचन या दृष्टीने सत्याचे पालन केले पाहिजे.

वरील दोन्ही प्रकारात निरपेक्ष सत्य श्रेष्ठ आहे. सापेक्ष सत्याच्या कल्पनेमुळे व्यक्तीकडून काही चुका होण्याचा संभव असतो. परंतु त्या लक्षात आल्यास व्यक्तीने त्या उदार मनाने मान्य करावयास पाहिजे. त्या मान्य न करणे म्हणजेच निरपेक्ष सत्याच्या मार्गात अडचणी निर्माण करणे होय. व्यक्तीला कितीही त्याग करावा लागला. कष्ट सहन करावे लागले व वेळ पडल्यास स्वत:चा जीवही घासवावा लागला तरीही व्यक्तीने निरपेक्ष सत्याच्या प्राप्तीसाठी ते करणे आवश्यक आहे. पक्षप्राप्तीसाठी हे करणे आवश्यक आहे. पक्षप्रापीपणा, विश्वासघात, द्वेष इत्यादी गोष्टींमुळे व्यक्ती निरपेक्ष सत्याला मुकतो. भारतीयांच्या उद्धारासाठी भारतीयांनीच राज्यकारभार करणे आवश्यक आहे. आणि त्याच्या प्राप्तीसाठी व्यक्तीने तन, मन, धन याचा त्याग करण्यास तत्पर असणे आवश्यक आहे. सॉक्रेटिस, येशु ख्रिस्त यांनी सत्यासाठी आपला जीव घालविला अशी उदाहरणे इतिहासात दिसुन येतात.सत्याच्या प्राप्तीसाठी व्यक्ती धैर्य, विवेकशीलता, आत्मविश्वास आणि त्याग या गोष्टी आवश्यक आहेत. या गोष्टीशिवाय सत्यप्रस्थापित होणार नाही असे महात्मा गांधीजींचे मत होते.

अहिंसा

महात्मा गांधीजींचे राजकारणास व सर्वसाधारणत: मानवी जीवनास झालेले योगदान म्हणजे त्यांची अहिंसा ही संकल्पना होय. अहिंसापालन हे गांधीजींच्या सत्यप्रस्थपनेचे प्रमुख साधन आहे. सत्य आणि अहिंसा हे अविभाज्य असून एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. त्यामुळे अहिंसा हे सत्यान्वेषी मानवाचे सर्वश्रेष्ठ कर्तव्य ठरते.

हिंसेच्या साम्राज्यान ज्यांनी अहिंसेच्या सिद्धांताचा शोध लावला त्या ऋषींना ते न्युटनपेक्षाही अधिक थोर संशोधक व वेलिंग्टन पेक्षाही अधिक थोर मानतात. शस्त्रे कशी चालवायची याचे ज्ञान झाल्यानंतर ती विफल कशी आहेत याची त्यांना जाणीव झाली व हिंसेने नव्हे तर अहिंसेने मुक्ती होईल असे त्यांनी जगाला सांगितले, असे गांधींजी म्हणतात.

अर्थ

महात्मा गांधीजींना 'हरिजन' या साप्ताहिकातील एका लेखात अहिंसेचा अर्थ स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, ''पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही वस्तुमात्राला व प्राणीमात्राला विचाराने शब्दाने वा कृत्याने संभावणारी दूर वा पत टाळणे म्हणजे अहिंसा होय.''

अहिंसा म्हणजे निष्क्रियता किंवा उदासिनता नाही, हात बांधून निष्क्रियतेने तटस्थ राहणे नाही, अहिंसा म्हणजे दृष्टापुढे शरणागती पत्करणे नव्हे तर अहिंसा म्हणजे आत्म्याची, सत्याची शक्ती आहे.

वीरांची अहिंसा

अहिंसेचा पहिला आणि श्रेष्ठ प्रकार म्हणजे वीरांची अहिंसा हा होय. केवळ नाइलाज आहे म्हणून अहिंसेचा स्वीकार न करता नैतिकदृष्ट्या अहिंसा अपरीहार्य आहे हे मनोमन पटल्यामुळे स्वीकारलेली अहिंसा ही वीरांची अहिंसा असते. अहिंसा ही अशा व्यक्तीची जीवनपद्धती असते, तो निरपवादपणे अहिंसा स्वीकारतो अशा स्वरुपाच्या अहिंसेत फार मोठे मनोबल, प्रचंड सामर्थ्य असते.

दुर्बल्यांची अहिंसा

हिंसेला हिंसेने उत्तर देण्याची क्षमता नसल्याने त्या दुर्बलतेतून अहिंसा स्वीकारली जाते. अशी अहिंसा दुर्बलांनी जीवनाच्या काही क्षेत्रात स्वीकारलेली असते. ही

अहिंसा वीरांच्या अहिंसेइतकी प्रभावी नसते तर या अहिंसेचे निश्चित चांगले परिणाम होण्यासाठी तिला सत्य व साहस याची जोड द्यावी लागते.

भित्र्यांची अहिंसा

ही अहिंसा भीतीपोटी निर्माण होते. म्हणून त्यास भित्र्यांची अहिंसा असे म्हटले जाते. भेकड लोक संकटाला धैर्याने सामोरे जाण्याऐवजी पलायनवाद स्वीकारतात. महात्मा गांधीजींच्या मते असा पळ काढणे नामुष्कीचे अनैसर्गिक व अपमानास्पद आहे. प्रतिकार किंवा प्रतिघात करता येत नाही. म्हणून अहिंसा पालन करण्यापेक्षा उघड उघड केलेली हिंसा पत्कारणे गांधीजींना मान्य होते. मनात हिंसा उफळते आहे, परंतु ती करणे शक्य नाही म्हणून केवळ धोरणात्मक बाब म्हणून अहिंसा स्वीकारणे गांधीजींना मान्य नव्हते.

अशाप्रकारे महात्मा गांधीजींनी अहिंसेचे प्रकार सांगितले आहेत. अहिंसा हे यशप्राप्तीचे सर्वश्रेष्ठ अस्त्र आहे. अहिंसेत असफलता हा शब्द नाही. परंतु अहिंसापालन, विचार आणि कृती या दोन्हीतून व्हायला पाहिजे. तसेच अहिंसेवर दृढ विश्वासही असायला पाहिजे.

महात्मा गांधी यांना सत्य मार्गाने चालण्याची खूप आवड होती. महात्मा गांधी यांच्या प्रमाणे आपणही सत्याच्या मार्गाने चालावे, कुणाचीही हिंसा नाही केली पाहिजे. कुणाचे मन दु:खावले नाही पाहिजे. सर्वांनी चांगल्या मार्गाने चालण्याचा जगण्याचा अर्थ समजला पाहिजे. महात्मा गांधीजी म्हणतात. सदविचार, सदवर्तन, सदवचन या दृष्टिने सत्याचे पालन केले पाहिजे. कुणाकडून काही वाईट चूक होण्याचे समजले तर आपण लगेच त्याला चांगले काम काय हे समजले पाहिजे. सर्वांवर प्रेम करायला शिकले पाहिजे.

■ ■ ■